॥ ॐ नमः शिवाय ॥

# ज्योतिर्लिंग


: लेखक :

भार्गव आत्माराम मुळे

होराभूषण, ॲडव्होकेट, हायकोर्ट मुंबई.



REFBK-0007366

REFBK-0007366



सन १९४९ इ.

विषय
सं. नं.



लेखक

सन १९४९

स्व. अ. प्र. नं.
नोंद नं. १०४८६ / २५५५८

14 JAN 1975

…ग्रंथालय …
अ. प्र.
नं. १६५५
… प्रत

॥ ॐ नमः शिवाय ॥

# ज्योतिर्लिंग

REFBK-0007366

REFBK-0007366

: लेखक :

भार्गव आत्माराम मुळे

हीराभूषण, ॲडव्होकेट, हायकोर्ट मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

सन १९४९ इ.

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क लेखकानें आपणाकडे राखून ठेवले आहेत.

प्रकाशक—**भार्गव आत्माराम मुळे**, नौपाडा सोसायटी, ठाणें

मुद्रक—**दा. त्र्यं. जोशी**, बी. ए. (टिळक), चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पुणें २.

# प्रस्तावना

ठाण्याचे श्री. भार्गव आत्माराम मुळे ॲडव्होकेट ह्यांनीं ज्योतिर्लिंग या नांवाचें पुस्तक लिहिलें असून त्याला प्रस्तावना मीं लिहावी अशी त्यांनीं मजपाशीं आग्रहाची विनंती केली. वस्तुतः दुर्दैवानें ह्यावेळीं माझी दृष्टि मंद झाल्यानें मला लिहिणें वाचणें अशक्य झालें आहे. तथापि त्याच्या आग्रहाच्या मागणीचा अव्हेर करणें माझ्या मनाला अत्यंत दुःखप्रद वाटलें म्हणून त्यांच्या समाधानाकरितां प्रस्तावना म्हणून हे कसेबसे चार शब्द लिहीत आहे. तरी ते तेवढ्यानेंच समाधान मानून घेऊन मला माझ्या अभिवचनांतून मुक्त करतील अशी आशा आहे.

ज्योतिर्लिंग हा शब्द आमच्या भरतखंडांतील हिंदुधर्मांच्या बहुतेक लोकांच्या त्यांतल्यात्यांत सनातनीयांच्या परिचयाचा आहे. पण तो परिचय त्या शब्दमात्रापुरता आहे. म्हणजे ज्या वैदिक धर्मीयांना तो शब्द ऐकून माहीत असतो, त्यांना त्या शब्दाचा जो अर्थ ज्योतिर्लिंग त्याची कांहींच माहिती नसते. लिंग म्हणजे देवळांतील महादेवाचें लिंग हें सर्वांना माहीत आहे. पण ज्योतिर्लिंग म्हणजे काय? तें कोठें आहे? किती आहेत? ह्याबद्दलची कांहींच माहिती नसते. ज्यांनीं द्वादश ज्योतिर्लिंग असें ऐकलें असेल व तत्संबंधीं स्तोत्र वाचलें असेल त्यांनाही तीं लिंगें द्वादशच कां, एकादश कां नाहींत किंवा त्रयोदश कां नाहींत ह्याची कांहींच माहिती नसते. ही स्थिति धार्मिक दृष्ट्या विशेषतः शिवोपासकांच्या दृष्टीनें अत्यंत शोचनीय आहे. ती दूर करण्याकरितां प्रस्तुत पुस्तकाचे लेखक श्री. भार्गवराव मुळे हे स्वतः आंग्लविद्याविभूषित असून त्यांनीं अत्यंत शारिरिक कष्ट, द्रव्यव्यय व कालव्यय सोसून सर्व ज्योतिर्लिंगस्थानें स्वतः पाहून केवळ लोकहिताकरितां हें धर्मप्रधान पुस्तक लिहिलें आहे. त्याबद्दल त्यांचें जितकें अभिनंदन करावें, आभार मानावे, धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत. थोडक्यांत सांगावयाचें तर आपल्या प्रयत्नानें त्यांनीं

धार्मिक बुद्धीच्या सर्व हिंदु लोकांना निःस्वार्थ आणि निरपेक्ष बुद्धीनें सर्वदा ऋणी करून ठेवलें आहे.

त्यांनीं त्याकरतां जो प्रयत्न केला तो अतिशय व्यवस्थितपणें केला आहे. त्यांनीं प्रथम वेदशास्त्रें, पुराणें इ. वैदिक धर्मावरील अद्ययावत् बहुतेक सर्व ग्रंथ वाचून त्यांतील उपयुक्त व महत्त्वाची माहिती संकालित करून आपलीं अनुमानें व कल्पना यांसह वाचकांपुढें सादर केली आहे. पण अशा प्रकारच्या माहितीसंबंधीं असलेल्या सामान्य नियमाप्रमाणें ती माहिती सर्व वाचकांना सारखीच ग्राह्य होईल असें म्हणतां येत नाहीं. त्यांत मतभेद हे असणारच.

तशा मतभेदांपैकीं पहिल्या विभागांत आलेल्या मतभेदांच्या कांहीं स्थलांचा मी येथें निर्देश करतों.

( १ ) कवित्व, गान, वाद्य, वगैरे कलांचा उगम मूर्तिपूजेमुळें झाला. पा. २

( २ ) धर्म म्हणजे यज्ञादि क्रिया, अग्निपूजा, यज्ञ करणें हाच प्रमुख धर्म होता. पा. ७

( ३ ) वेदकालीं ज्या प्रार्थना होत होत्या, त्याच पद्धतीच्या प्रार्थना संहिताकालीं चालू होत्या असें ऋक्संहितेवरून दिसतें. पा. ११

येथें वेदकाल म्हणजे तो कोणता हें सांगितलें असतें तर बरें झालें असतें.

( ४ ) " मरुद् गणाचें स्वरूप यज्ञरूपी मानिलें आहे. " पा. ११
तें कोठें ?

( ५ ) रुद्र, इंद्र, विष्णु, ह्या महनीय नायकांची स्मृति राहावी म्हणून त्यांच्या पराक्रमाचें वर्णन अनेक प्रकारें करण्यांत आलें आहे. पा. १२

( ६ ) या सूक्तांचा समावेश वेदांत करण्यांत आला.

( ७ ) यज्ञकर्मानें पुरुषार्थ साधणें अगर ज्ञानप्राप्तीनें ब्रह्म जाणणें हे

मार्ग अनुल्लंघनीय झाल्यानें दुसरा कांहीं तरी मार्ग प्रार्थनेसाठीं पाहिजे. म्हणून यज्ञाच्या ठिकाणीं प्रतीक स्थापून त्याची प्रार्थना सुरू झाली. पा. १७

( ८ ) पंचरात्र सिद्धांत हा सर्व वेदांचा निष्कर्ष आहे. पा. २७

( ९ ) ज्या ,, ब्रह्म ही संज्ञा आहे ती रुद्रालाच आहे. पा. २८

( १० ) वेदकालानंतर आर्य हे उत्तरध्रुवाकडून येऊन तिबेटावर येऊन राहिले. इ. पा. ४५ ते पा. ४८ वरील मजकूर अपूर्व वाटतो.

( ११ ) आर्य लोक हिंदुकुश पर्वतापलीकडे होते. पान १२.

ते उत्तरध्रुवाकडून हिंदुस्थानांत म्हणजे तिबेटांत येऊन राहिले ही दोन वाक्यें परस्पर विसंगत दिसतात.

याप्रमाणें त्यांनीं वैदिक विभागांत त्या वाङ्मयांतील ज्योतिर्लिंगा-संबंधाची त्यांना उपयुक्त वाटली ती सर्व माहिती देऊन दुसऱ्या म्हणजे ' पुराणकाल ' या विभागांत पुराणांतील सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनीं त्या विषयावरील सर्व पुराणें बारकाईनें वाचून त्यांतील दंतकथा बहुतेक जशाच्या तशाच संग्रहित केल्या आहेत. त्या पुष्कळांना असंभाव्य आणि अविश्वसनीय वाटतील. ही गोष्ट ग्रंथकाराच्याहि लक्षांत आली होती असें दिसतें. ते लिहितात, " पुराणकारांचा आधार घेऊन एकादी गोष्ट सिद्ध करणें कांहींना पटणार नाहीं. पुराणें विश्वसनीय नाहींत. पुराणांतील विधानें सुसंगत नाहींत. एकच गोष्ट निरनिराळ्या विरुद्ध प्रमाणांत सांगितलेली आहे. अतएव पुराणांचा आधार निरुपयोगी आहे असें त्यांचें मत आहे. त्यांत लिंगपुराणावर विशेष कटाक्ष आहे. " पा. ९८.

यावरून त्यांना पुराणकारांच्या कल्पित कथांची योग्य जाणीव होती हें स्पष्ट दिसतें. असें असतां त्यांनीं पुराणांतून तसली माहिती संकलित करून जशीच्या तशीच वाचकांच्या पुढें सादर केली आहे. ह्याचें कारण सर्वच वाचक चिकित्सक आणि अश्रद्धालु नसतात. त्यांनीं प्रस्तुत पुस्तक ज्या श्रद्धालु वाचकांच्या उपयोगाकरितां इतक्या परिश्रमपूर्वक लिहिलें आहे,

त्यांच्या मनांत वरील प्रकारच्या कुकल्पना येणार नाहींत हें जाणूनच त्यांनीं ती सर्व प्रकारची माहिती दिली आहे.

या पुस्तकाचें महत्त्व असें आहे कीं, त्यांत ग्रंथकारांनीं प्रत्येक ज्योतिर्लिंगाच्या स्थलीं जाऊन व अत्यंत हाल–अपेष्टा सोसून जी सविस्तर माहिती दिली आहे, ती पुढील भाविक यात्रेकरूंना अत्यंत उपयोगी ठरणारी आहे. त्यांनीं प्रत्येक ज्योतिर्लिंगाच्या स्थानाचें सूक्ष्मवर्णन, तें ज्या प्रांतांत आहे त्या प्रांताची थोडीशी कल्पना तेथें जाणाऱ्या रेल्वेचा, खुष्कीचा, पायरस्ता, रेल्वेचीं स्टेशनें, वाटेंत उपलब्ध होणारीं खाण्यापिण्याचीं, राहण्या–उतरण्याची सोय, नद्या, नाले, पर्वत यांची सविस्तर माहिती, वाटेंत लागणारें नाकें, चौक्या, पर्वतांचे चढउतार वगैरे यचयावत् गोष्टींची खडान् खडा माहिती दिलेली आहे. त्या माहितीचा उपयोग भाविक यात्रेकरूंना होऊन ते त्यांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद आणि आशीर्वाद देतीलच. पण इतर वाचकदेखील त्यांच्या निरपेक्ष परोपकारपरायणतेबद्दल त्यांची मुक्तकंठानें प्रशंसा करतील यांत संशय नाहीं.

पण मला ह्या पुस्तकांतील ज्योतिर्लिंगाच्या द्वादश या संख्येची त्यांनीं जी उपपत्ति दिली आहे ती पटली नाहीं. कारण रुद्र अकरा असतांना रुद्रांचे मूर्तिभेद जीं ज्योतिर्लिंगें तीं बारा कां ! ही शंका ग्रंथकारालाहि आली होती. त्यांची उपपत्ति त्यांनीं पान ५६ व ७५ वर दिली आहे ती पटण्यासारखी दिसत नाहीं. ते लिहितात अकरा रुद्र व त्याप्रीत्यर्थ अकरा शिवालयें असावयास पाहिजे होतीं. शिव भानुप्रिय मानिला आहे. ( म्हणून बारा ज्योतिर्लिंगें असावींत. ) ऋषींच्या शापामुळें यतिरूपी शिवाला दग्ध होण्याची पाळी आली म्हणून तो सूक्ष्म लिंग धारण करून भूमीवर पडला. पडतांना त्या लिंगदेहांतून अग्निस्फुलिंग बाहेर पडून बारा ठिकाणीं पडले व स्थिर झाले. तींच हीं मुख्य १२ ज्योतिर्लिंगें झालीं. ( पा. ७५ ). अस्तु.

हें त्यांचें पुस्तक त्यांचें एक चिरंतन स्मारक ठरो आणि त्यांना दीर्घायुरारोग्य प्राप्त होऊन त्यांच्या हातून अशींच परोपकाराचीं कृत्यें सतत घडोत अशी त्या जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना करून मी ही प्रस्तावना समाप्त कारितों.

नागपुर
मिति पौष व. ८
शनिवासरे
दि. २२-१-४९

महामहोपाध्याय कृष्णशास्त्री घुले

ग्रंथ संग्रहालय
सं. नं. १६८५

# लेखकाचे दोन शब्द

ज्योतिर्लिंग हा शब्द ज्योतिस् आणि लिंग यांचा संधि होऊन झालेला आहे. ज्योतिस् म्हणजे अग्नि, सूर्य, चैतन्य, प्रभा किंवा तेज।आणि लिंग म्हणजे चिन्ह.अग्नीचें चिन्ह म्हणजे ज्योतिर्लिंग असा साधा सरळ अर्थ होतो. येथें अग्नि म्हणजे विशिष्ट पद्धतीनें संस्कार करून जो अग्नि तयार होतो, तो. हा अग्नि यज्ञक्रियेंत प्रकट होतो. यज्ञक्रिया परमेश्वरस्वरूपी आहे. त्यायोगें शिव प्राप्त होतें. म्हणजे भक्तांचें कल्याण होतें. अशा शिव-स्वरूपी यज्ञाचें जें चिन्ह तें ज्योतिर्लिंग होय. शिवदेवतेंच्या उपासकांना ज्योतिर्लिंगाचें महत्त्व फार असल्यानें ध्यानधारणेच्या दृष्टीनें त्याचें निर-निराळ्या कालांतील स्वरूप कसें आहे याबद्दल या ग्रंथांत माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रंथकाराचें घराणें शिवभक्त आहे. आमची कुलदेवताहि शिव आहे.शिवभक्ति साधण्यास त्याचें उज्ज्वल स्वरूप।दृष्टीपुढें असावें लागतें.तरच मनाची प्रसन्नता वाढते. ग्रंथकर्त्याचें हृद्गत सांगावयाचें म्हणजे शिवलिंग सात्त्विक, शुद्ध आणि निष्कलंक आहे. त्याचें यथार्थ स्वरूप शिवभक्तांपुढें विशद करून मांडण्याचा हा सर्व प्रयत्न आहे. शिवलिंगाला बीभत्स कल्पना चिकटविलेल्या आहेत.त्यांत सत्यांश आहे कीं काय याचा विचार करून निश्चित मत ठरविण्यास अठ्ठावीस वर्षे लागलीं. या कालांत शिवासंबंधीं जी कांहीं माहिती मिळवितां आली ती या पुस्तकांत ग्रथित केली आहे. ज्या देवतेची आपण उपासना करतों त्या देवतेचें स्वरूप निष्कलंक असावयास पाहिजे,तरच ती ध्यानोपयोगी होणार. हा सिद्धांत शिवदेवतेलाहि लागू असणार अशी आमची भावना आहे. आणि या भावनेनेंच आम्ही प्रथम शिवाच्या मुख्य स्थानांच्या दर्शनाचा संकल्प केला आणि सन १९२० पासून प्रारंभ करून सन १९४७ सालीं शिवप्रसादानें तो तडीस गेला.या अवधींत शिवदेवतेच्या स्वरूपासंबंधीं माझी जी भावना होती तीच प्रभावी ठरेल असें या ग्रंथांतील विवेचनावरून प्रत्ययास

येईल असा भरंवसा वाटतो. अश्लील अगर बीभत्स कल्पनेनें शिवलिंगाची आराधना साधतां येणार नाहीं आणि तशी कल्पना करण्यास परोक्ष वा अपरोक्ष आधारहि नाहीं. श्रुति, स्मृति, पुराणोक्त शिवाच्या वर्णनांत तसा उल्लेखहि नाहीं. रुद्रसूक्त आणि शिवकवच यांत शिवाच्या स्वरूपाचें विस्तृत वर्णन आहे. परंतु त्यांत शिवलिंगाच्या विकृत स्वरूपाचें वर्णन नाहीं. अर्वाचीन अष्टकें आणि स्तोत्रें सर्व पुराणांतील निष्कर्ष काढून तयार केलेलीं आहेत. पुराणांच्या आधारें त्यांची वाढ झाली आहे, परंतु एकाहि स्तोत्रांत शिवलिंगासंबंधीं बीभत्स कल्पना दिसत नाहीं. आतां शिवाचें लिंग कां ? हा मुख्य प्रश्न आहे. याचाच विचार आम्हीं या ग्रंथांत केला आहे. या प्रश्नाला प्राचीन अगर अर्वाचीन ग्रंथांत सांकेतिक उत्तर असल्यानें अनुमानाची जोड घ्यावी लागली आहे.हीं अनुमानें सर्वांना पटतील असा विश्वास नसला तरी तीं वाङ्मयांतील माहितीच्या आधारें काढिलीं असल्यानें अग्राह्य ठरणार नाहींत असा विश्वास वाटतो.

ज्योतिर्लिंग हा विषय धार्मिक असल्यानें सर्वसाधारण जनांस त्याच्या परिशीलनाचा मोह होईलच असें सांगतां येणार नाहीं. तथापि आपल्या धर्मियांत शिवभक्तांचा भरणा मोठा असल्यानें शिवलिंगाचें यथार्थ शुद्ध स्वरूप त्यांच्यापुढें ठेवावें हा मुख्य हेतु आहे. संशोधक आणि सुविचारी जनांस शिवलिंगाच्या शुद्ध ध्यानोपयोगी स्वरूपाबद्दल पूर्ण कपना आहेच. हिंद पंत प्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं ब्रिटनच्या भावी राणीच्या विवाहप्रसंगीं नजराणा म्हणून पाठविलेल्या रौप्य करंडकावर हिंदुस्थानचें द्योतक चिन्ह म्हणून शिवलिंग दाखविलें होतें, यावरून ही गोष्ट सिद्ध होईल. सर्वसाधारण जनतेंत शिवलिंगाबद्दल ज्या कांहीं वेड्यावाकड्या कल्पन्ना असतील त्या नाहींशा व्हाव्यात हा उद्दिष्ट हेतु साध्य झाल्यास ग्रंथकारास समाधान होणार आहे.

ग्रंथाला धर्ममणि बालस्वामी महाराज यांचा आशीर्वाद लाभला आहे आणि महामहोपाध्याय कृष्णशास्त्री घुले यांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

श्री. कृष्णशास्त्री यांचा या विषयावरील अधिकार थोर असल्यानें त्यांनीं या ग्रंथास प्रस्तावना लिहावी म्हणून विनंति केली. त्यांची प्रकृति बरी नसतांहि त्यांनीं प्रस्तावना लिहून ग्रंथकर्त्यास ऋणी केलें आहे. या दोघांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. या विषयावर ग्रंथ लिहिण्यास माझ्या अनेक मित्रांनीं मला प्रोत्साहन दिलें त्या सर्वांचा नामनिर्देश करणें आवश्यक नसलें तरी श्री. एकनाथ सदाशिव भोळे आणि श्री. दाजीसाहेब वैद्य ( वैद्य वखार ठाणें ) यांचा निर्देश करून त्यांचे आभार मानणें उचित आहे.

शेवटीं ज्याच्या कृपाप्रसादानें हें पुस्तक संपूर्ण लिहून महाराष्ट्रभाषाभिज्ञ बंधुभगिनींस सादर करण्याची संधि मिळाली त्या शिवदेवतेस सहस्रप्रणाम करून त्याच्या पदकमलीं ही वाङ्मयी पूजा समर्पण करतों आणि ज्यांच्या शिकवणीनें माझ्या मनावर धार्मिक बुद्धीचें बीजारोपण झालें त्या मातापित्यांच्या चरणीं ही अल्प कृति अर्पण करतों.

माघ शुद्ध प्रतिपदा
शके १८७०
ठाणें ता. ३० जानेवारी १९४९

भार्गव आत्माराम मुळे.

६३६६

# विद्याभूषण धर्ममणि श्री बालस्वामी महाराज यांचा आशीर्वाद

माझे स्नेही श्री. भा. आ. मुळ्ये ॲडव्होकेट नौपाडा, ठाणें यांनीं ज्योतिर्लिंगाविषयीं एक उपयुक्त माहितीनें भरलेलें पुस्तक लिहून मराठी वाचकांची सोय केलेली आहे. पुस्तकाचे तीन भाग आहेत. प्रथम भागांत श्रीशंकराविषयीं वैदिक प्रमाणांनीं चर्चा केलेली असून त्या चर्चेमध्यें विचार करण्यासारखा बराचसा भाग आहे. अग्नि म्हणजे रुद्र व यज्ञ-संस्थेची प्रतिकृति पुढील उपासनेंत असल्याचें दाखविलें आहे. द्वितीय भागांत पौराणिक समयाची चर्चा असून तृतीय विभागांत भारतांतील प्रसिद्ध अशीं द्वादश ज्योतिर्लिंगें व त्यांचीं स्थानें यांची माहिती आलेली आहे.

या पुस्तकाचा हा तिसरा भागच अति महत्त्वाचा आहे. लेखकानें स्वतः परिश्रमपूर्वक तीं सर्व स्थानें स्वतः अवलोकन करून नंतर त्याविषयीं मिळेल तितकी माहिती ग्रंथद्वारा व इतरत्रही जमा करून नंतर हा भाग तयार केलेला असल्यानें त्यास स्वानुभवाचें महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

कित्येकांस आपल्या पवित्र भारतांतील धार्मिक व सांस्कृतिक अशा स्थानांची माहिती असावी तशी असत नाहीं. कैलास, मानस, चार धामें सप्तपुऱ्या व द्वादश ज्योतिर्लिंगें आणि यांच्या आसपासचीं पवित्र स्थानें हीं आपलीं अत्यंत पवित्र अशीं तीर्थक्षेत्रें असून आपल्या धर्माचा, संस्कृतीचा व सभ्यतेचा इतिहासही वरील पवित्र स्थानीं घडलेला असल्यानें प्रत्येकानें वरीलपैकीं शक्य तीं स्थानें पहाणें पुण्यकारक असल्याचें आपलें धार्मिक अनुशासन आहे. व तें योग्यच आहे. परन्तु तीं स्थानें कोठें आहेत, कशीं आहेत वगैरेंचें ज्ञान प्रत्येकास असत नाहीं. ही उणीव बारा ज्योतिर्लिंगांच्या बाबतींत तरी या पुस्तकानें दूर झालेली आहे. पुस्तकांत अवश्यक माहितीबरोबर चित्रेंहि दिलेलीं असल्यानें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडलेली आहे. असल्या विषयासंबंधीं मतभेद

स्वाभाविक असल्यानें, ते वजा केल्यावर एकंदर पुस्तक सग्राह्य व वाचनीय आणि विचारप्रवर्तक असें झालें आहे. जीविकेचे नित्य व्यवसाय संभाळून असलें पुस्तक लिहिणें कष्टसाध्य असतें म्हणून ग्रंथकर्ता प्रशंसेस पात्र आहे. तीर्थक्षेत्रप्रेमी धार्मिक सुजन व इतर वाचनप्रेमी लोक ग्रंथकर्त्याच्या परिश्रमाचें कौतुक करतीलच. श्रीशंकराच्या कृपेनें ग्रंथकाराच्या हातून असलीच उपयुक्त धार्मिक साहित्यसेवा उत्तरोत्तर अधिक व्हावी अशी सदिच्छा धारण करणारा

वेदाश्रम
डोंबिवली, ठाणें. } बालस्वामी

॥ श्री ॥

# ज्योतिर्लिंग

## वेदकाल

मराठी ग्रं... दा. ७३६...

इमा॑ रु॒द्राय॑ त॒वसे॑ कप॒र्दिने॑ क्ष॒यद्वी॑राय॒ प्र भ॑रामहे म॒तीः ।
यथा॑ नः॒ शमस॑द् द्वि॒पदे॒ चतु॑ष्पदे॒ विश्वं॑ पु॒ष्टं ग्रामे॑ अ॒स्मिन्नना॑तुरम् ॥

ऋ० । १-११४-१

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांत वरील ऋचेत रुद्र देवतेची प्रार्थना केली आहे. बलवान् जटाजूटधारी आणि अखिल वीरांचें निवासस्थान अशा रुद्राची आम्ही बुद्धिपुरःसर प्रार्थना करितों. आमच्या पुत्रपौत्रादिकांचें आणि आमच्या चतुष्पाद प्राण्यांचें कल्याण कर. त्यांना सुखी ठेव. या प्रार्थनेचा चमत्कार असा झाला कीं, विश्व पुष्ट झालें आणि ह्या गांवांत आतुर म्हणजे व्याधिग्रस्त असे कोणीही उरले नाहींत. वरील ऋचेंत मंत्राचे तीन चरण प्रार्थना आहे. ती केल्यानें फलश्रुति काय मिळते ती चवथ्या चरणांत दर्शविली आहे. वेदकालीं मंत्रांत शक्ति असते हें यावरून दिसतें. रुद्राची ही प्रार्थना आहे. रुद्र म्हणजे पुरा पेटलेला अग्नि. ह्या रुद्राचीं दोन शरीरें आहेत,अग्निस्वरूप आणि पूरा पेटलेला अग्नि. ह्यालाच शिवस्वरूप म्हणतात. तो कल्याण करणारा आहे, त्याचप्रमाणें तो प्रखर पराक्रमी आहे. या पराकाष्ठेच्या स्वरूपास रुद्राध्यायांत प्रथम नमन केलें आहे. या शिवस्वरूपाचें लिंगपूजन प्रचारांत आलें. शिवाचें लिंग कां हाच प्रश्न पुढें विस्तारानें चर्चिला आहे. मुख्य शिवलिंग म्हणजे ज्योतिर्लिंग.

आर्यावर्तांत बारा ज्योतिर्लिंगें आहेत. ही लिंगें स्वयंभू म्हणजे अपूर्व रीत्या निर्माण झालीं. ज्योतिर्लिंगांशिवाय दुसरीं स्वयंभू लिंगें आहेत आणि त्यांची महति ज्योतिर्लिंगाप्रमाणेंच मानिली आहे. गोकर्णमहा-

बळेश्वर, अमरनाथ, वैद्यनाथ (बंगाल) हीं लिंगें ज्योतिर्लिंगाप्रमाणेंच अपूर्व मानिलीं आहेत. याशिवाय दुसरीं अनंत स्वयंभू लिंगें आहेत. त्यांची परंपराहि अपूर्व अशीच आहे. ज्योतिर्लिंगें हीं शिवाचीं मुख्य वसतिस्थानें आहेत. भरतभूमीच्या उत्तर दक्षिण मध्यरेषेंत थोड्या फार अंतरावर हीं सर्व स्थानें आहेत.

ज्योतिर्लिंगें पुराणकालचीं आहेत, त्यांचा उल्लेख वैदिक वाङ्मयांत आढळत नाहीं. वेदकालीं पंचमहाभूतांची प्रार्थना असे. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांची महति गाण्यांत येत असे. वेदकालीं पंचमहाभूतांची महति गायली जात असे, ती मुख्यतः यज्ञामध्यें गाइली जात असे. यज्ञांत द्यावयाच्या आहुति त्या त्या देवतांच्या नांवाचे मंत्र म्हणून दिल्या जात असत. यज्ञक्रिया योग्य प्रकारें साधावी म्हणून नक्षत्रांची माहिती करून घेऊन यज्ञाला योग्य काल ठरविण्याचें साधन तयार करण्यांत आलें. यालाच ज्योतिषशास्त्र म्हणतात. यज्ञक्रियेमुळें दुसरीं अनेक शास्त्रें जन्मास आलीं. वेदी तयार करण्यांत रेखाशास्त्र तयार झालें. सूक्तांच्या स्वरयुक्त म्हणण्यानें छंदःशास्त्र निर्माण झालें. त्याचप्रमाणें पुराणकालच्या लिंगपूजेपासून म्हणजे मूर्तिपूजेपासून कांहीं शास्त्रांचा उदय झाला. मूर्तिपूजेबद्दल कांहीं आक्षेप असले तरी कांहीं फायदेहि झाले हें लक्षांत घेतलें पाहिजे. कवित्व, शिल्पकला, गान, वाद्य वगैरे कलांचा उगम मूर्तिपूजेमुळें झाला. सेतुबन्धरामेश्वर, मीनाक्षी, सुंदरेश्वर, तिरुपति या देवालयांचीं कामें पाहून आधुनिक शिल्पशास्त्रज्ञ तोंडांत बोटें घालतात. अशा देवालयांच्या निर्मितीला मूर्तिपूजा कारण आहे. भाविक उपासकांना प्रेमळ शब्दांत गातांना ऐकून सामान्य जनांस धर्माचें वळण लावण्यास मदत होते. बदरीनारायणास आम्हीं हा देखावा पाहिला. तामिळ भाषा जरी आम्हांस अपरिचित होती तरी या भाषेंत प्रेमानें नारायणाची स्तुति प्राचीन तत्त्वज्ञानानें सजविलेल्या काव्यांत गातांना ऐकून आमच्या भावना उचंबळल्या. नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले.

नोंद. नं. १०२८८



अशाच प्रकारचा अनुभव रामलीला, कृष्णलीला वगैरे देवतांचीं कर्णमधुर गीतें ऐकून भाविक जनांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहतात हें आपण पाहतों. भाविक लोक प्रवासाचीं साधनें नसतांहि लांबलांबचे प्रवास करण्यास उद्युक्त होतात. अशा यात्रेकरूंकरितां ठिकठिकाणीं धर्मशाळा, सदावर्तें व इतर सोयी मूर्तिपूजेमुळेंच निर्माण झाल्या. यात्रेकरूंना नदीकांठीं स्नानाकरितां मोठमोठे घाट मूर्तिपूजेनें निर्माण केलेल्या धर्मभावनेनेंच तयार झाले. श्री अहिल्याबाई होळकर आणि कालीकमली बावा यांचीं उदाहरणें पाहून धर्मभावना कशा उचंबळल्या होत्या याची साक्ष पटते. वैदिक कालीं यज्ञ करणें आणि त्याप्रीत्यर्थ धनखर्च करणें रूढ होतें. यज्ञयाग मागें पडल्यावर त्या धनाचा प्रवाह दानधर्माकडे वळला. मुख्य मुख्य क्षेत्रीं जाऊन दैवदर्शन घेणें हें अत्यंत श्रेष्ठ कर्तव्य आहे. त्यामुळें हजारों लोक यात्रा करण्यास प्रवृत्त झाले. साधनें नसतांहि अतिबिकट मार्गाच्या प्रवासास लोकांना उद्युक्त करण्यांत आलें. पवित्र क्षेत्रांच्या दर्शनानें "अश्वमेधाधिकं पुण्यम्" प्राप्त होतें, अशी भावना निर्माण करण्यांत आली. प्रवासाचे हाल, द्रव्याचा व्यय आणि दर्शनाची भीड यांची पर्वा न धरतां धर्मश्रद्धेमुळें हें सर्व सहन करण्यांत भाविक लोक आनंदच मानितात. या भावना लोकांत उत्पन्न करण्यास मूर्तिपूजा कारण झाली असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. अव्यक्तोपासना आचरण्यास सामान्य जनांस कठीण असतें.

क्लेशोऽधिकरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्

गीता १२ । ५

श्रीकृष्णानें अव्यक्तोपासना किंवा निर्गुण उपासना करण्यांत क्लेश आहेत, म्हणून व्यक्तोपासना किंवा सगुण उपासना करणें बरें असा आपला संकेत वरील गीतावचनांत दर्शविला आहे मूर्तिपूजा प्रचारांत आणण्यास पुराणकारांनीं याचा आधार घेतला असावा. सारांश, मूर्तिपूजेमुळें कलांचा उगम होऊन लोकांना धार्मिक वळण लाविलें व त्यांच्या ठिकाणीं धाडसवृत्ति निर्माण केली हें जरी खरें आहे, तथापि मूर्तिपूजेमुळें वैदिक कालचे

तत्त्वज्ञान लुप्त झाले. ज्या ज्ञानामुळें आर्यांना जगतांत आदर होता तें तत्त्व-ज्ञान कमी दर्जाचें मानण्यांत आलें. तत्त्वज्ञान ग्रन्थांची निर्मिति बंद पडली. यज्ञाच्या व्यवस्थेचीं कामें स्मृतींतून नाहींशीं झालीं आणि देवालयांची भरभराट झाली. देवस्थानास मोठमोठ्या देणग्या मिळूं लागल्या. त्यामुळें तीं संपन्न झालीं. लक्षावधि रुपयांचे दागदागिने मूर्तींना घालण्यांत येऊं लागले. परंतु अशा देवस्थानांच्या संरक्षणाची तजवीज झाली नाहीं. परकी लोकांना या संपत्तीचा मोह उत्पन्न झाला. परकी धाडशी लोकांच्या हल्ल्यापासून देवस्थानें विध्वंस पावलीं. देवस्थानांत अपार संपत्ति असते या समजुतीनें मुलतानचें सूर्याचें मुख्य देवालय जमीनदोस्त झालें. देवा-लयांतील कोशागारें गझनीशहाला समजलीं. काबूलपासून सात आठशें मैल दूर असणारें सोमनाथाचें देवालय गझनीशहा थोड्याशा सैन्यासह येतो आणि मूर्ति फोडून अपार संपत्ति लुटून सुरक्षित परत जातो ही गोष्ट मूर्तिपूजेचा उपक्रम करणाऱ्यास कमीपणा आणणारी आहे. सोमनाथच्या देवालयांतील सोन्याची घंटा व तिला असणारा साखळदंड यांचें वजन दोनशें मण होतें. सोमनाथच्या पूजेकरितां गंगेचें जल आणि काश्मीरच्या नंदनवनांतील ताजीं फुलें रोज येत असत. अशा वैभवाचें हें स्थान यवनां-कडून भ्रष्ट होतें. देवालय लुटून गझनीशहा काबूलला परत जातो. त्याला अडविण्याचें सामर्थ्य त्यावेळीं आमच्यांत नव्हतें हें सिद्ध होतें. मूर्तिपूजे-बद्दल सुशिक्षित वर्ग उदास होता असाहि निष्कर्ष यावरून काढिता येईल. कारण

अग्नौ क्रियावतां देवो दिवि देवो मनीषिणां
प्रतिमा स्वल्पबुद्धीनां योगिनां हृदये हरिः ॥

प्रतिमापूजा किंवा मूर्तिपूजा ही स्वल्पबुद्धीच्या लोकांकरितां आहे. सुशिक्षितांचा देव द्युलोकांत असतो. मूर्तीमध्यें देव असतो ही कल्पना सामान्य जनांची होती. अकराव्या शतकात अल्बेरूणि नांवाचा अरबी प्रवासी हिंदुस्थानांत प्रवास करून गेला. त्यानें ज्या गोष्टी

पाहिल्या त्या लिहून ठेविल्या आहेत. त्यांत तो म्हणतो—Those who study philosophy and theology and who desire abstract truth are entirely free from worshipping, any thing but God alone and would never dream of worshipping an image manufactured to represent Him (Alberuni's India Vol. 1-112 ). दगडाच्या मूर्ति तयार करून त्यांत परमेश्वर आहे अशी सत्य जाणण्याचा प्रयत्न करणारे स्वप्नांत देखील कल्पना करीत नाहींत. यावरून अद्वैत तत्त्व सर्वमान्य होतें असें ठरतें. सुशिक्षित समाज मूर्तिपूजेपासून अलिप्त होता.वैदिककालचे यज्ञयाग मागें पडून त्या ठिकाणीं श्रद्धाळु हिंदुसमाजांत मूर्तिपूजा रूढ झाली. देवस्थानांची भरभराट झाली. देवस्थानें विध्वंस होत होतीं, तरी मूर्तिपूजेची भावना दृढ असल्यानें तीं पुन्हां अगणित खर्च करून बांधण्यांत येत.सामान्य जनता यज्ञयाग करून निर्गुण उपासना सुरू ठेविल असें दिसत नाहीं.निर्वाहाचें साधन निर्माण करण्यास व्यवसाय केले पाहिजेत. ते करीत असतां तत्त्वज्ञान संपादन करण्याकडे दृष्टि ठेवणें सुलभ नाहीं.पाहिले आर्य येथें आल्यावर यज्ञयाग आणि नैमित्तिक ब्रह्मकर्म आचरीत होते. पुढें प्रगति होऊन लोकसंख्या वाढूं लागली. व्यवसाय बदलूं लागले. सर्वांनाच तपश्चर्येत कालक्रमणा चालविणें अगत्याचें नव्हतें. वेदकालीं असा जो व्यवसायी वर्ग होता त्याच्याकरितां प्रार्थनांचे निराळे प्रकार नव्हते, हें उपनिषदांतील जाबालीपुत्राच्या हकीकतीवरून दिसतें. मूर्तिपूजेमुळें सर्वांना प्रार्थना करण्यास साधन प्राप्त झालें म्हणूनच मूर्तिपूजेचा प्रघात सर्वतोपरी यशस्वी होण्यास मदत झाली.

वेदकालीं प्रार्थना कशा प्रकारच्या असत याची माहिती चतुर्वेदांतील आद्य जो ऋग्वेद यांत मिळते. वेदकालीं अर्थात् मूर्तिपूजा रूढ नव्हती.

न यातव इंद्र जुजुवुर्नो न वंदना शविष्ठ वेद्याभिः
स शर्धदर्यो विषुणस्य जंतोर्मा शिश्नदेवा अपिगुर्ऋतं नः ॥

(ऋ. ७-२१-५)

लिंगाची पूजा करणारांकडून यज्ञास विघ्न न पोहोंचो अशी प्रार्थना आहे. शिश्नदेव हे अनार्य होते व त्यांना यज्ञमंडपांत येऊं देत नव्हते. त्यांचा यज्ञाला उपसर्ग लागूं नये म्हणून प्रार्थना करण्यांत येत असे. शिश्नदेव हा अनार्यांतील एक वर्ग असावा किंवा त्यावेळीं अनार्यांना शिश्नदेव संबोधित असावे. सायणाचार्य शिश्नदेव याचा अर्थ 'शिश्नेन दीव्यन्ति क्रीडन्तीति शिश्नदेवाः' असा करितात. विषयलंपट असा अर्थ केला तर विषयलंपटांना यज्ञमंडपांत येऊं देणें किंवा न देणें हें ठरविणें सोपें नाहीं. कारण विषयलंपट किंवा स्त्रीलंपट पुरुष ओळखणें कठीण आहे, म्हणून हा अर्थ येथें संभवत नाहीं असें दिसतें. सारांश, लिंगपूजा अगर प्रतिमापूजा त्या काळीं आर्यांत रूढ नव्हती हें निश्चित ठरतें. वेदकाळीं अग्नि, मरुत् आणि सूर्य या तीन देवता मानिल्या जात होत्या आणि याच देवतांच्या स्तुतींचीं स्तोत्रें संहितारूपानें अवतीर्ण झालीं. वैदिक संस्कृतींत अग्निपूजेस फार महत्त्व आहे. कारण-अग्नि हा देवता वाहून आणितो. अग्निहोत्र हें सर्व कर्माच्या आधीं करावयाच्या कर्मांपैकीं पहिलें कर्म असे. त्रेतायुगांत मंत्रामध्यें ऋषींनीं स्वरूपानें पाहिलेलीं कर्में नियमानें आचरीत जा असा जो उपदेश आहे त्यांत अग्निहोत्र कर्म प्रमुख आहे. जो यजमान अग्नीच्या सप्तजिव्हा जेव्हां प्रकट होतात त्यावेळीं दोन आज्य भागांच्या अवकाशस्थलामध्यें आहुतींचा प्रक्षेप करतो त्याला अग्नि स्वर्गलोकांत घेऊन जातो व त्याचें तेथें मोठ्या आदरानें स्वागत होतें.

न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपः
नानाहिताग्निर्नाविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतः ॥

॥ छां. उ. ५–११–५

त्याकाळीं सामाजिक दिनचर्या कशी होती याबद्दल एका राजानें वर्णन केलें आहे, तें वरील सूत्रांत दाखविलें आहे. पुरुष अगर स्त्रीवर्गांत पंचमहादोष घडत नसत. राज्यांत निरक्षरता नसे. सर्वांनीं अग्निहोत्र

घेतलेले असे. अशा प्रजेचा अभिमान राजे कां बाळगणार नाहींत ! अग्निहोत्र चालविणें हें प्रमुख कार्य असे. अग्नीला हवि अर्पण करून त्याला प्रसन्न करण्यांत येई. अग्नि धर्म रक्षण करणारा आहे, म्हणून अग्नि-सेवा यज्ञरूपानें प्रचारांत होती.

समिधानः सहस्रजिदग्ने धर्माणि पुष्यसि ॥

ऋ. सं. ५-२६-६

अग्नीच्या प्रार्थनेची ही ऋचा आहे. तूं आमचे धर्म वाढविणारा आहेस. धर्म म्हणजे यज्ञादि क्रिया. अग्निपूजा म्हणजे यज्ञ करणें. हाच प्रमुख धर्म होता.

तानि धर्माणि प्रथमान्यासन् ॥

ऋ. सं. १-१६४-५०

यज्ञ करणें हाच प्रमुख धर्म आहे, असें या ऋचेंत वर्णन आहे. वैदिक काळीं अग्निदेवतेचें फार महत्त्व मानिलें होतें असें यावरून दिसेल. इतकेंच नव्हे तर सर्व प्राचीन राष्ट्रांत अग्निपूजेचें महत्त्व फार होतें. हिंदुस्थानांत यज्ञांतील अग्नि परम पूज्य मानण्यांत येतो. यज्ञांत अर्पण केलेला हवि अग्निद्वारें त्या त्या देवतांना पोंचता होतो अशी भावना आहे. अग्नीशिवाय यज्ञाची सांगता होणें अपरिहार्य असल्या-मुळें अग्नीची महति गाइली आहे. सकल देव कल्याणकर्ता असें अग्नीचें बिरुदावल आहे. तसेंच सर्व देवतांत वयानें यविष्ठ म्हणजे लहान आहे. अरणीच्या म्हणजे समिधांच्या घर्षणामुळें प्रत्येक यज्ञसमयीं तो नव्यानें प्रदीप्त होतो म्हणून तो यविष्ठ आहे. याच कारणाकरितां त्याला घर्षणो-द्भव किंवा प्रमंथ हें नामाभिधान प्राप्त झालें आहे. रुद्राध्यायांत 'नमो दूताय च' म्हणून अग्नीला नमस्कार केला आहे. अग्नि म्हणजे रुद्र ही भावना येथें स्पष्ट आहे. रुद्राला दूत म्हणजे अग्नि संबोधिलें आहे. याचें कारण—

अग्निं दूतं वृणीमहे । अग्निर्देवानां दूत आसीत् ॥
त्वं दूतः कविरसी प्रचेता, इति श्रुतिः
अग्निं च विश्वशम्भुवमापश्च विश्वभेषजीः
आपः पृणीत भेषजं वरूथं तन्वे ऽ॒ मम ।
ज्योक् च सूर्यं दृशे ॥

ऋ. १–२४–२१.

अग्नि सर्वांचा कल्याणकर्ता आहे. हे जलनिवासी अग्निदेवा, मला औषध दे आणि शरीरस्वास्थ राहिलें म्हणजे मला चिरकाल सूर्याचें दर्शन घेतां येईल. वरील ऋचेंत अग्निदेव कल्याण करणारा आहे, त्याचप्रमाणें सूर्यदेवतेचें चिरकाल दर्शन हें परम श्रेष्ठ मानलें आहे.

अग्निदेवतेप्रमाणें सूर्यदेवता आर्यांची उपास्य देवता होती. या देवतेची आराधना प्रमुखत्वानें करण्यांत येत असे. ब्राह्मणास मुख्य उपासना सूर्याचीच आहे. गायत्रि–मंत्र हा ब्राह्मणाचा मूळ आधार आहे. उपनयनाचे वेळीं बटूला पहिला मंत्र सांगण्यांत येतो तो सूर्याचाच आहे. ही देवता सर्व विश्वाचें पालनपोषण करिते. अन्नोदक निर्माण करून मनुष्यप्राण्यांचें जीवन सुखकारक करिते. सर्व प्राण्यांचें पालन-पोषण करणारी देवता जगज्जननीपदास पोहोंचली होती. " सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च " असा ऋक्संहितेंत सर्वानुक्रमामध्यें उल्लेख आहे. सर्व देवतांचा अंतर्भाव सूर्यदेवतेंत होतो म्हणून वैदिककालीं ज्या पंचमहाभूतांची प्रार्थना करीत त्यांत सूर्यदेवता प्रमुख होती.

सत्रेधात्मानं व्याकुरतादित्यं तृतियं वायुं तृतियं स एव प्राणस्त्रेधा विहीतः ।

बृह १–२–३

यावरून अग्नीचें रूप सूर्य व त्यांचेंच रूप वायु आहे. म्हणून सूर्यदेवतेंत सर्व देवतांचा समावेश आहे. सूर्यदेवतेची प्रचीति प्रत्ययास येणारी असल्यानें त्याच्या ठिकाणीं देवत्व मानिलें. रामायणाच्या आदिकाव्यांत

युद्धखण्डाच्या १०५ व्या सर्गांत रावण सन्मुख युद्धाला उभा आहे, जयाची शाश्वती नाहीं अशा चिंतेंत श्रीरामचंद्र असतां तेथें अगस्ति मुनींचें आगमन झालें श्रीरामचंद्राच्या चिंतेचें निवारण करण्याकरितां आणि युद्धांत जय प्राप्त होण्याकरितां ज्या मंत्राचा जप करण्याचा उपदेश केला तो मंत्र सूर्याचाच आहे. इतकें महत्त्व सूर्यदेवतेचें मानिलें होतें. म्हणून मंत्रद्रष्टे ऋषींनीं त्याचीच स्तुति गाइली आहे.

विश्वाचा कारभार सुरू झाला. मानव प्राणी पृथ्वीवर निर्माण होऊन अन्नोदकांचा उपभोग घेऊं लागला. परंतु ऋतुमानाप्रमाणें पृथ्वीवर पर्जन्य पडूनच अन्नोदक तयार होणार. पर्जन्य सूर्याप्रमाणें वातावरण खळबळूं न देतां पडत नाहीं. पर्जन्याला इतर पंचमहाभूतांची सहाय्यकता लागते. त्यामुळें मेघगर्जना, मरुत्कोप व त्यामुळें पृथ्वीवर व समुद्रांत घडणारे प्रक्षोभ विद्युत्पात व त्यामुळें घडणारे उल्कापात, भूकंप वगैरे अनर्थ यांचे मानवी जीवनावर जेव्हां आघात झाले तेव्हां त्याचा परिहार कसा करावयाचा इकडे वेदकालीन ऋषींची दृष्टि वळली. अन्नोदक निर्माण होण्यास हे अनर्थ अपरिहार्य असले, तथापि ज्या प्रचंड शक्तीमुळें ही घटना सुरू होते त्या अद्भुत शक्तीच्या उपासनेची प्रथा सुरू झाली. आद्य मंत्रद्रष्ट्यांनीं या शक्तीस संहारक शक्तिदेवता किंवा मरुत् देवता मानली. या संहारक शक्तीला रुद्रदेवता असेंही आणखी नांव दिलें आणि तिची स्तुति गाइली. या रुद्रदेवतेची स्तुति ऋग्वेदांत रुद्र या संज्ञेनें वर्णिली आहे. संहितेंत रुद्रदेवतेचे मंत्र आहेत. हीच ती तिसरी देवता.

ही तिसरी देवता मरुत् किंवा रुद्र प्रखर शौर्याची मानिली आहे. ह्या देवतेचें स्वरूप भयानक जरी भासलें तरी प्रार्थनेच्या स्वरूपाप्रमाणें तिचें स्वरूप बदलतें. प्रार्थनेनें तिचें स्वरूप शिव म्हणजे कल्याण करणारी अगर पशुपति म्हणजे सर्व प्राणिमात्रांचें पोषण करणारी असें होतें. म्हणून या देवतेच्या प्रार्थना निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या प्रकारांनीं करावयाच्या असतात. या प्रार्थना रुद्राध्यायांत वर्णिल्या आहेत. रुद्राचे मंत्र संहि-

तेंतील आहेत. या मंत्रांचा उपयोग जप करण्याकरितां होतो. योगाभ्यास करणारांना धारणा, ध्यान, समाधि या एकापेक्षां एक वरच्या अवस्थांत जावयाचें असतें. या अवस्थांतून योग्य प्रकारें जाण्याकरितां कोणत्या जपाचा आधार घ्यावा असा प्रश्न जाबाल उपनिषदांत विचारिला आहे. त्याला रुद्राचा जप करावा असें उत्तर दिलें आहे. संहितेंतील मंत्र यज्ञकार्य करण्यासाठीं आहेत. तथापि नीट अर्थ समजून म्हणतांच त्यांचा जपाकडे उपयोग करितां येतो. हें वरील उपनिषदाच्या उत्तरांत दर्शविलें आहे. सूर्यदेवता प्राचीन आर्यांस जितकी पूज्य झाली तितकीच किंबहुना भीतीमुळें रुद्रदेवता अधिक पूज्य झाली. म्हणून आर्यांचें मुख्य उपासनाकर्म जें यज्ञकार्य त्या ठिकाणीं या देवतेची स्थापना करण्यांत आली. कारण यज्ञांतील अग्नि प्रदीप्त झाल्यावर त्याचा ताप असह्य असतो. तथापि इष्टकार्यसिद्धि प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं असतें. रुद्रदेवतेचें सामर्थ्य असेंच आहे. रुद्रदेवतेला प्रसन्न करून शिव प्राप्त करून घेतां येतें. रुद्राध्यायांतील मंत्रांत या रौद्र देवतेनें आम्हांस न मारतां आमचें रक्षण करावें अशी प्रार्थना आहे. या देवतेच्या हातांत सहस्र आयुधें आहेत. त्याचा उपसर्ग आम्हांस होऊं नये.

" प्रमुञ्च धन्वनस्त्वमुभयोरार्त्नियोज्याम् " या मंत्रांत धनुष्याच्या दोन्ही टोंकांची दोरी ढिली कर. हे भगवन्, तुझ्या हातांत जे बाण आहेत ते बाजूस ठेव, अशी प्रार्थना आहे. शस्त्र धारण करणारी देवता पाहून मनुष्याच्या अंतःकरणांत भीति उत्पन्न होते म्हणून हें क्रूर दैवत मानिलें जातें. येथें क्रूर शब्दाचा अर्थ प्रखर पराकाष्ठेचें शौर्य असा आहे. रुद्राध्यायांतील नमकाच्या पहिल्या अन्वकांत रुद्राच्या प्रखर शौर्याचा उल्लेख आला आहे. तो प्रसंग त्रिपुर—संहाराचा होय. त्रिपुरांचा एकाच बाणानें संहार करणाऱ्याचा पराक्रम परमावधीचा असला पाहिजे; तरच एका बाणानें तीन लोकांतील पुरांचा छेद होणार. इतकी ही देवता प्रखर पराक्रमी आहे. त्यावेळीं या देवतेला युद्धसाहित्य पुरविण्यांत सर्व देवांनीं

मदत केली. बाण तयार करून तो रुद्राच्या हातीं दिला. बाण सज्ज होतांच त्याच्या विशालत्वामुळें सारें त्रिभुवन डळमळूं लागलें व जनता भयाकुल झाली. पुष्पदंतानें आपल्या सुप्रसिद्ध महिम्न काव्यांत या युद्धसाहित्याची माहिती स्कन्दपुराणातून घेऊन वर्णन केली आहे. तो म्हणतो—

रथः क्षोणीयंता शतधृतिरगेंद्रो धनुरथो ।
रथांगे चंद्रार्को रथचरणपाणिः शर इति ॥ महिम्न १८

पृथ्वीचा रथ, ब्रह्मदेव सारथी, मेरुपर्वताचें धनुष्य, चंद्र सूर्य रथांचीं चाकें आणि प्रत्यक्ष विष्णूचा बाण करून तें धनुष्य रुद्राच्या हातांत दिलें. रुद्रानें आपल्या पराकाष्ठेच्या शौर्यानें एका बाणानें त्रिपुरांचा संहार केला. रुद्राध्यायांत, ब्राह्मणग्रंथांत आणि स्कन्दपुराणांत त्रिपुरांची हकीगत एकच आहे. ब्राह्मणग्रंथांत त्रिपुरांच्या संहाराची रुद्रप्रार्थना आहे. ती रुद्राची म्हणजे पूर्ण पेटलेल्या यज्ञाची असून रुद्रस्वरूपाचें शिवस्वरूप आणि पशुपतीस्वरूप मानिलें आहे. रुद्राची प्रार्थना म्हणजे पूर्ण प्रज्वलित झालेल्या अग्नीची होय. ही प्रार्थना यज्ञांतील अग्निसन्मुख करण्यांत येत असे. वेदकालीं ज्या प्रकारच्या प्रार्थना होत असत त्याच पद्धतीच्या प्रार्थना संहिताकालीं चालू होत्या असें ऋक् संहितेवरून दिसतें.

वृष्णे शर्धाय सुमखाय वेधसे नोधः सुवृक्तिं प्रभरामरुद्भ्यः ॥
ऋ. सं. प्रथमाष्टक ६

हे नोधमुने, मनोरथ पूर्ण करणाऱ्या उत्कृष्ट यज्ञस्वरूप आणि उत्पादक अशा मरुद्गणांचें तूं चांगलें स्तवन कर. सर्व मनोरथ पूर्ण करणारी देवता यज्ञस्वरूप आहे हें ठरतें. ज्याची उपमा द्यावयाची तें पद श्रेष्ठ असतें. मरुद्गणांचें स्वरूप यज्ञरूपी मानिलें आहे; यावरून यज्ञस्वरूप अत्यंत श्रेष्ठ ठरतें. उत्कृष्ट अशा यज्ञस्वरूपाचें स्तवन करणें म्हणजे रुद्राचें स्तवन करणें आहे. रुद्र हा सर्व संस्कार होऊन पेटलेला अग्नि

आहे. त्याच्याजवळ बसणारांना तो तापदायक होऊन रडावयास लावणारा तो रुद्र म्हणजे अग्नि. तो उत्पन्न होतो तेव्हां संपूर्णपणें पेट-लेला असतो. वत्स जन्मतांच स्तनपानाची इच्छा करतो: त्याप्रमाणें अग्नि रूपी रुद्र उत्पन्न झाला कीं त्याचें लक्ष आपला भाग घेण्याकडे असतें. त्याला आहुति जर दिली नाहीं तर अध्वर्यु आणि यजमान यांना भक्षण करण्यासाठीं प्रवृत्त होतो. म्हणून शत रुद्रीयाला अनुसरून हवन करावें आणि त्याला भाग देऊन शांत करावें.

यज्ञयाग करणें हें आर्यांचें प्रार्थनेचें मुख्य साधन होतें. हिंदुस्थानांत आर्य येण्यापूर्वी ते हिंदुकुश पर्वतापलीकडे होते. तेथें त्यांना युद्ध करावें लागलें. आर्यांचा मुख्य नायक दिवोदास हा इंद्राचा फार आवडता होता. रुद्र इंद्र आणि विष्णु या महनीय नायकांनीं दिवोदासाला मदत करून युद्धांत जयश्री प्राप्त करून दिली.आर्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केल्यावर या महनीय नायकांची स्मृति राहावी म्हणून त्यांना देव मानून त्यांच्या पराक्रमाचें अनेक प्रकारें वर्णन केलें. त्यांच्या प्रीत्यर्थ यज्ञयागादि करून त्यास संतुष्ट करण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांच्या पुढील पिढ्यांतील लोकांनीं हीच परंपरा पुढें चालू ठेवली. आर्य या महनीय नायकांच्या मदतीची नेहमीं अपेक्षा करीत. ह्यांच्या पराक्रमाच्या तोलाचीं जीं पंच-महाभूतें त्यांस आपल्या पूर्वजांच्या ठिकाणीं मानून त्यांची प्रार्थना व स्तुति करण्यासाठीं प्रासादिक व अर्थपूर्ण अशीं सूक्तें रचिलीं. पूर्वजांना संतुष्ट करणाऱ्या प्रार्थना यज्ञरूपानें होत असत. या सूक्तांचा समावेश वेदांत करण्यांत आला. सर्व वेदांतील अग्रगण्य जो ऋग्वेद त्याचीं दहा मंडळें आहेत. पाहिलें व शेवटचें अशीं दोन मंडळें भिन्न भिन्न ऋषींनीं रचिलीं. भृगुकुलोत्पन्न गृत्समद व त्यांचे वंशज यांनीं दुसरें मंडळ रचलें. विश्वामित्रानें तिसरें, वामदेवानें चवथें, अत्रीनें पांचवें, भारद्वाजानें सहावें व सातवें, कण्वानें आठवें आणि अंगिरसानें नववें याप्रमाणें रचना झाली. हे ऋषि मंत्रद्रष्टे होते. ईश्वर एकच आहे ही भावना यांत स्पष्ट आहे. त्यांची पुढील प्रजा याच ऋषींचीं नांवें घेत असल्यानें वेद-

कालानंतर तीन हजार वर्षांच्या कालांत त्याच त्याच ऋषींचीं नांवें पुन्हां पुन्हां आलेलीं आढळतात. सर्व ऋषींच्या प्रार्थना अग्निद्वारें यज्ञकर्मरूपानें होत असत.

वित्वा ततस्रे मिथुना अवस्यवो व्रजस्य साता गव्यस्य
निःसृजः सक्षन्त इन्द्र निःसृजः
ऋ. मं. १ सू. १३१.

गोधन प्राप्त होण्याकरितां यजमान व त्याची पत्नी इन्द्राला हवि अर्पण करीत. हें यज्ञकर्मच होतें. इन्द्र महनीय नायक असल्यानें त्याची प्रार्थना आहे. तथापि इन्द्र म्हणजे विष्णु आणि विष्णु म्हणजे सूर्य मानण्यांत येई. ऋग्वेदमंडल १-१५५ मध्यें ईश्वराच्या स्वरूपाबद्दल वर्णन आहे. हा विश्वाधिपति, भक्तरक्षक- उदार व कृपाळू आहे. त्यानें तीनच पावलांनीं भूलोकाचें आक्रमण केलें. असें सूर्यरूपी विष्णूचें वर्णन आहे. ऋग्वेद मं. १० सूक्त ८२ मध्यें ईश्वर एकच आहे, हें स्पष्ट केलें आहे. सर्व स्रष्टा श्रेष्ठ होय. त्यानें सर्व विश्व उत्पन्न केलें. तो सर्वांचें पोषण करितो. तो सर्व वस्तुमात्रांचा अधिपति आहे. तो सर्व मानवकुलास जाणतो व पदार्थमात्रास जाणतो. त्याला अनेक नांवें आहेत. तरी तो एकच आहे, अशी प्रार्थना आहे. यज्ञकर्मांत पुरुषांबरोबर स्त्रियाहि भाग घेत असत. स्त्रियांतहि मंत्रद्रष्ट्या स्त्रिया होत्या. पुरुषांबरोबर स्त्रियांनाहि यज्ञकर्मांत ठराविक कामें असत. यजमानाबरोबर वेदीजवळ बसून हवि अर्पण करण्यांत स्त्रियाहि मदत करीत असत. यज्ञकर्माला निराळा असा कांहीं थाट मांडण्यांत येत नसे. हें नेहमींचें कृत्य असल्यानें घरच्या घरीं होत असे. स्वतः यजमान अध्वर्यु होण्याला पात्र असे. यजमानपत्नीहि भाग घेण्यास पात्र असे, त्यामुळें हीं कृत्यें यजमान आणि त्याची पत्नी स्वतः करीत असत. बौद्धिक आणि सामाजिक प्रगति पुरुष आणि स्त्रिया यांची त्याकाळीं सारखीच होत होती.

यज्ञ म्हणजे यजनीय पूजनीय. यज्ञस्वरूपी परमेश्वर ही भावना आजहि आहे. यज्ञ आणि अग्नि यांचा निकट संबंध आहे. संस्कार होऊन अग्नि

तयार झाल्याशिवाय यज्ञकार्य होत नाहीं.अग्नि,यज्ञ आणि परमेश्वर एकच. यज्ञाच्या शिवाग्निकार्यांत अग्नि, मरुत् व सूर्य या मुख्य देवता आहेत. यज्ञक्रिया या त्रयीवरच अधिष्ठित आहे. यानेंच इष्ट सिद्धि प्राप्त होते. या त्रयीचें महत्त्व प्राचीन कालापासून मानिलें आहे. यालाच उत्पत्ति, स्थिति आणि लय असेंहि म्हणतात. विश्वांतील सर्व दृश्यादृश्य वस्तु या त्रयींच्या प्रत्येक अवस्थेंतून जाऊन शेवटीं सूर्यलोकीं जातात. यालाच मोक्ष ही संज्ञा आहे. मृगशीर्षाचा रुद्रानें छेद करितांच वसंत-संपातास आरंभ झाला. अर्थात् वसंताचा स्वामी विष्णु, वर्षाकालाचा स्वामी रुद्र आणि मृगरूपानें आलेला प्रजापति किंवा ब्रह्म या तिघांचा दर्शक तो त्रिमूर्ति यालाच वेदांत तिष्टय म्हटलें आहे. ब्रह्मा, विष्णु महेश;स्थूल, सूक्ष्म आणि कारण; सत्त्व;रज आणि तम; व्यष्टि; समष्टि आणि परमेष्टि;तीन लोक तीन अवस्था अशा त्रयी परमेश्वरस्वरूपी मानिल्या आहेत. त्रयीची कल्पना आपल्याप्रमाणें इतर देशांतहि एक समयावच्छेदेंकरून अस्तित्वांत होती. ग्रीस, रोम, इजिप्त केल्ट, चीन, गॉथ, ड्रुइड, मेक्सिको, इराण वगैरे देशांत त्रयीची कल्पना प्राचीन काळापासून आहे. याला ट्रिआंड किंवा ट्रिनिटि असें नांव आहे. झोरास्ट्रियन अग्नि उदक आणि सूर्य या त्रयीच्याद्वारें देवाधिदेव आहुर-मझ्दाची प्राप्ति होते असें मानितात. बुद्ध धर्मालाहि त्रयीचें महत्त्व पटलें होतें. बुद्ध, धर्म आणि संघ या त्रयीला प्रत्येक बुद्धानुयायी माणसानें शरण गेलें पाहिजे अशी सक्त आज्ञा आहे. सम्राट् अशोक यानें उभारलेल्या स्तंभावर या आज्ञेचा उल्लेख आहे. सारांश पूर्णत्वास पोहोंचण्यास या तीन अवस्थां-तून जावें लागतें. हल्लीं कोणताहि कायदा पास होण्यास तो तीन अवस्थांतून जावा लागतो. पार्लमेंटमध्यें एकादें बिल पास व्हावयाचें म्हणजे तें कॉमन्स सभेंतून लॉर्डांच्या सभेंत व नंतर राजाकडे जातें. आपल्या विधि-मंडळांत देखील प्रत्येक बिल त्रिवार पास व्हावें लागतें. तेव्हां त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. सूर्यरूपी विष्णुस्वरूप किंवा मोक्ष प्राप्त करून घेणें म्हणजे यज्ञस्वरूपी परमेश्वराची प्रार्थना यज्ञद्वारा करणें वेदकाळीं रूढ होतें.

वेदा हि यज्ञार्थमभिप्रवृत्ताः ( वे. ज्यो. ५ ). वेद यज्ञ सांगण्यासाठीं

प्रवृत्त आहेत. वेदानें सांगितलेले विधि कसे करावयाचे, कोणी करावयाचे, कधीं करावयाचे यांचें यथासांग ज्ञान संपादन करून मग तो विधि पार पाडून अपूर्व निर्माण करावयाचें. यालाच कर्मकाण्ड म्हणतात. विधींचें यथासांग आचरण करणें दुर्घट असतें. कर्मांत यत्किंचित् दोष घडल्यास नरकवास वगैरे आपत्ति भोगाव्या लागतात अशी भावना होती. एक यज्ञ करणें म्हणजे प्रत्येक वेदाचे चार चार याप्रमाणें सोळा ऋत्विज, यजमान व पत्नी असे अठरा यज्ञकर्मांत प्रमुखत्वानें असणारे लोक होत. कर्म यथासांग होणें म्हणजे या कडबोळ्यांतील निरनिराळ्या प्रकृतींच्या मनांचा एकजीव साधणें अशक्य व्हावयास लागलें. यज्ञकर्माच्या परंपरेंत वेद-कालीन तिसरी देवता जी रुद्र त्या देवतेच्या प्रसन्नतेसाठीं यज्ञ करून त्याला हवि अर्पण करणें आवश्यक कर्म होतें. रुद्रदेवतेचें स्वरूप जरी भयानक मानिलें आहे तरी तें शिव म्हणजे कल्याणप्रद स्वरूपांत येतें. शिवस्वरूपांत कसें येतें हेंहि दाखविलें आहे. " असौ यस्ताम्रो स दृष्टो मृडयाति नः " या मंत्रांत तें स्पष्ट केलें आहे. दुपारीं प्रखर असणारा सूर्य सायंकाळीं शीतल कोमल असा होतो. तो आपण पाहूं शकतों. त्याच-प्रमाणें रुद्राचें उग्रस्वरूप कोमल होतें. मनुष्याच्या मनांत एकाद्या प्रसंगाची भीति उत्पन्न झाली म्हणजे त्याचा थरकांप होतो. थोड्या वेळानें हा भय-कारक प्रसंग निघून गेला, ख बिंदूचा सूर्य खालीं क्षितिजाकडे वळला, कीं त्याची भीति कमी होते. भयकारक प्रसंग जाऊन शांततेचा काल निर्माण होतो त्याप्रमाणें रुद्रस्वरूपाचें शिवस्वरूप रुद्राच्या प्रार्थनेंतच शिवस्वरूपाची प्रार्थना केली आहे. रुद्ररूप आणि शिवरूप हीं एकच आहेत अशी स्पष्ट कल्पना यांत आहे. निरनिराळ्या प्रसंगाचा शीतलपणा अगर भयानकपणा जसा असेल त्याप्रमाणें देवतेला शिव अथवा रुद्र स्वरूप प्राप्त होतें. ही कल्पना प्राचीन अगर अर्वाचीन वाङ्मयांत स्पष्टपणें दिसून येते.

यज्ञकर्म निरनिराळ्या प्रकृतींच्या अठरा माणसांकडून व्हावयाचें असतें. कर्मांत यत्किंचित् दोष घडल्यास कर्मफलाचा भंग होतो ही भीति होती. तशांत इष्टसिद्धि प्राप्त झाली तरी त्याचें प्रत्यक्ष फल अनुभवणें अशक्य

होतें. यज्ञकर्म यथासांग पूर्ण होऊन यजमान मोक्ष प्राप्त करून घेतो ही कल्पना अनुभवास आणितां आली नाहीं.प्रथमतः विधीचें संपादन व फल-प्राप्ति मात्र कालांतरानें होणार आणि तीहि अनुभवास न येणारी. अशी स्थिति प्राप्त झाल्यानें ज्ञानी पुरुषांस ही कल्पना पटली नाहीं. मोक्ष प्राप्त करून घेण्यास यज्ञाचा म्हणजे कर्मकाण्डाचा उपयोग अपुरा वाटूं लागला. परमेश्वराचें शुद्ध स्वरूप जाणण्याचे मार्ग कोणते याचा विचार सुरू झाला. परमेश्वराचें स्वरूप आणि जीवात्मा यांचा संबंध आहे. आत्म्याला परमा-त्म्यांत विलीन होतां येतें असा अनुभवानें सिद्धांत ठरविण्यांत आला. आत्मस्वरूपी होणें हाच मोक्ष. मनुष्यजन्माची ही परमावधि आहे आणि हीच उन्नति आहे. कर्मकांडानें मिळणारें फल अनुभवणें अशक्य मानून ज्ञानी पुरुषास यांच जन्मीं परब्रह्मस्वरूप अनुभावितां येतें. परब्रह्म जाण-ण्याच्या विद्येला परा विद्या, आणि वेद आणि वेदानें सांगितलेले विधि जाणण्याच्या विद्येला अपरा विद्या म्हणतात. या दोन विद्यांत विशेष हा आहे कीं, अपरा विद्येंतलि विधि करीत असतां विधिवाक्याचें अर्थज्ञान होतांच इष्ट कर्माचा व फलाचा अधिगम होत नाहीं. परंतु परा विद्येची गोष्ट निराळी आहे. वाक्याच्या अर्थाचें ज्ञान होतांक्षणींच पुरुषार्थ सिद्ध होतो ज्ञानी पुरुषांनीं हा अनुभव घेतला तो उपनिषत्काल होय. वैदिक कालीं प्रचारांत असलेलें यज्ञकर्म व त्याचें परमेश्वरस्वरूप यांत बदल होऊं लागला. कर्मकाण्ड कमी प्रतीचें मानून पराविद्येकडे ज्ञानी पुरुषांचें मन वळलें.

येथपर्यंत आर्यांमध्यें मोक्षप्राप्तीचे दोन मार्ग तयार झाले. वेद-विहित कर्में आचरून पुरुषार्थ साधणें आणि उपनिषदांतील परा विद्येनें ज्ञान प्राप्त करून घेऊन आत्मा परमात्म्यांत विलीन करणें या दोन मार्गांनीं जाऊन इष्टसिद्धि प्राप्त करून घेणें सामान्य जनांस दुर्घट झालें. यज्ञकर्माच्या विधींचे कडक निर्बंध पाळणें अडचणीचें वाटूं लागलें. ज्ञानप्राप्तिकरतां देखील “ अचीर्णव्रतः एतत् न अधीते ” वागून ब्रह्मप्राप्ति करून घेणें

अशक्य झालें. उपनिषदांनीं यज्ञकर्माची महति कमी केली, तथापि वेदांतील तत्त्वज्ञान कायम ठेविलें. वेदांतील तत्त्वज्ञानावरच आपला विस्तार केलेला आहे. उपनिषदांनीं वेदांतील तत्त्वज्ञान सविस्तरपणें मांडिलें आहे. वेदांतील तत्त्वज्ञान, प्रार्थना आणि भक्ति कायम राखिली. तथापि योगसाधन प्राप्ती-करितां कडक निर्बंध पाळून खडतर तपश्चर्या करण्याचे कष्ट सोसण्याची जनतेंत स्वाभाविक वृत्ति नसल्यानें यज्ञकर्म आचरण्यासच प्राधान्य मिळालें.

यज्ञसंस्था कायम राहिली. यज्ञस्वरूपाचें यथार्थ ज्ञान कायम होतें. यज्ञाचें रुद्रस्वरूप आणि रुद्राचें शिवस्वरूप ही भावना कायम होती. रुद्राचें मुख्य अधिष्ठान यज्ञ आहे. यज्ञाचा आणि मरुत् आणि सूर्य यांचा संबंध दृढ असल्याची कल्पना कायम होती. त्याच कल्पनेचा पुढें विस्तार होऊन आर्यांचें मुख्य प्रार्थना–स्थान जें यज्ञ त्याचें परिवर्तन करण्यांत आलें. यज्ञकर्मानें पुरुषार्थ साधणें अगर ज्ञानप्राप्तीनें ब्रह्म जाणणें हे मार्ग अनुल्लं-घनीय झाल्यानें दुसरा कांहींतरी मार्ग प्रार्थनेसाठीं पाहिजे. म्हणून यज्ञाच्या ठिकाणीं प्रतीक स्थापून त्याची प्रार्थना सुरू झाली.

---

# पुराणकाल

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥ वि. पु.

वेदविहित कर्मे आचरून पुरुषार्थ साधणें आणि तपश्चर्येनें ज्ञान प्राप्त करून ब्रह्मपद मिळविणें हे परमेश्वरप्राप्तीचे दोन मार्ग होते. या दोन मार्गानीं परमेश्वरप्राप्ति करून घेणें सामान्य जनांस दुर्घट झालें. यज्ञ-कर्मांच्या विधींचे कडक नियम पाळणें आणि ज्ञानप्राप्तीसाठीं खडतर तपश्चर्या करणें अशक्य झालें. व्यवहारी माणसांस सुलभ रीतीनें प्रार्थना करितां येतील असे मार्ग प्रचारांत आणण्यास पुराणकारांनीं प्रयत्न केले. विष्णुपुराणांत पुराणें लिहिण्यांत पुराणकारांचा मुख्य हेतु कोणता असला पाहिजे याबद्दलचा नियम वरील श्लोकांत दिला आहे. त्यांत जीं पांच लक्षणें दिलीं आहेत त्यांना धरून पुराणांची निर्मिति झाली. हें जरी खरें तथापि प्रत्येक वंशाचा सुसंबद्ध इतिहास यावयास हवा होता तो आलेला दिसत नाहीं. पुराणकारांनीं हा दोष स्वीकारून कालमानानुरूप जनतेला धर्माचें वळण लावण्यासाठींच हा निःस्वार्थ प्रयत्न केला असेंच म्हटलें पाहिजे. त्यांतून जे विचार कसोटीला उतरतील तेच स्वीकारले पाहिजेत.

या वेळीं आर्यांच्या प्रार्थनेचें मुख्य साधन यज्ञ त्यासंबंधीं विचार सुरू होता. तपश्चर्येला बाह्य विधींची अपेक्षा नसते तसें यज्ञाचें नाहीं. यज्ञाला मांड मांडावा लागतो. यज्ञाप्रमाणेंच प्रार्थना साधन पुराणकारांना निर्माण करावयाचें होतें. आणि पुढें तसाच प्रयत्न झाला. यज्ञसंस्थेंत कालमाना-प्रमाणें बदल करून प्रार्थनेचें साधन निर्माण करण्यांत आलें. पूर्ण ज्ञानी व शुद्ध चित्तात्मक पुरुषाचे सर्व संकल्प सत्यस्वरूप असतात म्हणून अशा पुरुषाची आराधना करावी आणि या भक्तिपूर्वक आराधनानें त्याचे गुण आपल्याला लाभतील असें करावें, असा श्रुतीचा उपदेश आहे. त्याला अनुसरून पुराणकारांनीं प्रार्थनेचें मुख्य आणि एकच साधन

जें यज्ञ त्यानें आराधना आणि भक्ति साधण्याचा उपक्रम सुरू केला. याला सगुण उपासना म्हणतात. पुराणकारांना जनमताला अनुसरून आपली दिशा ठरवावयाची होती. लोकांच्या भावनांचा त्यांना पूर्ण परिचय होता. अतींद्रिय चमत्कार पुराणांत बऱ्याच प्रमाणांत दाखविण्यांत आले आहेत. प्रत्येक धर्मांतील धार्मिक ग्रन्थांत अतींद्रिय चमत्कार बऱ्याच प्रमाणांत दाखविले आहेत. पुराणें लिहिणारे ते व्यास. महाभारतकालचे व्यास ऋषि आद्य पुराणकार होते. त्यांच्यानंतर ज्यांनीं ज्यांनीं पुराणांत भर घातली ते सर्व व्यास नांवानेंच संबोधिले आहेत.

अतीतास्तु तथा व्यासाः सप्तविंशतिरेव च ।
पुराणसंहितास्तैस्तु कथितास्तु युगे युगे ॥

देवी भा० १-३-२४

पुराण रचणारे ते व्यास. पुराण कथा सांगणारे ते सूत. महाभारत-कालीन व्यासाजवळ सूत रहात असे. पूर्व कल्पांत नैमिषारण्यांत शौन-कादि ऋषि तपश्चर्या करीत असतां तेथें सूत आले. व्यासाजवळ राहात असल्यामुळें सूत कथा सांगण्यांत निष्णात होते म्हणून ऋषींनीं त्यांना पुराणें सांगण्याची विनंति केली. पुराणांतील कथा ऐकून ऋषींच्या मनाचा घोटाळा झाला. त्यांना निश्चित मत बनवितां आलें नाहीं. शिव श्रेष्ठ कीं विष्णु श्रेष्ठ, ज्ञान श्रेष्ठ कीं कर्म श्रेष्ठ, अन्न ब्रह्म कीं वायु ब्रह्म यांचें निरसन झालें नाहीं. पुराणें रचण्यांत पंचलक्षणांचा नियम दृष्टीपुढें ठेवून कोणत्याही मताचा शास्त्रशुद्ध विचार झाला नाहीं आणि कांहीं सिद्धांतही ठरविण्यांत आले नाहींत.पुराणकारांना तसें करण्याची आवश्यकता वाटली नाहीं कारण त्यांच्यापुढें चालू परिस्थितीस तोंड द्यावयाचें होतें. अतींद्रिय चमत्काराच्या गोष्टी सामान्य माणसें मान्य करितातच. परंतु पंडित जन देखील त्यावर विश्वास ठेवितात.याचा फायदा घेऊन अलौकिक गोष्टी पुढें करून लोकांच्या मनावरील इतर धर्मांचा पगडा दूर करण्यास हा प्रचार यशस्वी ठरला. सामान्य जनांत श्रद्धा निर्माण करण्यास अशा चमत्कारांचा उपयोग

फार होतों. "निगमाचार्यवाक्येषु भक्तिः श्रद्धेति विश्रुता" ती श्रद्धा. श्रद्धा असेल तर भक्ति होणार. म्हणून चमत्कार दाखवून लोकांच्या मनांत श्रद्धा उत्पन्न करून भक्तीचें अढळ साम्राज्य स्थापन केलें. आणि आर्य धर्म पुन्हां वाढीस लाविला. पुराणांतील कथा श्रद्धा आणि भक्ति यांनींच भरलेल्या आहेत. राष्ट्राचा सामाजिक, धार्मिक आणि कांहीं प्रमाणांत राजकीय इतिहास पंचलक्षणांच्या पूर्तीकरितां पुराणांत सांठविला आहे. तुरुष्कांची माहिती देतांना पुराणकार म्हणतात तुरुष्क म्हणजे तुर्क लोक घोड्यावर बसण्यांत कुशल आहेत. ते दाढी ठेवितात, गोमांस भक्षण करितात आणि यांनींच विश्वेश्वराच्या देवालयाचा विध्वंस केला अशी तुर्कांची ऐतिहासिक आणि राजकीय माहिती वर्णन केली आहे. या माहितीनें आधुनिक इतिहासकारांचें समाधान होणार नाहीं. आभीर आंध्रभृत्यांचा उल्लेख आहे, परंतु वंशानुचरितम् नाहीं. पुराणांतील कथा लिहिण्याचे प्रकार आणि पद्धति निराळ्या असल्या तरी त्या लिहिणाऱ्यांचा हेतु स्वार्थी नव्हता. देशहिताकरितां विशिष्ट मत प्रचारासाठीं पारलौकिक अतींद्रिय चमत्काराच्या गोष्टी त्यांनीं पुराणांत समाविष्ट केल्या. हेतु हा कीं अशा गोष्टी लोकांच्या मनावर परिणाम करितात. त्यांना धर्माकडे आणि भक्तिमार्गाकडे प्रवृत्त करितात.

यज्ञसंस्था चालू असतांच ब्राह्मणकालांत वेदांतील मंत्रांत शक्ति आहे ही समजूत दृढ व्हावयास लागली. निरनिराळ्या कर्मांचीं मंत्रप्रतिष्ठप्रमाणें भिन्न भिन्न फलें ठरविण्यांत आलीं. देवतांना प्रसन्न करण्यासाठीं निरनिराळे हवि अर्पण करण्याचा उपक्रम सुरू झाला. पुढें हवि अर्पण करण्यांत बलिदानाचा प्रारंभ झाला. यज्ञ करण्यांत पुरुषार्थ मानण्यांत येत असे, त्यामुळें बलिदानाशिवाय यज्ञकार्य यथासांग पार पडत नाहीं अशी भावना निर्माण झाली. यजमानांच्या अतिरेक वागण्यानें बलिदानाचें प्रमाण फारच वाढलें. जिकडे तिकडे हिंसा सत्र सुरू झालें. ज्ञानप्राप्तीकरितां तपश्चर्या व्रत आचरणारे तपस्वी आणि इतर सहिष्णु लोक यांना यज्ञांतील बलिदान कर्म पसंत नव्हतें. या मताचा जसजसा प्रचार होऊं लागला, तसतसा यज्ञकर्मा-

बद्दलचा आदर कमी होऊं लागला. यज्ञकर्मे अप्रिय वाटूं लागलीं. पुढें गौतमबुद्धानें यज्ञकर्मात क्रांति घडवून आणिली. हिंसात्मक यज्ञकर्मे प्रचारांतून काढून टाकण्याचा त्यानें शिकस्तीचा प्रयत्न केला. यांत वैदिक तत्त्वज्ञानाच्या निराळें असें कांहींच केलें नाहीं. सृष्टिनियामक परमेश्वर एकच आहे. " यज्ञो वै विष्णुः " ही भावना कायम होती. हिंसात्मक यज्ञयागांचा लय करून अहिंसात्मक मार्ग बुद्धानें प्रचारांत आणिला. बुद्धानें ब्राह्मण धर्मांतील यज्ञयागाविरुद्ध आपलें धर्ममत प्रसिद्ध केलें. हें जरी खरें, तथापि त्यानें ब्राह्मणांस श्रमण व भिक्षूप्रमाणेंच मान दिला होता. ब्राह्मणांचें महत्त्व त्यामुळें समाजांत कायम राहिलें. पुढें बुद्धाच्या नंतर बुद्धधर्मीय सम्राट् अशोक, चंद्रगुप्त, शिलादित्य, कनिष्क यांचेसारखे उदारमतवादी राजे यांनीं देखील ब्राह्मणांस योग्यतेप्रमाणें धन देऊन आश्रय दिला. ब्राह्मणांनीं आपला ब्राह्मण धर्म पूर्ववत् प्रभावी व्हावा म्हणून प्रयत्न चालविला होताच. यज्ञ बलिदानासह करण्याचें बंद झालें. सामान्य जनांस प्रार्थनेचा मार्ग दाखविला पाहिजे या विचारानेंच पुराणकारांनीं यज्ञांच्या ठिकाणीं निराळें स्वरूप स्थापून भक्तिमार्गाचा उपक्रम सुरू केला. भक्तिमार्गाला प्रतीक लागतें. म्हणून बुद्धधर्माच्या प्रार्थनेच्या प्रकाराचेंच अवलंबन केलें असें दिसतें. कारण यावेळीं बुद्ध लोक मूर्तिपूजक बनले होते. चिनी प्रवासी हुएनत्सन खिस्ती शकाच्या सातव्या शतकांत या देशांत आला होता. त्यानें बुद्धधर्माच्या ऱ्हाससंबंधानें जें वर्णन केलें आहे त्यावरून बुद्ध लोक मूर्तिपूजक बनले होते हृ सिद्ध होतें. मूलतः भिक्षूंस राहण्याकरितां व सभा भरवून धर्मविषयक चर्चा करण्यासाठीं भव्य लेणीं व सभा-मंदिरें बांधण्यांत आलीं होतीं. या मंदिरांत दहा हजार भिक्षू राहत असत. अशीं मंदिरें सर्व देशभर पसरलीं होतीं. पुढें यांत अजस्र बुद्धाच्या मूर्ति स्थापन करण्यांत आल्या. पालख्यांतून व रथांतून बुद्धाच्या मूर्तीची मोठ्या थाटामाटानें मिरवणूक काढून शहरांतून फिरविण्याची रूढि प्रचारांत आली. तथापि सर्वसाधारण

जनतेवर या धर्माचा फारसा पगडा बसूं शकला नाहीं. इतकेंच नव्हे तर गौतम बुद्धाच्या जन्मस्थानाचें म्हणजे कपिलवस्तु गांवाचें आणि मृत्यु-स्थानाचें म्हणजे कुशिनगराचें बुद्धतीर्थ क्षेत्रांत कायमचें रूपांतर होण्या-सारखें महत्त्व असतां ती सर्व नष्ट झालीं; यावरून बहुजनसमाजांत बुद्ध-धर्माबद्दल आदर अथवा सहानुभूति नव्हती. बुद्धाच्या मूर्तीप्रमाणें काशी येथील श्री विश्वेश्वराची मूर्ति बनाविण्यांत आली. हुएनत्संगाच्या वेळीं काशी येथील विश्वेश्वराची मूर्ति ७० हात उंचीची होती असें त्याच्या लेखावरून दिसतें. बौद्धांचे संघरामाप्रमाणें हिंदूंनीं निरनिराळ्या देवतांच्या पौराणिक कल्पनांप्रमाणें मूर्ति बनवून देवालयें बांधून उत्सव सुरू केले. व्यक्तोपासनेपेक्षां अव्यक्तोपासना आचरण्यास क्लेशदायक अस-ल्यानें प्रतिमा पूजनानें भक्तिमार्ग संपादण्यांत आला.

सगुण उपासना करणें म्हणजे श्रुतिवचनाप्रमाणें पूर्ण ज्ञानी आणि शुद्धचित्तात्मक पुरुषाची आराधना करणें होय. महाभारतकालीं एकल-व्यानें द्रोणाचार्यांचें शिष्यत्व संपादन करण्याकरितां त्यांची प्रार्थना केली. राजकीय परिस्थितीमुळें एकलव्याची विनंति द्रोणाचार्यांनीं मान्य केली नाहीं, परंतु एकलव्यानें द्रोणाचार्यांसारख्या ज्ञानी आणि शुद्धचित्त पुरुषाची भक्तिपूर्वक आराधना करण्यासाठीं त्यांचें प्रतीक पुढें ठेवून इच्छित फल प्राप्त करून घेतलें. सारांश, प्रतीकाची भक्तिभावानें आराधना करणें हा प्रार्थनेचा मार्ग पुराणकारांनीं प्रचारांत आणून राजापासून रंकापर्यंत, श्रीमंतापासून गरिबापर्यंत पुरुष आणि स्त्रिया यांना प्रार्थनेचें मुक्तद्वार करून दिलें. वेदकालीन महनीय नायकांची आराधना यज्ञस्वरूपी होती. वेदकालचे महनीय नायक ज्यांना देवतेचें स्थान प्राप्त झालें आणि ज्यांना यज्ञामध्यें हावि अर्पण करण्यांत येत असत अशाच नायकांचीं प्रतीकें करून त्यांच्या अंगीं असणारे गुण प्राप्त व्हावे म्हणून त्यांची भक्तिपूर्वक आराधना करण्याचा प्रघात सुरू केला. सारांश, उपासना अगर आराधना भक्तिमार्गानें करण्यास प्रतीकांची अवश्यकता असते.

म्हणून प्रतीकें तयार होऊं लागलीं. हीं सर्व प्रतीकें भक्तिमार्गप्रवर्तक आहेत. यज्ञकर्म लोकांच्या दृष्टीआड झालें नव्हतें. प्रतीक तयार करण्यांत यज्ञाचें प्रतीक कसें असावें याबद्दल स्पष्ट उल्लेख उपलब्ध वाङ्मयांत आढळत नाहीं. तथापि यज्ञाचें प्रतीक ठरवितांना प्रमुख गोष्टी नजरेसमोर कोणत्या होत्या याची कल्पना ठरवितां येते. अग्नि, सूर्य आणि मरुत् यांची अधिष्ठानभूमि यज्ञ आहे. अग्नि प्रत्यक्ष संस्कारानें तयार होतो. सूर्य प्रत्यक्ष दिसतो. यज्ञांतील राहिलेली देवता मरुत् किंवा रुद्र यांचें रूप अग्नि अगर सूर्य यांच्यासारखें प्रत्यक्ष दिसत नसल्यानें रुद्राचें प्रतीक तयार व्हावयाचें होतें. वेदकालची मुख्य देवता यज्ञ त्याचें प्रतीक प्रथमच प्रचारांत आणावयाचें होतें. पुराणकारांना फक्त यज्ञाचाच विचार करावयाचा होता. यज्ञसंस्था जोंपर्यंत चालू होती तोंपर्यंत प्रार्थना पद्धति एकच होती. दुसरी पद्धति प्रचारांत नव्हती. यज्ञाचें परिवर्तन करण्याची अवश्यकता जेव्हां उत्पन्न झाली त्यावेळीं बुद्ध धर्माचा प्रचार आर्यावर्तांत बऱ्याच प्रमाणांत झाला होता.त्याच्या प्रार्थनेचे प्रचार पुराणकारांनीं अवलोकन केलें होतें. पुराणकारांना यज्ञसंस्थेचें परिवर्तन त्या कालच्या सामाजिक परिस्थितीप्रमाणें करणें प्राप्त होतें. आराधना आणि भक्ति यज्ञविधीला साजेशी करण्यास यज्ञाचें प्रतीक पाहिजे. त्याची पूजा करण्यास भाविकांना त्याची सगुण मूर्ति डोळ्यांसमोर पाहिजे. म्हणून ज्यांत अग्नि, सूर्य आणि मरुत् यांचा पूर्ण संगम आहे असें प्रतीक तयार केलें. अशा प्रकारें परंपरा कायम ठेवून एकीकरण साधण्यांत आलें. निरनिराळ्या देवता एकाच ईश्वराचीं स्वरूपें आहेत. " शिवस्य हृदयं विष्णुः " " विष्णोश्च हृदयं शिवः " " यज्ञो वै विष्णुः " अशी भावना होती. "एकं हि सत् विप्रा बहुधा वदन्ति " याच तत्त्वावर हें प्रतीक तयार करण्यांत आलें. पुढें पुराणकारांचा प्रतीक तयार करण्याचा पसारा इतका वाढला कीं अनंत देवता आणि त्यांचीं प्रतीकें तयार होऊन भक्तिमार्गाला निराळेंच स्वरूप यावयास लागलें. याला थोडासा पायबंद श्री. शंकराचार्यांनीं मंडनमिश्राबरोबर तडजोड म्हणून पंचायतन-

पूजा अस्तित्वांत आणिली. शिव, विष्णु, सूर्य, गणपति आणि देवी या सर्व देवता एका ठिकाणीं आणून अद्वैत स्वरूप कायम ठेविलें.पुराणकारांनीं देवतांचा प्रपंच जरी बराच वाढविला तरी यज्ञाच्या प्रतीकांत फरक केला नाहीं. मनुष्य देहधारी रूप न घेतां यज्ञांतील मुख्य देवतांचा समावेश ज्यांत आहे असेंच रूप ठरविलें. यज्ञाचें प्रतीक ठरविण्यासाठीं पुराणकारांनीं ज्या कथा सांगितल्या आहेत,त्यांत शिवस्वरूप हें अग्नीचें रूप आहे हेंच प्रतिपादिलें आहे. अशाच कथा निरनिराळ्या पुराणांतील खालीं दिल्या आहेत.त्या देण्याचा हेतु हा कीं यज्ञ,अग्नि, रुद्र आणि शिव यांचा निकट संबंध त्यांत स्पष्ट केला आहे. त्यावरून पुराणकारांचा मानस यज्ञाचें प्रतीक ठरविण्यांत स्पष्ट होतो.

नैमिषारण्यांत सूतानें सांगितलेल्या पुराणकथा ऐकून शौनकादि ऋषींचा गोंधळ उडाला. त्याप्रमाणें सामान्य जनाचाहि झाला. पुराणकारांची भावना हीं सर्व स्वरूपें एकाच ईश्वराचीं आहेत ही कायम होती असें या कथावरून स्पष्ट दिसतें."नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं"हें मुण्डकोपनिषदांतील ईश्वरस्वरूप पुराणकारांना मान्य होतें. ईश्वरविषयक भावना कायम असल्यानें पुराणकारांनीं तीच परंपरा कायम ठेविली होती. पुराणकारांनीं देवतांचा प्रपंच बराच वाढविला तरी शिव श्रेष्ठ किंवा विष्णु श्रेष्ठ हा वाद उत्पन्न झाला नव्हता.सर्व देवता एकाच ईश्वराचीं रूपें आहेत.विष्णूला रुद्र मानिलें आहे. "रुद्रो बहुशिरा बभ्रूः" असें विष्णूचें वर्णन केलें आहे. विष्णूच्या सहस्र नामांचा जप शिवालयांत करावा अशी आज्ञा आहे."शिवालये पठेन्नित्यं तुलसीवनसंस्थितः" गणपति देवतेला अशींच विशेषणें आहेत. यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, पुराणकालच्या सर्व देवता उच्च नीच, श्रेष्ठ कनिष्ठ अशा मानिलेल्या दिसतात, तरी तत्त्वतः सर्व कांहीं तूं एकच आहेस ही भावना दृढ होती. पुराणकारांनीं जनतेला धार्मिक वळण लावण्याचें ध्येय पुढें ठेविलें होतें. ध्येयपूर्तीला ज्या गोष्टी त्यांना अवश्यक वाटल्या त्यांचा समावेश पुराणांत केला. चंद्रसूर्य ग्रहणें पृथ्वीच्या दैनंदिन गतीनें

घडतात आणि तीं ज्योतिषशास्त्र बरोबर वर्तवूं शकतें ही गोष्ट पुराणकार जाणत होते. तथापि धार्मिक वळण देण्याच्या हेतूनें त्याला निराळें स्वरूप देऊन जनतेला दानधर्म करण्यास प्रवृत्त केलें. पुराणकारांना यज्ञाचें परिवर्तन भक्तिमार्गाकडे करावयाचें होतें. याचा संबंध ज्या कथांत वर्णिला आहे अशाच कथा येथें दिल्या आहेत.

वेदकालीन यज्ञसंस्था मागें पडून भक्तिमार्गाची सगुण उपासना प्रचारांत आली. भक्तिमार्गाचा आद्य प्रवर्तक नारद ऋषि या नांवें प्रसिद्ध आहे. यानें नारदसंहिता तयार केली. यांत भक्तिमार्गाचें प्रतिपादन केलें आहे. भगवद्गीतेंत भक्तिमार्ग वर्णिला आहे. भक्तिमार्ग आचरण्यास सोपा आहे. या मार्गानें परमेश्वराची प्रार्थना कोणालाही करतां येते. ज्ञानी, अर्थार्थी, जिज्ञासु आणि रोगपीडित असे भेद जनतेंत साधारणपणें पडतात. यांत ज्ञानी श्रेष्ठ आहेत. जरा आणि मृत्यु यांपासून सुटका करून घेण्यासाठीं परमेश्वराचा आश्रय करून प्रयत्न करितात त्यांना ब्रह्म जाणतां येतें. सदासर्वदा ईश्वरस्मरण करणाऱ्या समाधानयुक्त योग्याला परमेश्वर प्राप्त होतो. परमेश्वराच्या ठायीं चित्त ठेवून आणि जिव लावून परस्परांना ईश्वराविषयीं बोध करीत सर्वकाळ संतोष पावतात ते सर्वदा समाधान चित्तानें राहून भजनाच्या योगानें ईश्वराला प्राप्त करून घेतात. परमेश्वर सर्व भूतांशीं समबुद्धीनें राहतो. परन्तु त्याच्याशीं जे भक्तीनें वागतात ते ईश्वराच्या ठायीं व ईश्वर त्यांच्या ठायीं आहे. भक्तीच्या योगें सर्व प्रकारच्या माणसांस ईश्वर प्राप्त करून घेतां येतो. भक्ति कोणालाहि करतां येते. त्यांत लिंगवर्णभेद नाहींत.

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥

गी. ९–३२

भक्तिमार्गानें जाण्यास कोणालाहि आडकाठी नाहीं. याप्रमाणें भक्तिमार्गाचें लक्षण आहे. पुराणकारांनीं यज्ञकर्म व ज्ञानकर्म हीं कांहीं

विशिष्ट लोकांसच साध्य असल्यानें सर्वसाधारण लोकांचा ज्यांत समावेश होईल असा भक्तिमार्गयोग प्रचारांत रूढ करण्याचें ठरविलें. प्राप्त स्थितींत हें योग्यच ठरलें. पांच हजार वर्षांपूर्वी जी परिस्थिति होती ती त्यावेळीं राहिली नव्हती. पूर्वीचे नियम पूर्वीच्याच पद्धतीनें पुढील काळांत लागू करणें म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचें जुनें नाणें आज बाजारांत चालविण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. जुनीं नाणीं सध्यां चालणें अशक्य आहे. ऐतिहासिक दृष्ट्या तीं जवळ बाळगिणें उक्त होईल, परन्तु चलन या दृष्टीनें त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. ही जाणीव पुराण-कारांना भरपूर होती असें दिसतें. म्हणून जुनीं नाणीं प्रचारांतून काढून नव्या भक्तिमार्गाचा उपक्रम त्यांनीं केला हें वस्तुस्थितीस धरूनच झालें.

पुराणकारांना यज्ञाचें प्रतीक ठरविण्याचा पहिलाच प्रसंग आला. यज्ञकर्माशिवाय प्रार्थनेचे दुसरे प्रकार अस्तित्वांत नसल्यानें यज्ञसंस्थेच्याच विचार करणें प्राप्त झालें. यज्ञप्रार्थना म्हणजे परमेश्वराची प्रार्थना. यज्ञविधि ज्याप्रमाणें करण्यांत येतो, त्याच प्रकारचा विधि सगुण उपासनेंत बसवावयाचा होता. यज्ञक्रिया कोणत्या प्रकारें करीत याची माहिती लिंगपुराण अध्याय पंचवीसमध्यें वर्णिली आहे. यज्ञ आणि शिवाग्निकार्य एकच मानिलें आहे. शिवाग्निकार्याची पद्धति यज्ञस्वरूपी आहे. प्रोक्षणी, प्रणीता, आज्य, स्थाली वगैरेंचा उपयोग कसा करावयाचा, द्रव्यें कोणतीं असावीं, शिवासंबंधीं म्हणजे यज्ञासंबंधीं अग्निकार्य कसें करावें याची सविस्तर माहिती दिली आहे. यावरून असें दिसतें कीं, यज्ञ म्हणजे शिव, शिव म्हणजे रुद्र आणि रुद्र म्हणजे अग्नि हीं सर्व स्वरूपें मरुद्गणांचीं आहेत असें या पुराणकारांनीं ठरविलें आहे. ही कल्पना नवी नसून ऋक्संहिता प्रथमाष्टक सर्ग ६ मध्यें आलेली आहे. लिंगपुराणकारांनीं ती तेथून घेतली असावी. शिवाचा आणि अग्नीचा निकट संबंध आहे हें दर्शविलें आहे. यज्ञाचें प्रतीक ठरविणें म्हणजे शिवाचें प्रतीक ठरविण्यासारखें आहे. लिंगपुराण-कारांनीं यज्ञाची आणि शिवाची पूजा आणि ध्यान करण्याचा विधि

कसा आचरिला पाहिजे तें सांगितलें आहे. सुंदर भूमीवर प्राची साधून ओटा तयार करून यज्ञाची स्थापना करावी. त्याच-प्रमाणें सर्व जगाचा पति शिव त्याचें अंतःकरणांत चिंतन करून बाह्य आणि आभ्यंतर विधीनें स्थापना करावी. बाह्य विधीनें होम करावयांचा आणि आभ्यंतर विधीनें त्याची अग्निस्वरूपांत ध्यानरूपी यज्ञानें होम करावा. बाह्य विधि म्हणजे पूजा आणि आभ्यंतर विधि म्हणजे हृदयांत अग्नीचें चिंतन करणें. याच विधीला धरून प्रतीक आणि त्याची पूजा ठरविण्यांत आली. कोणकोणत्या गोष्टींचा पुराणकारांनीं दृष्टान्त दिला आहे त्या गोष्टी आणि कथा थोडक्यांत पुढें दिल्या आहेत.

यज्ञक्रियेचा खटाटोप करणें सामान्यजनांस दुर्घट झालें म्हणून पुराणकारांनीं भक्तिमार्ग रूढ केला. भक्तिमार्गास भक्ताच्या समोर प्रतीकाची जरूरी असते. त्याप्रमाणें यज्ञ आणि त्यांतील मुख्य देवता यांचा समावेश त्या प्रतीकांत पाहिजे. भक्तिमार्ग अनादि आहे हें ठसविण्यासाठीं पुराणकारांनीं विविध चित्रकथा जनतेपुढें मांडिल्या. भक्तिमार्ग नारद-ऋषीनें प्रस्थापित केला. नारदानें केला म्हणजे तो पुरातन आहे. या मार्गाची रचना पंचरात्र सिद्धांताचा आधार घेऊन केली. पंचरात्र सिद्धांत हा सर्व वेदांचा निष्कर्ष आहे. चित्र शिखंडी या अभिधानानें विख्यात असलेल्या सप्तर्षींनीं या शास्त्राची रचना केली. प्रवृत्ति व निवृत्ति या दोन्ही मार्गांचा हा परिपोषक आहे. तो नारदानें पृथ्वीवर प्रचलित केला. ही हकीकत महाभारतांत शांतिपर्वामध्यें आली आहे. स्वायंभुव नारायणापासून नर, नारायण, हरि आणि कृष्ण या चार मूर्ति उत्पन्न झाल्या. नर आणि नारायण या बंधुद्वयांनीं देहरूपी रथांत बसून उग्र तपश्चर्या केली. या ऋषींची ख्याति सर्वत्र पसरल्यामुळें अनेक जण त्यांच्या दर्शनास जात असत. नरनारायणांनीं जेथें तपश्चर्या केली तें स्थान बद्रीनारायण असून, तेथें ज्या पर्वतावर बसून तपश्चर्या केली ते पर्वत नर आणि नारायण या नांवानें प्रसिद्ध आहेत. नारदमुनि त्यांच्या भेटीस गेल्या वेळीं स्वायंभुव

नारायणाचें दर्शन श्वेतद्वीप निवासस्थानीं होईल असें त्यांनीं मुनींना सांगितलें. नारदमुनीनें श्वेतद्वीपास जाऊन स्वायंभुव नारायणाचें दर्शन घेतलें. भगवान् नारायणानें नारद हा अधिकारी परमभक्त असल्याचें जाणून त्याला पंचरात्र सिद्धान्त नांवाचा भक्तिमार्ग कथन केला. हिंसा करून यज्ञयागादि कर्मे करणारांना माझी प्राप्ति होत नाहीं. ज्यांच्या अंतःकरणांत नारायणाविषयीं अनन्य भक्ति आहे त्यालाच नारायणाचे चरण दिसतात, असें आख्यान पुराणकारांनीं कथन केलें आहे. भक्तिमार्ग योग्य असल्याचें दाखविण्याकरितां अतिशयोक्तिवर्ज कथा लिहिण्यांत पुराणकारांचा हेतु स्पष्ट आहे. यज्ञयागाविरुद्ध मत स्पष्ट केलें आहे. हिंसात्मक यज्ञ अमान्य असल्याचेंहि दिग्दर्शन होत आहे. सारांश अतींद्रिय चमत्कार दाखवून जनतेंत श्रद्धा उत्पन्न करण्यासाठीं ही कथा सांगितली आहे.

यज्ञक्रियेंत रुद्रप्रार्थना करण्यांत येत असे. रुद्राचें शिवस्वरूप होतें आणि त्याचीहि प्रार्थना होई हें रुद्राध्यायावरून समजतें. रुद्राला द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्याचें कल्याण करणारा, हितकर्ता व संहारकर्ता मानिलें आहे. तो वनस्पतींचा स्वामी असल्यानें आमच्या सैनिकास खडखडीत बरें कर, तुमचीं औषधें अत्यंत पवित्र, मंगलकारक आणि कल्याणप्रद आहेत, अशा प्रार्थना आहेत. तैत्तिरीय संहितेंत रुद्राचें बरेंच वर्णन असून त्याची आराधना विशेष मान्य झाली होती. शतरुद्रीयांत रुद्राच्या अंगीं असलेल्या गुणांचें सविस्तर वर्णन केलें असून बहुतेक तेंच वर्णन त्यानंतर अस्तित्वांत आलेल्या कथानकांत गोविलें आहे. शतरुद्रीयांत रुद्रास विश्वाचें आदिकारण देवांचा जनिता व वर्धन करणारा महायोगी असें म्हटलें आहे. श्वेताश्वतरोपनिषदांत याच प्रकारचें रुद्राचें वर्णन आढळतें. तो प्राणिमात्रांच्या अंतर्यामीं वसत असून विश्वालाहि व्यापून आहे. ज्याला ब्रह्म ही संज्ञा देण्यांत आली ती रुद्रालाच आहे असें उपनिषत्कालीं मानण्यांत येत असे.

आर्यांनीं रुद्रदेवतेची प्रार्थना केली त्याप्रमाणें अनार्यांनींहि रुद्र देव-

तेला भजण्यास आर्यांचें अनुकरण केलें. किरात्, निषाद वगैरे अनार्यांतील लढाऊ वीर संघ आपापल्या कल्पनाप्रमाणें रुद्राच्या स्वरूपाला वळण देऊन भजूं लागले. अरण्यवासी मृगचर्मधारी, गळ्यांत रुंडमाळा वगैरे अलंकारांनीं त्याला भूषित केलें, गांवांतील सीमेजवळील भागांत वास्तव्य असल्यानें स्मशानावर रुद्राचें स्वामित्व आहे म्हणून त्याला चिताभस्मधारी रुंडमालाधर मानिलें. निषादांनां ते रुद्राचे उपासक म्हणून रुद्र असें म्हणत. सारांश, रुद्र देवता-आर्य आणि अनार्य त्या कालीं आर्यावर्तांत वास्तव्य करणाऱ्या लोकांचें दैवत होतें. इतकी ही देवता जनमान्य होती. रुद्राचें प्रतीक ठरवितांना त्याच्या पार्श्वभूमीचें योग्य निरीक्षण झालें म्हणजे यज्ञ, शिव, रुद्र आणि अग्नि यांच्या विषयीं पुराणकारांची भावना स्पष्ट होईल. याच भावनेचें प्रतिबिंब पुराणकालच्या वाङ्मयांत दिसून येतें. भविष्य महापुराण अध्याय पंधरामध्यें देवाचें ध्यानस्वरूप कसें असतें याचें वर्णन आहे. त्यांत "अस्य यज्ञे परिज्ञाना जिव्हा सम्यक् फलप्रदा" असें केलें आहे. भीमाशंकर माहात्म्य अध्याय २ मध्यें शिवाचें स्वरूप स्वतः शंकरच वर्णन करितात कीं "ज्योतिःस्वरूपं मल्लिंगं भीमशंकरसंज्ञकम्" रुद्राचें म्हणजे शिवाचें स्वरूप ज्योतिरूप यज्ञस्वरूपी आहे. शिवाचे ध्यान करतांना "रत्नाकल्पोज्वलांगं परशुमृगवरा" असें वर्णन आहे. अगदीं अलीकडच्या वाङ्मयांत हीच परंपरा कायम असल्याचें स्पष्ट दिसतें. शिवस्वरूप आणि यज्ञस्वरूप एकच आहे असें वर्णन काशीखंडांत केलेलें आहे. "हा तेहतीस कोटी देवांचें मुख, हा यज्ञनारायण सुखकारक" असें शिवाचें वर्णन आहे. शिव म्हणजे कल्याणकारक यज्ञ आहे. यज्ञाचें प्रतीक ठरवितांना पुराणकारांची यज्ञाबद्दल भावना कशा प्रकारची होती, हें यावरून स्पष्ट होईल. आर्य आणि अनार्य यांना सारखेंच प्रिय असलेलें रुद्र अगर शिवदैवत आणि त्याचा यज्ञाशीं आणि अग्नीशीं असलेला निकट संबंध यांच्या आधारें त्याचें प्रतीक ठरवून भक्तिमार्ग प्रचलित करावयाचा होता. यज्ञाचें प्रतीक म्हणजे शिवाचें प्रतीक होय. पुराणकारांनीं याला कोणकोणते आधार दाखविले आहेत त्याचें

निरूपण खालीं दिलेल्या कथाप्रसंगांतून झालेलें दिसेल. शिव आणि यज्ञ यांचा विशेष संबंध ज्या कथांतून दाखविला आहे अशाच थोड्या कथा येथें दिल्या आहेत. यज्ञाचें ज्योतिःस्वरूप ज्योतिर्लिंग रूपानें प्रतीक म्हणून तयार झालें याविषयींचे आधार या कथांतून आढळतात. येथपर्यंत यज्ञक्रियेंत रुद्र किंवा शिव देवता असून ती अग्निस्वरूपी आहे अशी वेदकालीं प्रार्थिली जात होती. कालमानाप्रमाणें त्यांत बदल घडवून आणिला आणि ज्योतिर्लिंग अथवा शिवलिंग या अभिधानानें प्रचलित करण्यांत आलें. पुराणांत अशा कथा अमाप आहेत, तथापि ज्यांचा शिवलिंगस्वरूपाशीं संबंध आहे अशाच कांहीं कथा परंपरा समजावी या हेतूनें दिल्या आहेत.

वैवस्वत मन्वंतरांत हिमालयावर गंगाद्वारीं दक्ष प्रजापति राज्य करीत असतां त्यानें यज्ञ आरंभिला. सर्व देव, यक्ष, सिद्ध, गंधर्व इत्यादिकांना आमंत्रणें पाठविलीं. यज्ञसमारंभांत त्याचा उपाध्याय दधीचि ऋषि याच्या दृष्टीस रुद्र न पडल्यामुळें तो म्हणाला, अहो रुद्राशिवाय यज्ञ व्यर्थ आहे. हें त्याचें भाषण ऐकून नारदानें शिवाकडे जाऊन झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली. ती ऐकून रुद्राला कोप आला. तो जोरानें श्वास टाकूं लागला. त्याच्या श्वासापासून वीरभद्र नांवाचा पुरुष उत्पन्न झाला. पुढें वीरभद्रानें आपल्या केशापासून भूतगण निर्माण करून दक्षयज्ञाचा विध्वंस केला. देव आणि ऋषि यांनीं आतां आम्हीं काय करावें असें त्याला काकुळतीनें विचारलें, तेव्हां त्यानें सांगितलें मला शिवाची आज्ञा आहे म्हणून तुम्हीं त्याला शरण जा. त्याप्रमाणें दक्षानें शंकराला शरण जाऊन त्याची अष्टोत्तरशत नामांनीं स्तुति केली. शंकर अग्निकुंडांतून प्रकट होऊन त्यानें दक्षाचें विघ्न नाहींसें केलें. सारांश, या कथेंत शिवाचें प्रकटीकरण यज्ञांतील अग्नीमधून झालें हें लक्षांत घ्यावयाचें आहे.

महाभारतकालीं शिवप्रार्थना होत असत. महाभारतांत शिवसंघाचा उल्लेख आला आहे. शिवदेवतेबद्दल आदर वाढत होता. किरात व अर्जुन यांचें युद्ध, अर्जुन व कृष्ण यांस हिमालयावर शंकराचें दर्शन, अश्वत्थाम्यास शंकरा-

करून खड्गप्राप्ति, अर्जुनाला पाशुपतास्त्राची शिवाकडून भेट, शिवप्रसादानें जांबुवतीच्या उदरीं झालेल्या श्रीकृष्णपुत्र सांबाची कथा, उपमन्यूस उमा-महेश्वराचें दर्शन इत्यादि अनेक गोष्टींचा विचार केल्यास त्या कालीं आर्य-लोकांस शिवदैवत पूज्य झालें होतें असें म्हणतां येईल. आर्यांनीं अना-र्यांना पूर्ण आत्मसात् केल्यानंतर किरात, निषाद वगैरे अनार्य-संघांतील चालीरीती आर्यांतहि सुरू झाल्या. महाभारतकालीं शिवलिंग-पूजेची प्रतिष्ठा हळूहळू वाढूं लागली असें दिसतें. उपमन्यूनें महा-देवाची स्तुति करतांना शिवलिंग हें सर्व लोकांस श्रेष्ठ वाट-ल्यामुळें त्याची सार्वत्रिक पूजा होते असें म्हटलें आहे. उपमन्यूची कथा अशी कीं हा व्याघ्रपाद ऋषींचा मुलगा. त्याची आई त्याला पाण्यांत पीठ कालवून दूध म्हणून देई. उपमन्यूला एका राजाकडे यज्ञाला गेला असतां खरें दूध प्यावयास मिळालें. दुधाची गोडी समजल्यामुळें त्यानें आईला विचारलें, आतांपर्यंत तूं आम्हांस दूध म्हणून देतेस तें खरें दूध नव्हें. आम्हांस असें कां फसवतेस ? आईला गहिंवर आला. आपल्यासारख्या गरि-बांना पर्णकुटीमध्यें गाईचें दूध कोठून मिळणार ? ईश्वराची सेवा घडली असेल तर त्याच्या प्रसादानें भाग्य मिळणार. आईचें हें भाषण ऐकून उपमन्यूनें विचारलें ईश्वर कोठें आहे ? तो कसा प्रसन्न होईल ? ती म्हणाली, बाळा, शंकर प्रसन्न होणें मोठें कठीण आहे. पण भक्ति केल्यास मनोरथ पूर्ण होतात. उपमन्यूनें अंगुष्ठावर उभें राहून पर्णें खाऊन तप केलें. शंकर इंद्र रूपानें प्रकट होऊन वर माग असें म्हणाला. उपमन्यूनें इंद्ररूपी शंकरास सांगितलें का मला इंद्राशीं कांहीं करावयाचें नाहीं मला शंकर पाहिजे. शंकर वर देईल तेवढाच मी घेणार आहे. शिवभक्ती-वांचून मला कांहींही नको. शिवानेंच तुम्हांला तुमचीं स्थानें दिलीं आहेत. तूं आपल्या ठिकाणीं जा. तुझ्याशीं मला कांहीं मागावयाचें नाहीं. उपमन्यु याप्रमाणें त्याला टाकून बोलला असतां शंकर संतुष्ट होऊन आपल्या खऱ्या स्वरूपांत प्रगट झाला. तेव्हां उपमन्यूनें त्याची सहस्रनामानें स्तुति

केली. सर्व देवगण उपमन्यूची स्तुति ऐकून संतुष्ट झाले. शंकर प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, अरे, तुझी भक्ति मला कळली आतां वर माग. उपमन्यूनें पुन्हां स्तुति करून म्हटलें, मला तुझी अखंड भक्ति दे आणि तूं सतत माझ्या आश्रमांत राहा. तुला ज्यावेळीं जी इच्छा होईल ती तत्काळ पूर्ण होईल. असें सांगून शंकर गुप्त झाले.

ही कथा उपमन्यूनें कृष्णास सांगितली. श्रीकृष्णानें धर्मास सांगितली. कृष्ण म्हणाला, धर्मा, शिवमहिमा सांगावयास वर्षांच्या वर्षे लागतील इतका तो गहन आहे. तरी थोडक्यांत तुला सांगतों. रुक्मिणीच्या पुत्रास पाहून जांबुवतीस पुत्रप्राप्तीची इच्छा होऊन ती तसेच पुत्र मागूं लागली. ही मागणी मान्य होऊन घरांतील वृद्धांची आज्ञा घेऊन पुत्रप्राप्तीचा प्रयत्न करण्यासाठीं कैलासावर आलों. उपमन्यूचा जवळच आश्रम होता. शिष्यवृंदांमध्यें विराजमान झालेल्या गुरुमुनींचें दर्शन घेतलें. उपमन्यूनें स्वागत करून धन्यवाद दिले. उपमन्यूनें श्रीकृष्णाच्या आगमनाबद्दल संतोष व्यक्त करून तो म्हणाला, देवा, आतां तुम्ही येथेंच रहा. तुमची पुत्रप्राप्तीची इच्छा येथें पूर्ण होईल. शिवपार्वती येथें नांदत असल्यानें अनेक ऋषींना येथें सिद्धि प्राप्त झालेली आहे. उपमन्यु म्हणाला, मी शंकरास प्रसन्न करून घेतलें आहे. श्रीकृष्णानें तेथें राहून आठ महिने उग्र तप केलें. शंकर प्रसन्न झाले व पुत्रप्राप्तीची इच्छा सफल झाली. जांबुवतीच्या पुत्राचें सांब असें नांव ठेविलें.

वरील कथेंतील निरूपणावरून शिवाची अव्यक्तोपासनाच रूढ होती असें दिसतें. लिंगपूजेला सुरवात झालेली नव्हती. यज्ञाचें प्रतीक अद्यापि ठरविण्यांत आलें नव्हतें. देवाचें नरदेहधारीरूप मानून प्रतीक ठरविणें जितकें सोपें आहे, तितकें यज्ञरूपाचें ठरविणें सोपें नव्हतें. यज्ञसंस्थेचें परिवर्तन प्रथम करणें भाग झाल्यानें यज्ञाचें प्रतीक यज्ञक्रियेवरून ठरत गेल्याचें दिसतें. यावरून महाभारतकालीं लिंगपूजा अस्तित्वांत नव्हती असें दिसतें. परंतु उपमन्यूच्या वरील कथेवरून शिवलिंगाची कल्पना

सुरू झाली होती असें म्हणतां येईल. रामायणकालीं ती अस्तित्वांत नव्हती. युद्धसमाप्तीनंतर श्रीरामचंद्रानें सेतुबंध रामेश्वरास समुद्रासन्निध श्री. रामेश्वर शिवलिंग स्थापन केलें असा जो रामायणात उल्लेख आहे, त्यावरून त्याकालीं लिंगपूजा अस्तित्वांत होती असें ठरतें. परंतु हें मत पंडितजनास अद्यापि मान्य नसल्यानें निश्चित विधान करणें कठिण आहे. तथापि त्याकालीं एकेश्वरीमत प्रचारात होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाची प्रार्थना अगर रुद्राची प्रार्थना प्रचारांत होती. पूजाविधि रूढ नव्हता. महाभारतकालीं अशाच प्रार्थना होत्या. प्रतीक पूजनाचा प्रघात सुरू नव्हता. पतंजलीच्या कालीं शिव--प्रतिमा पूजनाची प्रथा सुरू होती असें त्याच्या सूत्रांतील उदाहरणांवरून दिसतें. ईश्वरप्रणिधानात् ॥ स. पा. २३ अगर आत्मदर्शनयोग्यत्व पा. ४१ हीं सूत्रें व्यक्तिशः आराधना प्रचलित होती असें दाखवितात. यज्ञसंस्था मागें पडून त्या ठिकाणीं आराधना व्हावयास लागली. स्वल्प बुद्धीचें प्रमाण वाढावयास लागलें. पुराणकारांनीं त्याला मार्गदर्शन केलें. धर्मनिष्ठा वाढविण्यासाठीं अतींद्रिय चमत्काराच्या कथा जनतेपुढें मांडिल्या. जनतेनें श्रद्धाळुपणानें त्यांचा आदर करून आचरण केलें.

यज्ञ प्रचारांतून जात चालले होते. यज्ञक्रिया आणि प्रार्थना ज्या प्रकारच्या होत्या त्यांचा समावेश ज्या विधींत होईल अशी प्रतीकपूजा रूढ व्हावी अशी पुराणकारांची दृष्टि होती, हें वर लिंगपुराणांतील यज्ञसंस्थेच्या माहितीच्या उल्लेखांत आलेंच आहे. यज्ञावरूनच पूजाविधि ठरविण्यांत आला. पूजाविधि असा रचिला, कीं तो आहुतिविरहित यज्ञच म्हणावयास हरकत नाहीं. रुद्राच्या पूजाविधींत रुद्राच्या प्रार्थनांचा समावेश केला. रुद्राचें प्रतीक यज्ञ ठरविलें. शिवाचें यज्ञासारखें प्रतीक करून तें जनतेपुढें ठेविलें.

गौतमबुद्ध व त्यानंतर जे बुद्धानुयायी राजे झाले त्यांनीं वैदिक धर्माबद्दल सहिष्णुता धारण केली असल्यामुळें ब्राह्मणधर्म स्थिर राहिला. वैदिक उपा-

सना नियमितपणें चालूच होती. राजाश्रय ब्राह्मणांनाहि मिळत होता.त्यामुळें बुद्धधर्माचा प्रभाव सनातनीयांवर न बसतां योग्य काळीं त्यांनीं आपली सुधारणा घडवून आणिली. बुद्धधर्मांतील पटण्यासारखीं जीं तत्त्वें होतीं त्यांचा वैदिक धर्मानें स्वीकार केला. यांत सुज्ञान माणसाचे प्रयत्न अव्याहत चालू होते. अपेक्षेप्रमाणें जनतेच्या मनावर इष्ट असाच परिणाम झाला. रुद्रोपासनेकरितां जें प्रतीक प्रचारांत आणावयाचें त्याकरितां अतींद्रिय चमत्काराच्या कथांना कसा प्रारंभ केला याची माहिती स्कंद, पद्म, मत्स्य, शिव आणि लिंगपुराणांत आली आहे. सगुण उपासना प्रचालित करण्यास ज्या कथांचा उपयोग होईल अशा कथा लिहिण्याचें धोरण पुराणकारांचें होतें.

दक्षप्रजापतीच्या यज्ञांत यज्ञकुंडांतून रुद्ररूप प्रकट झालें आणि सर्व विघ्नांचा नाश करून दक्षाला पुन्हां प्रस्थापित केलें. वीरभद्रानें त्याचें शिर तोडिलें होतें त्या ठिकाणीं बस्ताशिर बसविलें.दक्षानें महादेवाची स्तुति केली. यज्ञाच्या ठिकाणीं दक्षेश्वर लिंग स्थापन केलें.या कथेवरून पुराणकारांनीं शिव-प्रतीक ठरविण्यास कोणत्या साधनांचा उपयोग केला याचा स्पष्ट बोध होतो. यज्ञाची मांडणी झाल्यानंतर त्यांतून रुद्र प्रकट होतो. त्याचें प्रतीक ठरवावयाचें म्हणजे नुसतें सगुण मूर्तिस्थापन करणें अव्यवहार्य दिसलें असतें. पेटलेल्या अग्निकुंडांतून मानवरूपधारी मूर्ति ठेवणें अयोग्य वाटलें. म्हणून अग्निरूपी स्फुल्लिंग लहानसा गोळा यज्ञाच्या मध्यभागीं स्थापन केला. यज्ञवेदी आणि मध्यमागीं अग्निरूपी गोल असें रुद्राचें स्वयंभूच प्रतिक तयार झालें. अग्नीचें स्फुल्लिंग हेंच रुद्राचें अगर शिवाचें स्फुल्लिंग होय. रुद्राचें स्वरूप अग्नि आहे. शिवाचेंहि स्वरूप ज्वलज्ज्वाला आहे. पुराणकारांनीं या तत्त्वाचा अंगीकार करून त्याप्रमाणें सर्व पुराणांत या स्वरूपाचा महिमा विस्तारपूर्वक वर्णिला आहे. सर्व कथांना वेद, संहिता, ब्राह्मण आणि उपनिषदें यांचा आधार दिलेला आहे. रुद्राध्याय व ब्राह्मण ग्रंथ यांतील वर्णन आधार घेऊन त्याचा विस्तार केला आहे. रुद्राच्या पहिल्या अन्व-

कांतील त्रिपुरसंहाराच्या आधारावर शिवमाहात्म्य तयार झालें. चराचर सृष्टीस व्यापून असणारें ब्रह्म तेंच रुद्र किंवा शिव आहे त्यावरुन शिव सर्व चराचर सृष्टि व्यापून आहे आणि शिवाचें स्फुल्लिंग सर्व व्यापून आहे. स्कंद पुराणांत रुद्राराधना प्रकरणांत विष्णूनें शंकराची आराधना केल्याची कथा निरूपण केली आहे. एकदां विष्णूनें विश्वेश्वराची पूजा करीत असतां वाहण्याकरितां आणिलेल्या सहस्र कमलांत एक कमल कमी पडलें.

॥ हरिस्ते साहस्रं कमलबलिमाधाय पदयोर्यदेकोने तस्मिन्निजमुद्हरन्नेत्रकमलम् ॥

तें पुरें करण्याकरितां आपलें नेत्रकमल काढून सहस्र संख्या पुरी केली. शंकर प्रसन्न झाले. शंकराची आराधना करणें फार कठीण आहे असें विष्णूनें स्कंदाला सांगितलें. त्याचप्रमाणें उपमन्यूच्या आईनें शंकराची आराधना कठीण आहे असें सांगितलें होतें. म्हणून कल्याणेच्छूनें त्याच्या सगुण स्वरूपाची म्हणजे त्याचें प्रतीक जें यज्ञ त्याची पूजा केल्यानें शिवप्राप्ति होते. हें शिवरूप यज्ञांतील सगुणरूप अग्निस्फुल्लिंग तें स्थापून त्याची पूजा करावी. हें स्फुल्लिंग सर्व चराचर जगामध्यें लीन आहे, म्हणून त्याला लिंग म्हणतात. लिंग म्हणजे जीवनहेतु (Objects of life) लिंगपुराणांत हाच अर्थ दिला आहे. "यत्राग्नि लिङ्गमध्यस्थं प्राह देवो महेश्वरः"। महादेव अग्निरूपानें दृक्गोचर आहे. स्कंदाला अग्निस्फुल्लिंगाची माहिती विष्णूकडून कळल्यामुळें तारकासुराचा वध केल्यावर शिवाची आराधना साधण्याकरितां त्यानें तीन लिंगें स्थापन केलीं.

तारकवधाची प्रतिज्ञा ज्या ठिकाणीं केली तेथें प्रतिज्ञेश्वर, ज्या ठिकाणीं तारकाचें मस्तक धडापासून वेगळें केलें तेथें कपालेश्वर लिंग आणि तारकाच्या मस्तकांतून निघालेल्या शक्तीच्या ठिकाणीं शक्तिछिद्र लिंग स्थापून शिवार्चना रूढ केली. पुराणकारांनीं या सर्व स्थानांची महती विस्तारानें गाइली आहे. कोणतीं कृत्यें केव्हां करावयाचीं, कोणतीं दानें द्यावयाचीं याची सविस्तर माहिती जन उद्धाराकरितां दिली आहे. स्कंद हा कुमार

असून कार्तिकस्वामी या नांवानें प्रसिद्ध आहे. हा ब्रह्मचारी मानिला आहे. कुमारास ब्रह्मचारी मानिलें तें योग्यच होतें. तारकवधा-समर्थी लोकांना माहीत असलेला स्कंद पुढें तसाच कुमार राहिला असेल असें म्हणतां येणार नाहीं. कारण कांचीला अम्रेश्वराचे देवालयाच्या ओरी-मध्यें स्कंद त्याच्या दोन स्त्रिया आणि त्याचीं मुलें अशा परिवारासह दाख-विला आहे. असो. कुमाराला जय प्राप्त व्हावा म्हणून देवांनीं त्याची स्तुति केली. तारकाचा वध करून कुमार विजयी झाला. ब्रह्मदेव संतुष्ट होऊन कुमारेश्वराच्या हस्तें वरील तीन लिंगें स्थापन केलीं. कुमाराची स्तुति ज्या ठिकाणी देवांनीं चालविली होती त्या ठिकाणीं विजयस्तंभ उभारावा असें ठरविलें. ज्या ठिकाणीं स्तंभ उभारला त्यालाच लिंग मानून त्याचें स्तंभे-श्वर नांव ठेविलें. अशा दुर्लभ पुण्यक्षेत्रीं चार लिंगें स्थापन केल्याबद्दल देवांनीं स्कंदाला धन्यवाद दिले. आत्म्याची शुद्धि व ज्ञान होण्याकरितां शिव-लिंगाची स्थापना करण्याचा देवांनीं विचार ठरविला.

या कथेंत शिवलिंग स्थापन करण्याचें प्रसंग वर्णिले आहेत. स्कंदाला जय मिळाल्यानंतर त्याचें स्मारक म्हणून लिंगस्थापना केली आहे. कोणत्याहि महत्कार्याची यशस्वी परिणति होण्यास बुद्धिचातुर्य आणि शौर्य यांचा संगम व्हावा लागतो. अशा प्रसंगीं ज्या विभूतीनें यश संपादून आपल्या गुणांनीं जनतेला दुःखविमुक्त केलें त्याचें स्मारक होणें उचित होय. तथापि शिवलिंग स्थापनेला पराक्रम करून विजय संपादणें आवश्यक होतें असें दिसतें. विजयाप्रीत्यर्थ जयस्तंभ उभारण्यांत येतो याला लिंग म्हण-तात. शिवाचें स्वरूप अग्नि असल्यानें हे जयस्तंभ अग्निस्वरूपी करण्याची व्यवस्था झाली. अशा स्तंभांना ठिकठिकाणीं दीप जोडण्यांत येऊन शिरोभागीं यज्ञाच्या आकाराच्या वेदींत रुद्ररूप ठेविण्यांत आलें. या ठिकाणीं नेहमीं अग्नि प्रदीप्त राहील अशी योजना करण्यांत आली. काशीविश्वेश्वराचें पहिलें लिंग सत्तर हात उंच होतें. शिवाला अग्निस्तंभाप्रमाणें मानून त्याची बाह्य विधीनें

पूजा करावी आणि तेंच अग्निस्वरूप हृदयांत स्थापून आभ्यन्तर विधीनें भक्ति करावी, अशी पुराणकारांची शिवप्रतीकासंबंधीं योजना आहे. शिवाचें अग्निस्वरूप उपासकांना कळावें यासाठीं ही योजना आहे हें स्पष्ट दिसतें. दक्षिण हिंदुस्थानांत कृत्तिका नांवाचा महोत्सव अद्‌भुत प्रमाणावर साजरा केला जातो. शिवाप्रीत्यर्थ हा उत्सव होतो. शिवाचें मूळ स्वरूप जें अग्नि त्याचें साम्य या उत्सवांत दिसतें. सुमारें वीस हात उंचीचा खांब उभा करून तो कापून किंवा इतर ज्वालाग्राही पदार्थांच्या योगानें प्रदीप्त करतात. वरील शिवाचें स्वरूप आणि जय प्राप्त झाल्यावर स्थापण्यांत येणारा जयस्तंभ यांचें साम्य दिसतें. सारांश, जयस्तंभ स्थापून त्याला अग्निस्वरूप देऊन रुद्ररूप आणण्याच्या प्रसंगास कोणता तरी पराक्रम करून विजयश्री मिळाविलेली असते. सर्वांना पराक्रम करून विजय संपादिला पाहिजे असें नव्हतें. दीर्घ तपश्चर्या करून इष्ट सिद्धि मिळविणें पराक्रमांतच गणिली जात असे.

ब्रह्मदेवानें पुढें असें ठरविलें कीं, प्रत्येकानें लिंग स्थापन करणें बरें नाहीं. म्हणून सर्वांकरितां एक लिंग सिद्ध करावें. त्याचें सिद्धेश्वर लिंग तयार झालें. पुष्कर तीर्थीं ब्रह्मदेवानें यज्ञ केला तो यशस्वीपणें पार पडला म्हणून नील-लोहित लिंग स्थापन केलें. इंद्रानें वृत्रासुरास मारण्यांत विजय संपादन केला म्हणून महेंद्र पर्वतावर पापलोचन लिंग स्थापन केलें. रावणाचा वध करून श्रीरामचंद्रानें सीतेची मुक्तता केली. या विजयाची स्मृति रहावी म्हणून जयस्तंभ उभारिला तो रामेश्वर लिंग म्हणून प्रसिद्ध झाला. गुहानें कुमारेश्वर लिंगस्थापन केलें. कोटी तीर्थावर कोटीश्वर लिंग स्थापन करण्यात आलें. अत्रीनें तपश्चर्या समाप्तिसमयीं अत्रीश्वर लिंग स्थापन केलें. भरद्वाजानें तपश्चर्या करून सिद्धि मिळविली. या विजयाची स्मृति राहण्याकरितां जो जयस्तंभ उभारला तो भरद्वाजेश्वर लिंग म्हणून प्रसिद्ध झाला. अहिल्येच्या प्राप्तीकरतां गौतमानें तपश्चर्या केली. सिद्धि प्राप्त झाली. या जयाचें स्मारक म्हणून अहिल्या सरोवराचे कांठीं गौतमेश्वर लिंगाची स्थापना केली. नारदानें नारदीय सरोवराचे

कांठीं नारदेश्वर लिंग स्थापन केलें. नागांनीं कद्रूच्या शापांतून मुक्त होण्याकरितां तप केलें. तपश्चर्या फलदायी झाली. या आनंदाच्या प्रसंगास साजेसें स्मारक म्हणून जयस्तंभ उभारिला. तो नागेश्वर लिंग या नांवें प्रसिद्ध झाला. घटोत्कचाचा मुलगा बर्बरिका यानें भीमाबरोबर युद्ध केलें. भीमाचा पराजय झाला. बर्बरिकाला आकाशवाणीनें भीमाशीं असलेलें नातें समजलें. सर्वांचें समाधान झालें. या विजयाची स्मृति म्हणून चंडिका कुंडावर भीमेश्वर लिंग स्थापन करून जयस्तंभ उभारिला. सिद्धचारण गंधर्वांनीं स्वर्गांत राहण्यास कायमचें स्थान मिळावें म्हणून तपश्चर्या केली. विजयप्राप्ति झाल्यावर शिवलिंग स्थापिलें. कामधेनु शिवदर्शनास आल्या त्यांनीं शिवाची स्थापना केली. त्याला कपिलेश्वर म्हणतात. परत जातांना चालतां चालतां एका ठिकाणीं जोराचा पाय पडल्यामुळें तेथें लिंग उद्भवलें तें खुरकर्तरीश्वर लिंग झालें. शतकीर्ति ऋषीचा पुत्र पराशर यानें पराशरेश्वर लिंग स्थापिलें.

करंज नांवाचा कश्यप आणि दनुजा याचा पुत्र होता. तो ब्रह्मदेवाचा पणतू. त्यानें तपश्चर्या करून शंकरास प्रसन्न केलें. सिद्धि प्राप्त होणें म्हणजे मोठा पराक्रम करून विजय संपादण्यासारखें महत्त्वाचें कृत्य असे. या कृत्याचें कायमचें स्मारक म्हणून जयस्तंभ उभारण्यांत येत. करंजाला ज्या ठिकाणीं जय मिळाला त्या ठिकाणीं त्यानें जयस्तंभ उभारिला आणि करंजेश्वर नांव ठेविलें. पुलस्त्याचा नातू वैश्रवण हा ब्रह्मदेवाचा धनरक्षक म्हणून कुबेर झाला. त्यानें नर्मदाकांठीं कुण्डल येथें दीर्घ तपश्चर्या करून शत्रुविरहित फिरण्यास मिळावें असा वर मिळविला. या विजयाप्रीत्यर्थ त्यानें कुण्डलेश्वर नांवाचा जयस्तंभ उभारिला. लंकाभेद करून कृतार्थ झालेला हनुमान कैलासक्षेत्रीं गेला. नंदीनें त्याला आंत येऊं दिलें नाहीं. त्यानें तपश्चर्या करून इष्ट सिद्धीनंतर कपीश्वर लिंग स्थापन केलें. दक्ष प्रजापतीच्या शापामुळें क्षीण झालेला चंद्र तपश्चर्या करूं लागला. दक्ष ब्रह्मपुत्र याला पन्नास मुली होत्या. त्यांपैकीं दहा धर्माला, तेरा मुली कश्यपाला आणि

सत्तावीस चंद्राला दिल्या होत्या. चंद्राचें रोहिणीवर फार प्रेम होतें. सर्व मुलींना समतेनें न वागविल्यावरून दक्षानें चंद्राला शाप देऊन क्षयी केलें. कृष्ण-पक्षांतील क्षीण चंद्र आणि सत्तावीस नक्षत्रें यांचा या कथेशीं संबंध आहे. चंद्रानें ब्रह्मदेवाची प्रार्थना केली. ब्रह्मदेवानें चंद्राला शिवाराधना करण्यास सांगितलें. चंद्रानें तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न केलें. ज्या ठिकाणीं जय मिळाला त्या ठिकाणीं जयस्तंभ उभारिला आणि सोमेश्वर लिंग स्थापन केलें.

सूर्यवंशांत त्रिशंकु नांवाचा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. तो वसिष्ठ मुनींचा शिष्य होता. गुरूच्या आज्ञेनुसार त्यानें अग्निष्टोम यज्ञ केला. याच शरीरानें स्वर्गांत जाण्याची त्याची इच्छा होती. याच शरीरानें स्वर्गांत जाणें मनुष्यप्राण्यास शक्य नाहीं असें वसिष्ठ मुनीनें त्याला सांगितलें. हें सांगणें त्याला मानवलें नाहीं. त्रिशंकूस वसिष्ठाविषयीं फार आदर होता, परंतु त्याच्या इच्छेस गुरूनें मान दिला नाहीं म्हणून त्या हितचिंतक गुरूचा त्यानें त्याग केला. वसिष्ठपुत्राने त्रिशंकूच्या या आततायी वर्तनामुळें त्याला चांडाळ हो असा शाप दिला. नंतर त्रिशंकु जगन्मित्र विश्वामित्र यास भेटला. वसिष्ठाचें आणि विश्वामित्राचें भांडण असल्यानें विश्वामित्रास ही एक चांगली संधीच मिळाली. विश्वामित्रानें त्रिशंकूस त्याची इच्छा पुरी करण्याचें आश्वासन दिलें. पहिली गोष्ट करावयाची ती ही कीं, त्रिशंकूस वसिष्ठ-पुत्राच्या शापांतून मुक्त करावयाचें. त्याकरितां विश्वामित्रानें मार्कंडेयाची भेट घेतली. त्याच्या सांगण्यावरून विश्वामित्रानें त्रिशंकूस पाताळीं पातळगंगेच्या स्नानास नेलें. स्नान केल्यावर शापमुक्त झाला. या विजयाचें स्मारक म्हणून पाताळेश्वर लिंग स्थापन केलें.

वरील लिंगस्थापनेवरून असें दिसतें कीं, हीं लिंगें स्थापण्यांत व्यक्तीच्या मानसिक उत्कर्षाचा विकास दर्शविला आहे. सर्वसाधारण जनतेला पूजनीय व्हावीं असा स्थापन करणाऱ्यांचा हेतु नव्हता. प्रत्येकानें लिंगस्थापना करणें बरें नाहीं अशी ब्रह्मदेवाची इच्छा होती. सर्वांकरितां एक लिंग तयार झालें तें सर्वांना पूजनीय होतें. याकरितां व्यक्तींकडून स्थापन झालेलीं लिंगें जयस्तंभाप्रमाणें मानिलीं. कालांतरानें तीही पूज-

नीय ठरविण्यांत आलीं. सर्वांना पूजनीय लिंगें स्थापन झालीं. तीं विष्णूनें अथवा ब्रह्मदेवानें स्पष्ट हेतूनें स्थापन केलीं अशांचीच उपासना सुरू झाली. माहेश्वर खण्डाच्या अरुणाचल महात्म्यांत विष्णूनें शिवलिंग स्थापन करण्यांत आपला हेतु व्यक्त केला आहे. शिवलिंग स्थापन करण्यांत भक्तिमार्गाची महति दाखवावयाची होती. विष्णूनें स्वतः शंकराची पूजा केली. ही पूजा प्रत्यक्ष शंकराची होती, प्रतीकाची नव्हती. पूजा करण्यांत भक्तिमार्गच प्रचारांत आणावयाचा होता. महान् विभूतींच्या आचरणाप्रमाणें आचरण करण्याची जनतेंत प्रवृत्ति असते. यज्ञसंस्थेच्या जागीं दुसरी संस्था धर्मनिष्ठेमुळें तयार करण्याचें नैतिक कर्तव्य पुराणकारांना पार पाडावयाचें होतें. यज्ञाचें शिवस्वरूपी प्रतीक ठरविण्याकरितां अनेक कथांचा आधार दिला आहे. गौतमानें लिंगस्थापना केली त्या वेळीं त्याला आलेल्या शंका व त्यांचें निराकरण करण्यांत आलें आहे. गौतमानें लिंगस्थापनेकरितां जो शोध केला त्यांत शिवाचें अग्निस्वरूप सिद्ध झालें. गौतम म्हणतो हे प्रभो, आपलें हें अग्निस्वरूप मला आकलन करितां येत नाहीं. मग मनुष्यलोकांत उचित अशा उपचारांनीं मी त्याची पूजा कशी करावी ? म्हणून शंकरानें सूक्ष्म रूप धारण केलें. या सूक्ष्म रूपाच्या पूजनानें या लोकांत भक्तिमार्ग आचरण्यास सुकर होईल. हें सूक्ष्म रूप सूर्य, चंद्र आणि अग्नि यांनीं शोभणाऱ्या त्रिकोणांनीं युक्त असें पर्वतमय रूप आहे, आणि हें सूक्ष्मरूप प्रतीक म्हणून प्रचारांत आणिलें. या गौतमाच्या कथेंत यज्ञसंस्थेचें प्रतीक ठरविण्यांत पुराणकारांची दृष्टि कशी होती याचें स्पष्ट प्रतिबिंब दिसतें. यज्ञसंस्थेचें परिवर्तन होऊन त्या ठिकाणीं सगुण रूप तयार झालें आणि भक्तिमार्ग प्रचलित केला. सूक्ष्म शिवरूप म्हणजे लिंग प्रचारांत आणिलें. शिवरूप सूक्ष्म स्वरूपांत ठेवणें आणि तें प्रतीक म्हणून भक्ति करण्यास योग्य असें होण्यास कांहीं काल गेला असावा. कारण पहिलीं प्रतीकें फारच मोठीं आणि भव्य होतीं. अग्निस्तंभाप्रमाणें होतीं. या अग्निस्तंभांनाच शिवलिंग मानलें असें काशीविश्वेश्वराच्या लिंगावरून वाटणें

संभवनीय दिसतें. अग्निस्तंभासारखीं लिंगें पूजनीय होण्यास सूक्ष्म पाहि-जेत आणि तीं देवालयांत ठेवण्यास साजेशींच पाहिजेत. या वेळीं देवालयें बांधण्यांत येत नव्हतीं असें दिसतें. देवालयाची प्रथा सुरू झाल्यावर सूक्ष्म-लिंगाची अवश्यकता वाटून त्याप्रमाणें आकार देण्यांत आला. लिंगरूप तयार झाल्यावर अग्निस्तंभ देवालयाबाहेर दीपमाळ नांवानें प्रस्थापित करण्यांत आला. शंकराच्या देवालयाला दीपस्तंभ अवश्य असतो. अग्नि-स्तंभाचें सूक्ष्म रूप लिंग याचा आकार नियमबद्ध नाहीं. कित्येक लिंगें फार मोठीं तर कित्येक फार लहान आहेत. महाकाल उज्जयैनी, सोमनाथ हीं लिंगें फार मोठीं आहेत. रामेश्वर, मांधाता वगैरे ठिकाणचीं लिंगें फारच लहान आहेत.सारांश देवालयें बांधण्याचा प्रघात सुरू झाल्यावर देवालयांत समाविष्ट होतील इतकीं सूक्ष्म लिंगें करण्यांत आलीं.वेदकालचें रुद्ररूप पुराण-कालीं शिवरूप सगुण शंकर झालें. रुद्ररूपाचें मूळचें स्वरूप कायम राखून परंपरा न सोडतां परिवर्तन करण्यांत आलें. शिवस्वरूप अग्निस्तंभाप्रमाणें आहे ही कल्पना जयप्राप्तीनंतर उभारलेल्या जयस्तंभांत होती व तेंच शिवप्रतीक मानिलें. गौतममुनीनें जसा शंकरास प्रश्न केला तसाच प्रश्न श्रीरामचंद्रानें शंकरास केला. ही कथा पद्मपुराण पातालखण्ड अध्याय १०५ मध्यें वर्णन केली आहे. पृथ्वीतलावर सर्वसामान्य माणसांस हे प्रभो, आपलें ध्यान कसें साधेल तें कृपा करून सांगावें. त्याचें जें उत्तर दिलें आहे त्यावरून पुराणकारांची शंकराचें प्रतीक ठरविण्यांत कोणती दृष्टि होती हें दिसतें. शंकरानें रामचंद्रास निर्गुण आणि सगुण अशा दोन प्रकारांनीं भक्ति करावी असें सांगितलें. अव्यक्तोपासनेनें माझें रूप हृदयांत स्थापन करून भक्ति करावी आणि अग्नि हें माझें स्वरूप समजून सगुण उपासना पूजाविधीनें करावी असा श्रीरामचंद्रास उपदेश केला. राम-चंद्रास अगर गौतम मुनीस व्यक्तिशः शंकराची उपासना करण्याची अवश्य-कता नव्हती. प्रत्यक्ष शंकराचें दर्शन त्यांना होत असे. परंतु जनतेकरितां भक्तिमार्ग प्रचलित करण्याच्या हेतूनें हे प्रसंग घडवून आणिले. आणि

त्यांत शिवप्रतीकाला कोणत्या तत्त्वांचा आधार आहे हेंहि पर्यायानें दाखवावयाचें होतें.

पुराणकारांनीं आपल्या विशिष्ट मतप्रचाराकरितां अतींद्रिय चमत्काराच्या कथा पुराणांत वर्णिल्या आहेत. त्या कालीं या कथा प्रत्येकाला वाचावयास मिळत किंवा कसें हें समजण्यास साधन नाहीं. तथापि सर्वसाधारण माणसांस त्या उपलब्ध नव्हत्या हें खरें. पुराणकारांच्या प्रसिद्धी तंत्राकडून त्यांचा प्रचार होई. या तंत्रांत प्रवचनकार, कीर्तनकार आणि अशाच प्रकारचे सूत सर्व देशभर संचारार्थ फिरत आणि सर्वत्र प्रचार करीत, त्यामुळें या कथांचा परिचय सर्वत्र होऊं लागला. श्रीरामचंद्र अगर श्रीकृष्ण अशा महान् विभूति कोणत्या ना कोणत्यां तरी मार्गानें प्रत्येक हिंदुमात्रास परिचित असत. लहानसहान इतिहास अगर चरित्रवर्णनें पुष्कळांस अवगत असण्याचा संभव नव्हता. विशिष्ट मतप्रचाराकरितां पुराणकारांनीं ज्या कथा लिहिल्या त्या कथांच्या प्रचारानें वस्तुस्थितीचें ज्ञान करून देण्याचें साधन निर्माण केलें. श्रीरामचंद्र आणि शंकर यांचा संवाद प्रसंग दाखवून पुराणकारांनीं शिवाचें प्रतीक ठरविण्यांत आपलें हृद्गत सर्वांपुढें उघडें करून दाखविलें आहे. त्यांतील महत्त्वाचीं तत्त्वें सांगून जनतेस मार्गदर्शन केलें. यज्ञसंस्थेचें परिवर्तन करणें अपरिहार्य ठरल्यानंतर तें कसें करावयाचें याचा विचार झाला असला पाहिजे. सामान्य माणसांस ईश्वराचें ध्यान कसें साधेल हा प्रश्न यज्ञसंस्था मागें पडल्यावर पुढें आला. समाजांतलि सूज्ञ माणसावर दुसरें कोणतें तरी साधन निर्माण करण्याची जबाबदारी पडली. यज्ञाच्या स्थानीं सगुण रूप अग्नि त्याची पूजाविधीनें भक्ति करावी असें जें उत्तर दिलें आहे तें यज्ञसंस्थेची परंपरा कायम ठेवण्याच्या हेतूनेंच दिलें आहे. यज्ञस्वरूप हेंच शिवस्वरूप किंवा रुद्ररूप आहे ही भावना कायम राखण्यांत आली. रुद्ररूप म्हणजे अग्नि आणि यज्ञक्रिया हाच पूजाविधि ठरवून यज्ञस्थानीं अग्निस्फुलिंग गोल ठेवण्यांत आला. यज्ञक्रियेप्रमाणें पूजाविधि तयार करून यज्ञसंस्था आणि यज्ञाचें प्रतीक जोडून परंपरा

कायम राखण्यांत आली. रुद्राध्याय आणि ऋक्संहिता यांतील यज्ञाचें आणि शिवाचें जें ऐक्य मानिलें आहे त्याचाच अनुवाद पुराणकारांनीं केला आहे. श्रीमत् राजाधिराज श्री वीर बुक्का भूपाल याच्या साम्राज्यशकटाचें जूं धारण करणाऱ्या सायणाचार्यांचें हें मत आहे आणि तें ऋक्-संहिता भाष्यांत स्पष्टपणें मांडिलें आहे. सारांश,महान् विभूतींच्या मुखांतून बाहेर पडणारीं वाक्यें प्रमाणसिद्ध असतात असा विश्वास असल्यानें पुराणकारांनीं कथानकांचें संधान अशा विभूतींशीं जोडिलें.त्यामुळें पंडित जन आणि सामान्य जन यांना या कथावचनांचा आदर वाटूं लागला. त्याप्रमाणें ते आचरण करूं लागले. स्कन्दपुराणांतर्गत कौमारिका खण्ड अध्याय २३ मध्यें महान् विभूतींच्या वचनाप्रमाणें मनुष्यांनीं चालावें असें अंगिरसानें अर्जुनास सांगितलें आणि लोकशिक्षणाकरितां तूं ( अर्जुना ) सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. तुझा सखा श्रीकृष्ण, बंधु धर्म तुला कशाचेंहि महत्त्व नाहीं. तथापि जनकल्याणाकरितां तुला तसें करणें उचित आहे, हा जो अभिप्राय पुराणकारांनीं प्रकट केला तो विशिष्ट मत प्रचाराकरितां आहे. कालमानाप्रमाणें आचार आणि विचार यांत योग्य तो फरक करण्यास पुराणकारांची तयारी होती. सर्वसाधारण माणसांच्या अभिरुचि जाणून यज्ञप्रार्थनेच्या विधींत फरक करून त्या ठिकाणीं दुसरा पूजाविधि तयार करण्यांत निरनिराळ्या कथांचा आधार द्यावा लागला. महान् विभूतींच्या आचरणाप्रमाणें मनुष्यांनीं आचरावें, याकरितां पुराणकारांचा हा सर्व निःस्वार्थ प्रयत्न होता. इतका मुद्दा यांतून स्पष्टपणें काढितां येतो. शिवाचें यज्ञस्वरूप म्हणजे संस्कार करून प्रज्वालित झालेला अग्नि हें जें परंपरेनें चालत आलेलें ध्येय तें मान्य केलेलें आहे. यज्ञस्वरूपांतील हें मुख्य तत्त्व आहे.मुख्य तत्त्व जीवनहेतु याला लिंग ही संज्ञा आहे.सांख्यांचीं जीं पंचवीस तत्त्वें आहेत त्यांना लिंग हीच संज्ञा आहे. त्यांतील उपस्थ नांवाचें तत्त्व उत्पत्ति–तत्त्व आहे. हें तत्त्व सृष्टिउत्पादक आहे आणि त्याला लिंगसंज्ञा आहे. महदादिकृत तत्त्वांनीं तयार झालेलें सूक्ष्मलिंग म्हणजे जीवात्मा.

त्याचप्रमाण यज्ञसंस्थेचें परिवर्तन झालें त्यावेळीं यज्ञाचें मुख्य तत्त्व शिव त्याला लिंग ही संज्ञा दिली गेली. याप्रमाणें परिवर्तन होऊन पूजाविधी-सह भक्तिमार्ग रूढ केला. लिंगपुराणांत या गोष्टी मान्य केल्या आहेत. सांख्यांचीं लिंगें या पुराणकारांनीं मान्य केलीं आहेत. या पुराणकारानें आपल्या लिंगपुराणांत वरील वर्णनाबरोबर आणखी जनकेंद्रियाचें अर्चन व कथानिरूपण दिलें आहे. हे पुराणकार साहित्यिक असल्यानें त्यांनीं आपल्या कल्पना त्याप्रमाणें मांडिल्या आहेत. हा सर्व अलंकारिक भाषेचा परिणाम आहे. तो नीट समजून घेऊन त्याचा सारांश काढिला पाहिजे. त्यांतील मूळ कल्पना सर्व विश्व निर्माण होण्यास शिव आणि शक्ति कारण आहेत, म्हणून दोन्ही देवतांच्या प्रतीकांचें अर्चन धर्मरक्षणाकरितां केलें पाहिजे या महत्त्वाच्या निष्कर्षाकडे दृष्टि ठेविली पाहिजे. इतकेंच काय परंतु बाहेरील देशांतील पंडितांतहि हीच वृत्ति आहे. प्रोफेसर विल्सन लिंगपुराणावर आपले विचार देतांना म्हणतो कीं:—

It requires a rather lively imagination to trace any resemblance in its symbol to the object which it is supposed to represent.

देवतांचीं प्रतीकें तयार झालीं त्यांत शिवाचें प्रतीक हें पहिलेंच प्रतीक आहे. यज्ञसंस्था ही प्रार्थनेची एकच पद्धति त्या कालीं प्रचलित असल्यानें प्रथम तयार झालें. हें पहिलें प्रतीक असल्यानें शिवाला आदिदेव अथवा महादेव असें म्हणतात. शिव हा महादेव असल्यानें त्याचे सर्वच भक्त झाले. पुढें पुराणकालच्या देवतांचा प्रपंच वाढला आणि निरनिराळ्या देवता आणि त्यांचे भक्त निर्माण झाले. तथापि महादेवाचे भक्त हिंदुस्थानांत शेंकडा पंच्याहत्तर असून बाकीच्या पंचवीस टक्क्यांत इतर देवतांचे भक्त आहेत. महादेवाचें वर्णन पुराणांत विस्तारपूर्वक केलें आहे. दुसरी एक कथा आदिदेवाची आहे. ती अशी:—

वेदकालानंतर आर्यांचा उत्तर ध्रुवाजवळील प्रांत सोडून जाण्याचा विचार ठरला. पहिल्यानें ते त्रिविष्टपाच्या बाजूला आले. त्रिविष्टप म्हणजे

स्वर्ग. यालाच तिबेट असें आज मानण्यांत येतें. त्रिविष्टपासंबंधीं पुराणकारांच्या वर्णनावरून बराच आधार मिळतो. उत्तरध्रुवाकडून आर्य खालीं आले ते त्रिविष्टपांत आले. कैलास आणि मानससरोवराजवळील रम्य प्रदेशांत आपलें निवासस्थान केलें. तिबेटच्या दक्षिणेकडील हिमालयाच्या पायथ्याशीं हीं स्थानें असल्यानें उत्तरध्रुवापेक्षां रमणीय वाटल्यास नवल नाहीं. कैलासावर शंकराची स्थापना झाली. बदरिकाश्रमीं विष्णूनें आपलें निवासस्थान केलें. काश्मीर इंद्राचें स्थान झालें. श्रीनगर आणि त्याच्या भोंवतीं इंद्राचीं इंद्रभुवनें आणि नंदनवनें तयार झालीं. शिवालिक पर्वतावर कुबेर आणि मानससरोवरावर वरुण याप्रमाणें देवतांची स्थापना झाली. सर्व तिबेटवर आर्य पसरले होते. पूर्वजांची देवांच्या ठिकाणीं स्थापना करून त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गात आणि वारंवार त्यांच्या सहाय्याची अपेक्षा करीत असें ऋग्वेद मंडल १० मध्यें वर्णन आहे. तिबेटांत आल्यावर आर्यांना भोंवतालील तार्तर,हूण वगैरे अनार्यांकडून वारंवार त्रास होत होता. अनार्यांच्या त्यांच्यावर स्वाऱ्या होत असत. त्यामुळें आर्यांना आपला नित्यविधि आचरण्यास व्यत्यय होत असे. या संकटांतून सोडविण्यास त्यांना इंद्रादि देवांची याचना करावी लागे. तथापि त्यांना हा प्रांत सोडावा लागला. देव आणि दानव या बंधूंनीं समुद्रमंथन करून चौदा रत्नें काढिलीं. त्याची हकीकत पुराणांतील चौदा रत्नांच्या श्लोकांत आली आहे. त्यावरून आर्य लोक उत्तरध्रुव सोडून त्रिविष्टपांत आले. तेथें नवीन वस्तु पाहिल्या. त्यांची गणना रत्नामध्यें करून आपला आनंद व्यक्त केला वगैरे माहिती पुराणांत आली आहे.

लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमाः
गावः कामदुहा सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः
अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधे
रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्यात् सदा मंगलम्

वरील श्लोकांत समुद्रमंथनाची हकीकत पुराणकारांनीं वर्णिली आहे

हा श्लोक सर्वांनीं प्रातःस्मरण करितांना म्हणावा अशी आज्ञा आहे. समुद्र-मंथनाची स्मृति कायम रहावी अशी ही योजना आहे.

हें समुद्रमंथन गोबीच्या वाळवंटांत झालें. उत्तरध्रुवापासून तिबेटच्या बाजूच्या हिमालयाच्या पायथ्यापर्यंतचा प्रवास आर्यांना करावा लागला असतां वाळवंटांत मंदलाचलाचा रस्ता चुकल्यामुळें अगर अन्य कारणानें प्रदक्षणा घालाव्या लागल्या. याचा अर्थ त्यांना या वाळवंटांत मंथन करावें लागलें. तें मंथन संपल्यावर आर्यांना प्रथम लक्ष्मी मिळाली. विष्णूकडून राहण्यास योग्य अशा जागा आणि पीकपाण्याची माहिती मिळाली म्हणजे लक्ष्मी प्राप्त झाली. कौस्तुभ रत्नांची व खाणींची माहिती प्रथमच हिमालयाच्या पायथ्याशीं मिळाली. उत्तरध्रुवाकडील बर्फमय प्रदेशांत सुवासिक फुलांचा अभावच असणार. इकडे आल्यावर हिमालयांतील सुवासिक फुलें दिसलीं तीं पारिजातक रत्नें झालीं. रुद्रप्रयाग आणि केदारनाथ या मार्गांत गुलाबाचीं झाडें फार आहेत. अनार्यांकडून सुरेबद्दल माहिती मिळाली. श्रमपरिहारार्थ ह्या रत्नांचा फार उपयोग होतो. समशीतोष्ण कटिबंधांत चालण्याचे श्रम वाटूं नयेत म्हणून हा प्रचार असावा. धन्वन्तरी मिळाली म्हणजे इकडे आल्यावर आर्यांच्या आहारांत आणि चर्येंत फरक पडत चालला. निरनिराळ्या प्रकारचे खाद्य पदार्थ वापरण्यांत येऊं लागले. त्यामुळें रोगाची उत्पत्ति झाली. त्याच्या परिहारार्थ धन्वन्तरीचा शोध लागला.

चंद्रमा रत्न दिसलें. उत्तरध्रुवावर क्षितिजावरच सूर्याचें भ्रमण असल्यामुळें त्याच्या तेजांत चंद्र दिसणें शक्य नव्हतें. चंद्रसूर्याच्या कक्षेंत फक्त पांच अंशांचा कोन आहे. आर्य त्रिविष्टपांत आल्यावर म्हणजे ४० अंशांवर आल्यावर त्यांना चंद्रदर्शन झालें. दुभाळ जनावरें आढळलीं. हत्ती दिसले. भोग्य अशा सुंदर स्त्रिया दृष्टीस पडल्या. या वेळीं आर्यांना काश्मीरची माहिती झाली असावी. सप्तमुखी अश्व म्हणजे सुंदर बहुगुणी अत्यंत उपयोगी पडणारा प्राणी. दैत्यांचा आणि देवांचा रत्नाबद्दल लढा सुरू झाला आणि विषबिंदु निर्माण झाला. धनुष्यबाणाची

युक्ति साधली. दैत्यांचा पराभव करण्यांत देवांना या रत्नांचा फार उपयोग झाला. शंख विजय प्राप्त झाल्यावर सर्वत्र त्याचें प्रदर्शन करण्याचें साधन म्हणून त्याची रत्नांत गणना करण्यांत आली. आणि हें सर्व एकजुटीनें वागल्यामुळें विजयप्राप्ति होतें म्हणजे अमृत प्राप्त होतें. तें सर्वांनीं प्राशन करून अजरामर व्हावें. अशा प्रकारें एकजुटीनें वागल्यास दैत्यांपासून कोणताहि उपद्रव व्हावयाचा नाहीं असा यावरून बोध घ्यावयाचा.

**संगच्छध्वं संवदध्वं संवो मनांसि जानताम्**
**देवा भागं यथापूर्वे संजानाना उपासते**

ही वेदकालची प्रार्थना पुराणकारांनीं "कुर्यात् सदा मंगलम् " मध्यें आणिली आहे. हा चौदा रत्नांचा श्लोक प्रातःस्मरण करतांना म्हणावा असा उपदेश केला. इतकें जरी झालें तरी आर्यांना त्रिविष्टप सोडावा लागला. त्याचीं अनेक कारणें आहेत. सिंधु, ब्रह्मपुत्रा यांच्या कांठाकांठानें खालीं हिंदुस्थानांत आले. येथें मात्र त्यांना शांति मिळाली. धंदा, उद्योग करण्यास सवड मिळाली. पंजाबांतील पंच नद्यांच्या समृद्ध भूमींत त्यांनीं शेती करण्यास प्रारंभ केला. कोणताहि धंदा सुरू करतांना त्यांत यश मिळावें ही इच्छा असते. तें यश प्राप्त व्हावें म्हणून प्रार्थना करण्यांत येतात. अशा प्रकारच्या प्रार्थना रुद्राध्यायांत आहेत. शेतीमध्यें यश प्राप्त होण्यास प्रथमतः नांगर मिळविला पाहिजे. कल्याणप्रद शिव प्राप्त होण्यास शिव करणाऱ्या शंकराची प्रार्थना आणि स्थापना झाली पाहिजे. नांगराच्या सहाय्यानें शिव प्राप्त करून घ्यावयाचें म्हणजे नांगराची आराधना केली पाहिजे. म्हणून नांगरास शिवाचें स्वरूप मानून त्याची यशप्राप्तीसाठीं आराधना करण्याचा प्रघात पडला. नांगराला म्हणजे त्याच्या फाळाला शंकराचें प्रतीक मानून त्याची प्रार्थना करण्यास सुरवात झाली. ओदनसव नामक यज्ञांत नांगराचा फाळ वैश्याला दक्षिणा म्हणून देण्याचा विधि आहे. नांगराच्या फाळाला अष्ट्रा असें म्हटलें आहे ( तैतेरिय. ब्रा. २-७-९ ). पुरुषसूक्तांतील राष्ट्रपुरुषाच्या रूपकांत वैश्यांनाहि पुढारीपणाचा मान दिला आहे.

ष्यांतीलच हा एक प्रकार आहे. ब्राह्मणासच दान घेतां येतें असें नव्हे. नांगरण्यास जमीन पाहिजे. हिमालयाच्या पायथ्याशीं असलेली सपाट विस्तीर्ण काळी जमीन प्राप्त झाली म्हणून ती महाकाली हिमालयाची मुलगी आणि नांगराची म्हणजे शंकराची अर्धांगी झाली.या साधनानें धनधान्याची उत्पत्ति होते म्हणून शिव पार्वती यांना उत्पत्तिप्रयोजक साधनें मानण्यांत आलीं. महाकालीचे सान्निध्याशिवाय नांगराचें प्रयोजन नाहीं. नांगराला वृषभाची अवश्यकता आहे म्हणून नांगराचें वाहन बैल झाला.म्हणून शंकराचें वाहन नंदी आहे. शेतावर राहणारा म्हणून याला गांवांत निवासस्थान नाहीं. गांवाबाहेर राहावें लागतें, म्हणून स्मशानवासी. नेहमीं मातींत काम करावयास पाहिजे, त्यामुळें कपडा वापरण्याची अवश्यकता कमी. मातीचे लेपन, भस्म नुसती लंगोटी अगर नग्नावस्था. कपडे असून उपयोगी नाहीं. डोक्यावर नेहमीं गंगा पाण्याची सोय पाहिजे. पाऊस पडल्यानें शेतकरी वर्ग प्रसन्न असतो. त्याचप्रमाणें शेतांत काम करण्यास उत्साह वाटतो. शेतीचीं कामें मोठ्या प्रमाणांत चालतात. पाऊस पडत नसल्यास त्याच्या डोक्यावर सतत पाण्याची धार धरली पाहिजे.म्हणजे बाहेरून कालव्याचें पाणी आणून शेती राखिली पाहिजे. शंकराचें असें अमंगल्य शील आहे. तथापि

अमंगल्यं शीलं तव भवतु नामैवमाखिलं ।
तथापि स्मर्तृणां वरदपरमं मङ्गलमासि ॥

अशी शंकराची आराधना करण्यानें परम मंगल प्राप्त होतें. येथें आर्यांनीं भटकण्याचें सोडून पंचगंगा मिळाल्यामुळें वैभव प्राप्त करून घेतलें. कैलासास अगर सप्तसमुद्रास जाण्याचें सोडून दिलें.कैलासांतील शंकराचें स्थान केदारला आणिलें. शेतीपासून म्हणजे शंकरापासून धनधान्य मिळालें आणि वैभव प्राप्त झालें म्हणून त्याला आदिदेव किंवा महादेव म्हणूं लागले.हा देव भोळा आहे म्हणजे याचे मदतीनें धनधान्य उत्पन्न होण्यांत फारशी अक्कल लागत नाहीं. थोड्या श्रमानें विपुल धान्य देतो म्हणजे प्रसन्न होऊन वर देतो. व्यापारांत प्रगति होण्यास अक्कल लागते.अंगांत कौशल्य पाहिजे. युक्तीचे डावपेच माहीत पाहिजेत. संपत्तिवैभव प्राप्त करून देणारी देवता

लक्ष्मीपति विष्णु झाला. त्याच्या निरनिराळ्या ऐषआरामाच्या आराधना करण्यास सुरवात झाली आणि त्याची स्थापना बदरीक्षेत्रीं करण्यांत आली. ही विशाला नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. केदारनाथाचें दर्शन पहिल्यानें घेऊन मग बदरीनारायणाचें दर्शन घ्यावें असा दंडक आहे तो यथार्थ आहे. आदिदेवांचा पहिला मान नंतर विष्णूचा. शंकराला आदिदेव अगर महादेव कां मानण्यांत आलें हें यावरून दिसेल. शिवाचा रुद्र, अग्नि आणि यज्ञ यांच्याशीं जो संबंध आहे तो पुराणकारांनीं शंकराचें प्रतीक ठरविण्यांत कायम ठेविला आहे. यज्ञसंस्था मागें पडून त्या ठिकाणीं प्रार्थनेसाठीं दुसरें कांहींतरी स्वरूप ठेवण्याचें प्रथम ठरलें, या दृष्टीनें आदिकारण म्हणून शिवाला आदिदेव मानण्यांत आलें असें जरी आहे तथापि मानवी जीवन सुखानें चालण्यास धान्य निर्माण करणें ही प्रधान क्रिया आहे म्हणून शिव प्राप्त करून देणारी देवता ती आदिदेव हें वरील कथानकांत दाखविलें आहे.

आदिदेवाचें स्वरूप—वर्णन वेद, संहिता ब्राह्मण यांत एकच आहे. उपनिषदांतहि तेंच आहे.

अग्निर्मूर्धा चक्षुषी चन्द्र सूर्योदिशः श्रोत्रे वाग्विवृताश्च वेदाः

मुं. २-१-१४

या आदि पुरुषाचें मस्तक द्युलोक म्हणजे अग्नि आहे. यावरून ईश्वराची व्याप्ति सर्वत्र आहे ही कल्पना दृढ होती. पुराणकारांनीं आदिदेवाच्या विराट स्वरूपाला व्यावहारिक स्वरूप देऊन त्याचें वर्णन केलें आहे. सारांश, वेदकालीं लहानमोठे यज्ञ करण्याव्यातिरिक्त व्यक्तोपासना प्रचारांत नव्हत्या. यज्ञसंस्था मागें पडून यज्ञाचें रूपांतर एवंगुणविशिष्ट असें यज्ञस्वरूप म्हणजे अग्निविरहित यज्ञाचा वेदीसहित दृश्यभाग यांत करण्यांत आलें. पूजाविधि यज्ञाचा आणि प्रतीक यज्ञाचें. वेदी ही शाळुंका आणि मधली पिंडी हें अग्निस्फुलिंग मानण्यांत आलें.

शिवाच्या प्रतीकपूजनविधींत बदल झालेला आहे. वेदकालच्या यज्ञविधींत जसजसा फरक होत गेला तसतसा प्रतीक पूजनांत फरक झाला. वेदकालानंतर ब्राह्मणकालीं वैदिक मंत्रांत शक्ति आहे ही भावना दृढ व्हाव-

यास लागली. निरनिराळ्या कर्मांचीं मंत्रप्रतिष्ठेप्रमाणें भिन्न भिन्न फलें ठरविण्यास सुरवात झाली. तंत्रकारांनीं याच तत्त्वावर निरनिराळ्या मंत्रांची उभारणी केली. वैदिकांसहि हे मंत्र सयुक्तिक वाटले. याचा परिणाम वैदिक कर्मावर होऊन अनेक तांत्रिक मंत्रांचा व अनेक देवतांचा समावेश करण्यांत आला. तांत्रिकांच्या प्रचारांमुळें आसनविधि, मुद्रा, कुंडमंडप विधि, बीजाक्षरांचा उगम वगैरे प्रकार वैदिकांनीं तंत्रांतून घेऊन वैदिक कर्मांत रूढ केले. बीजाक्षरांचा पुढें देवतांचे प्राणप्रतिष्ठा विधि, भस्मधारण, ताईत भारणें यांत उपयोग करण्यास सुरवात झाली. तांत्रिकांतील बऱ्याच गोष्टी अवैदिक असल्यानें सर्वांचा अंगिकार झाला नाहीं. मंत्रांतून निर्माण होणारी शक्ति देवतेच्या स्थानीं प्रतिष्ठित केली. पुरुष आणि प्रकृति यांच्यामुळें विश्व निर्माण झालें. पुरुष स्वतः कांहींच करीत नाहीं. त्याच्या इच्छामात्रेंकरून प्रकृतीचा संसार सुरू होतो. माया संवलित ब्रह्मापासून ही जड सृष्टि निर्माण झाली. यालाच मायेचें अघटित घटनापटुत्व म्हणतात. इतक्या प्रभावी प्रकृति मायेला पुराणकार देवतेचें स्थान देणार नाहींत असें कसें होईल ? पशुपक्ष्यांची देखील सोय देवतांत करण्यांत आली तेथें अघटित घटना करणारी मायाशक्ति देवतारूपानें स्थापन करण्यांत आली हें पुराणकारांच्या परंपरेला धरूनच झालें. प्रथम प्रथम शक्तिदेवतेचें सोज्वल स्वरूप ठेवण्यांत आलें. पुढें निरनिराळ्या मतांच्या गोंधळांत शक्तीचें स्वरूप शिवाच्या लिंगाच्या कल्पनेप्रमाणें जनकेंद्रियांत घालण्यांत कांहींनीं पुढाकार घेतला असें दिसतें. विराट पुरुष आदिदेव याच्याप्रमाणें माया अगर शक्ति जगाच्या धारणेस आणि मनुष्यप्राण्यांच्या उद्धारास कारणीभूत आहे ही भावना मात्र दृढ होती. तांत्रिकांच्या मंत्रांचा उपयोग या देवतेच्या अर्चनविधींत होऊं लागला. या मंत्रांना पुढें इतका ऊत आला कीं शिव आणि शक्ति यांचे निरनिराळे मंत्र तयार झाले आणि त्यांचीं अर्चनें मंत्रानुवर्ति होऊं लागलीं. सुरवातीस हीं अर्चनें शुद्ध सात्विक स्वरूपाचीं होतीं पुढें तांत्रिकांत एक सात्विक आणि दुसरा तामस असे दोन पंथ निर्माण झाले. दुसऱ्या

दा. क्र. ७३६६

तामस तांत्रिकाला तंत्रमार्ग, आगम, मंत्रशास्त्र, पूर्वकौल आणि वाममार्ग अशीं नांवें होतीं. त्यांच्या अर्चनविधींत सारखे बदल होत असत. त्यामुळें अर्चनप्रकारांत अनेक गोष्टींची भर पडत गेली. कालीपूजा या मतांतील तांत्रिकांनीं रूढ केली. बलिदानाचे, पुत्रप्राप्ति करून घेण्याचे वगैरे अनेक प्रकार अघोर मार्गानें करण्यास सुरवात झाली. बहुजनास हे मार्ग आवडले आणि त्यांचें आचरण सुरू झालें. हीं सर्व अर्चनें प्रतीकपूजा सुरू झाल्यानंतर प्रचारांत आलीं. श्रीगुरु शंकराचार्य यांनीं पुराणकालीं तयार झालेल्या देवतांचीं देवालयें स्थापन करण्याची पद्धति सुरू केली. त्यापूर्वी आर्यावर्तांत मोठमोठीं देवालयें नव्हतीं. प्रतीकपूजा आणि देवतांचे उत्सव होत नसत. बाणभट्टांच्या हर्षवर्धन चरित्रावरून आराधना आणि अर्चनें होत असत असें दिसतें. श्रीशंकराचार्यांच्या प्रयत्नानें वैदिक धर्माची घडी बसली. देवतांच्या पूजनांची व्यवस्थित पद्धति सुरू झाली. हिमालयांतील देवस्थानांचा इतिहास पाहिला तर असें दिसतें कीं श्रीगुरु शंकराचार्यांनीं हीं सर्व स्थानें प्रकाशांत आणून पूजनीय करून ठेविलीं. मानवप्राण्यांस भक्तिमार्ग दीपक करून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष साधण्यास देवालयें खुलीं करून दिलीं. त्यांत आगम पक्षानें पूजाविधींत निरनिराळे अनिष्ट प्रकार सुरू केले. तांत्रिकांची शक्ति उपासना मोठ्या प्रमाणांत सुरू झाली. शिवाचीं प्रतीकें जशीं तयार झालीं त्याच अनुरोधानें शक्तीचीं प्रतीकें तयार झालीं. पुरुष आणि प्रकृति, ब्रह्म आणि माया, शिव आणि शक्ति या द्वयींच्या संयोगानें सृष्टि निर्माण होते. हा सिद्धांत विशद करितांना पुरुषाचा प्रकृतीशीं संयोग, ब्रह्माचें मायेशीं लग्न अगर शिव आणि शक्तीचा एकत्र व्यवहार उत्पत्ति प्रवर्तक आहे अशी कल्पना या सिद्धांताला चिकटविण्यांत येण्याचा प्रयत्न एका सुपीक डोक्याच्या तांत्रिक महात्म्यानें केला. देवीमाहात्म्य, शक्तिपुराण, रुधिराध्याय वगैरे शक्तिदेवतेचीं वर्णनें तयार केलीं. यांतील भाषा देवतांना पराकाष्ठेच्या हीनत्वास नेणारी आहे. शक्तिदेवतेकडून इच्छित प्राप्तीचा कौल

मिळवितां यावा म्हणून जो शब्दप्रयोग उपयोगांत आणिला जातो तो अमंगल आणि त्याज्य असाच आहे. हे सर्व अर्चनविधि आणि पूजा सदसद्विवेकबुद्धीस पटणाऱ्या नाहींत व त्यांना वेदांची परंपरा नाहीं. कालीपूजेचा विलक्षण प्रकार बंद व्हावा म्हणून जयदेव कवीनें गीतगोविंद गाऊन कृष्णभक्ति वाढविली. विद्यापति चंडिदास, रामानंद, कबीर, चैतन्य वगैरे महान् पुण्यवान् पुरुषांनीं शक्तिपूजेपासून लोकांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. तथापि वंग प्रांतांत हे प्रकार अद्यापि मोठ्या प्रमाणांत चालू आहेत. शिवशक्तीचीं प्रतीकें जनकेंद्रियाची साथ असलेल्या कल्पनांनीं प्रतिष्ठित केलीं. असल्या कल्पनांवर आधार-लेल्या प्रतीकांनीं भलताच प्रचार होतो याचा अनुभव आपणांस पहा-वयास मिळतो. शिवाचें स्वरूप अग्नि आहे असें वेदकालापासून मान-ण्यांत आलें आहे. रुद्राध्याय, रुद्रसूक्तें यांतील वर्णन यज्ञाचें रुद्र आणि शिवस्वरूप यांसंबंधीं आहेत. उपनिषदांनीं तेंच वर्णन केलें आहे. पुराण-कारांनीं याच आधारें पुराणांत व स्तोत्रांत आणि शिवकवचांत शिवस्वरूप दाखविलें आहे. पुराणकारांनीं शिवाचें शुद्धस्वरूप जें अग्नि त्याचेंच वर्णन केलें असल्यानें अग्नि आणि यज्ञ याव्यतिरिक्त दुसरी कांहीं भावना होती असें दिसत नाहीं. शंकरानें दशाननाला आत्मलिंग दिलें. तें लिंग चराचर व्यापून असल्यानें रावणाला सर्व विश्वावर ताबा ठेवण्यास साधन होतें. परंतु तें लिंग त्याला लाभूं नये म्हणून गजाननाच्या बटु वेषाच्या मदतीनें रावणाचे मनोरथ निष्फल करण्यांत आले. बटूनें तें लिंग गोकर्ण क्षेत्रीं खालीं ठेवल्यानें रावणानें सर्व शक्ति खर्च करू-नहि तेथून निघालें नाहीं, अशी कथा आहे. याचा अर्थ इतकाच कीं सर्व चराचर व्यापून असणारें लिंग अखिल विश्वांतून निराळें ठेवतां येणार नाहीं. अग्नि तत्त्वाचा हा एक स्फुल्लिंग आहे. पुराणकारांनीं ही कल्पना कायम राखिली आहे. हीं वर्णनें निरनिराळ्या रूपकांत केलेलीं आहेत हें जरी खरें, तरी तो अलंकारिक भाषेचा परिणाम आहे. त्यांत

दुसरी कल्पना नाहीं. वेदकालीं पंचमहाभूतांची प्रार्थना करीत. या प्रार्थना यज्ञसमयीं करण्यांत येत. अग्नि, सूर्य, आणि मरुत् यांच्या प्रीत्यर्थ प्रार्थना करून चतुर्विध पुरुषार्थ साधण्यांत येत असे. हीच परंपरा यज्ञ-संस्था मागें पडल्यावर यज्ञाचें प्रतीक तयार करून कायम ठेविली. त्यांत पंचमहाभूतांच्या कल्पना कायम होत्या. यज्ञ म्हणजे रुद्र किंवा अग्नि. संस्कार करून तयार झालेला अग्नि म्हणजे यज्ञ. वेदीसह यज्ञाचें प्रतीक ठरविलें. ही भावना स्पष्ट ठसावी याच हेतूनें शिवाच्या प्रतीकाचा आणि पंचमहाभूतांचा संबंध दाखविला आहे. तो पंचमहाभूतांचीं द्योतक अशीं पांच लिंगें स्थापन करून स्पष्ट केला आहे. हीं सर्व दक्षिण हिंदुस्थानांत आहेत. कांचिवरम् येथें पंचमहाभूतांतील पाहिलें पृथ्वीतत्त्व म्हणून पृथ्वीलिंग आहे. त्रिचनापल्लीला आपलिंग [ जलेश्वर ] श्री कालाहस्तीला अग्निलिंग, तिरुवण्णामल्लीला वायुलिंग आणि चिदंबरमला आकाशलिंग अशीं पंचमहाभूतांचीं पांच लिंगें आहेत. ही कल्पना स्पष्ट दाखविते कीं शिव हें यज्ञाचें प्रतीक आहे. त्यांत दुसरी कोणतीहि कल्पना आधार घेतलेली नाहीं. प्रतीकपूजनाच्या उत्पादकांना शिवलिंगाबद्दल यथार्थ कल्पना होती असें स्पष्ट दिसतें.

# ज्योतिर्लिंग क्षेत्रें

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्
उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम्
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम्
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे
हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये ॥

( शिवपुराणमूलस्तंभः )

ज्योतिर्लिंगें बारा आहेत. तीं शिवपुराण मूलस्तंभामध्यें वरीलप्रमाणें वर्णिलीं आहेत. १ काठेवाडांत वेरावळजवळ सोमनाथ, २ शैलपर्वतावर मल्लिकार्जुन बेझवाड्याजवळ, ३ उज्जैनीस महाकाळ, ४ खांडव्याजवळ नर्मदातटाकीं अमलेश्वर ओंकार मान्धाता, ५ परभणीजवळ परळी वैजनाथ, ६ जुन्नरजवळ भीमाशंकर, ७ सेतुबंध रामेश्वर, ८ औढ्या नागनाथ पूर्णा ते चोंडिया रेल्वे लाईनवर, ९ वाराणसी काशी, १० नाशिकजवळ त्रिंबकेश्वर, ११ हिमालयांत केदारनाथ, १२ वेरूळजवळ शिवालय, घुसृणेश्वर.

दक्षिण प्रांतांत वरीलप्रमाणें बारा ज्योतिर्लिंगें मानितात.उत्तर हिंदुस्थानांत परळी वैजनाथ आणि गुजराथ प्रांतांत दारुकावनांतील नागेशाबद्दल निराळा समज आहे. “ परल्यां वैजनाथं च ” असा जो वरील श्लोकांत पाठ आहे त्याचा संबंध दक्षिण हैद्राबादमधील पूर्णा स्टेशनजवळील वैजनाथाशीं आहे. उत्तर हिंदुस्थानांत वैजनाथ म्हणून जें मानण्यांत येतें तें बंगालमधील असनसोल ते मोकामेघाट या रेल्वे रस्त्यावर जसडीह ते वैजनाथ असा ई. आय्. रेल्वेचा फाटा आहे त्याचें शेवटचें स्टेशन आहे तें वैद्यनाथम् म्हणून होय. येथेंहि शिवाचें मोठें भव्य मंदिर असून ज्योतिर्लिंगाचें सर्व वैभव दिसतें. महाशिवरात्रीस मोठी यात्रा येते.

मोठ्या प्रमाणांत उत्सव होतो. वरील श्लोकांत परळी वैजनाथ असा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु उत्तर हिंदुस्थानांत " पूर्वोत्तरे प्रज्वलिका निधाने सदावसतं गिरिजासमेतम् । सुरासुराराधितपादपद्मं श्रीवैद्यनाथं तमहं नमामि ॥ " असा ज्योतिर्लिंगाच्या स्तोत्रपाठांत श्लोक आहे. ' परल्यां-वैजनाथं च ' असा पाठ उत्तर हिंदुस्थानांत किंवा हिंदी पुस्तकसंग्रहांत आढळत नाहीं. दोन्ही ठिकाणीं ज्योतिर्लिंगाच्या वैभवांत कमीपणा नाहीं. तथापि बंगालमधील वैद्यनाथ हें ज्योतिर्लिंग नाहीं याला आणखीहि आधार आहेत. ज्योतिषशास्त्रावरील सिद्धांतशिरोमणि नामक ग्रंथांत भूमध्य रेखा ठरविली आहे. त्यांत भूमध्यरेषेचें वर्णन केलें आहे.

पुरी रक्षसां देवकन्याथ कांची सितः पर्वतः पर्यली वत्स गुल्मं ।
पुरी चोज्जयिन्याव्हया गर्गराटं कुरुक्षेत्रमेरुभुवोमध्यरेखा ॥

रेखांश मोजण्यासाठीं या रेषेचा उपयोग करतात. ही रेषा राक्षसांची नगरी लंका तेथून कन्याकुमारी कांची शैलपर्वत परळीवरून मेरु पर्वतावर जाते. यांत भूमध्यरेषा ज्या प्रसिद्ध क्षेत्रावरून जाते त्यांत पर्यळी म्हणजे परळी क्षेत्रांतून जाते असा स्पष्ट उल्लेख आहे. परळी क्षेत्र प्रसिद्ध मानण्याचें कारण तें ज्योतिर्लिंग आहे म्हणून त्याला महत्त्व आहे. आणि त्याचाच उल्लेख करण्यांत आला हें उघड आहे. तसेंच " नागेशं दारुकावने " या क्षेत्राबद्दल द्वारका क्षेत्र वर्णनांत " नागेशं द्वारकावने " असा पाठ आला आहे. द्वारका क्षेत्रांतील नागेशाचें स्थान गोपीतलावा जवळ आहे. गोपीतलावावर महाभारत कालानुरोधानें देवालयें स्थापन झालेलीं आहेत. हीं सर्व देवालयें अगदीं लहान लहान आहेत. अर्जुनाचें देवालय तसेंच लहान असून जीर्णावस्थेंत आहे. नागेशाच्या देवालयाच्या वैभवावरून तें ज्योतिर्लिंग नसावें असें म्हणण्यास हरकत नाहीं. द्वारका-धीश श्रीकृष्ण मंदिराचें वैभव पाहतां या ज्योतिर्लिंगाकडे जनतेचें लक्ष नाहीं अगर हें ज्योतिर्लिंग नसावें म्हणून येथें उत्सव अगर यात्रा भरत

नाहींत. द्वारकावन म्हणजे द्वारका नांवाचें अरण्य असा उल्लेख पुराणांत आलेला आढळत नाहीं. समुद्रकांठ असल्यानें साधे वृक्षहि नाहींत. श्रीकृष्ण अवतारासमयीं तेथें वन किंवा अरण्य असेल असें दिसत नाहीं. बाकीच्या स्थानांबद्दल द्विमत नाहीं आणि तें होणें शक्यहि नाहीं. स्थानाबद्दल स्पष्ट उल्लेख नसल्यानें हा मतभेद झाला आहे. " पूर्वोत्तरे प्रज्वालिकानिधाने " आणि " याम्ये सदंगे नगरेऽतिरम्ये " असें वैजनाथ आणि " नागेश " या स्थानांचा उल्लेख आहे त्यांत स्थानाचा बोध स्पष्ट नाहीं."परल्यां वैजनाथं च"आणि"नागेशं दारुकावने" यांत तो स्पष्ट आहे. हिंदी संग्रहांतील उल्लेख स्पष्ट नसल्यानें मतभेदाला स्थान मिळालें आहे. प्रज्वालिका स्थानाच्या पूर्वोत्तर भागीं असलेलें क्षेत्र असा जरी पाठ घेतला तथापि वैद्यनाथाचा बोध होत नाहीं. प्रज्वालिका प्रज्वली-परजली-पर्यली-परली असाच पाठ तयार होणार. म्हणून परळी क्षेत्रीं वैजनाथ ज्योतिर्लिंग आहे असेंच म्हटलें पाहिजे. बंगालमधील वैद्यनाथम् क्षेत्राचा स्पष्ट बोध होईल असा शब्दप्रयोग कोणत्याहि ठिकाणीं नाहीं. शिवपुराणांतील वरील श्लोकांत परळीचाच उल्लेख आहे.

ज्योतिर्लिंगाची संख्या बारा आहे. रुद्राध्यायांतील चमकाच्या शेवटच्या अन्वकांतील संख्येच्या क्रमाप्रमाणें शिवाचीं मुख्य स्थानें अकरा असावयाचीं.कारण एकादशणीचें लघुरुद्र, महारुद्र वगैरे जीं धार्मिक कृत्यें होतात त्यांत अकरा, एकवीस, एकशें आठ संख्या येते. अकरा रुद्र व त्याप्रीत्यर्थ अकरा शिवालयें असावयास पाहिजे होतीं. शिव भानुप्रिय मानिला आहे. सूर्य आणि अग्नि यांच्या मूळ अर्चनेच्या ठिकाणीं स्थापना करते वेळीं शिवाला सूर्याचीं बिरुदावलें लाविलीं असावीं. ज्योतिर्लिंगें हीं शिवाचीं शिवालयें म्हणजे मूळचीं वसतिगृहें मानिलीं आहेत. कैलासापासून रामेश्वरापर्यंत सरळ रेघ काढिली तर हीं वसतिगृहें या रेघेवर थोडया आजूबाजूस वसलीं आहेत असें दिसून येतें. याशिवाय काश्मीरमधील पेहल गांवाजवळ छोटयाशा टेकडीवर अमलेश्वराचें पुरातन देवालय आहे. जवळच अमरनाथ क्षेत्र आहे.



वेरूळ येथील घृष्णेश्वराचें देऊळ.

हीं ज्योतिर्लिंगें मानितात. महाबळेश्वर आणि गोकर्ण यांनाहि तसेंच मानितात, परंतु यांचा समावेश द्वादश ज्योतिर्लिंगांत होत नाहीं.

वरील बारा ज्योतिर्लिंगांतील पहिलें सौराष्ट्रांतील सोमनाथ आहे. सौराष्ट्र म्हणजे सुराष्ट्र चांगलें राष्ट्र किंवा देश. हा प्रांत फार सुपीक आणि समृद्ध असल्यानें त्याला सुराष्ट्र ही संज्ञा प्राप्त झाली. द्वारका, सुदामपुरी, प्रभास आणि सोमनाथ हीं स्थानें सुराष्ट्राचीं गमकें आहेत. प्रभास हें श्रीकृष्णाच्या निजधामाचें स्थान असून तेथील भातकुंड हें श्रीकृष्णाच्या मृत्यूचा साक्षात्कार दाखवितें. हिंदुस्थानास सुवर्णभूमि म्हणतात. त्यामुळें बाहेरून त्याच्यावर नेहमीं स्वाऱ्या होत. इसवीसनापूर्वी शकांनीं येथें राज्यें स्थापून सौराष्ट्र आपल्या ताब्यांत ठेविला होता. सातव्या शतकांत वलभी राजांनीं शकांचा पराभव करून आपलें राज्य स्थापिलें. ध्रुवभट वलभी राजाचा कनोजच्या हर्षवर्धन गुप्ताशीं संबंध होता. भट्टीकाव्य लिहिणारा भट्टी हा वलभी राजाचा आश्रित होता. पुढें चांद घराण्यांतील रजपूत राजांचा अंमल काठेवाड प्रांतांत होता. तो मोगलशाही सुरू होईपर्यंत टिकला. देश सुपीक असला म्हणजे तेथील प्रजा सुखी आणि संपत्तिमान् असते. सौराष्ट्र समृद्ध असल्यानें बाहेरील लोकांचे डोळे त्याकडे लागले. धाडशी व दुष्ट लोकांना तो आकर्षक बनला. देशाच्या भरभराटीप्रमाणें त्यांतील देवालयें वैभवसंपन्न होतीं. सोमनाथ देवालयाचें वैभव अतुल होतें. म्हणूनच यवनांच्या स्वाऱ्यांची धाड सोमनाथावर पडली. संपत्ति बाळगणें हा दोष नाहीं परंतु ती संभाळणें फार कठीण असतें. संपत्ति सांभाळण्याइतकी तरी शक्ति पाहिजे. दुर्दैवानें ठोशास ठोसा देणारी वृत्ति हिंदूंत नसल्यानें बाहेरच्या क्रूर व धाडशी लोकांच्या टोळधाडी मोडून टाकण्यास कोणताहि उपाय योजण्यांत आला नाहीं. शिकंदरापासून हीच वृत्ति हिंदूंची होती असें इतिहास सांगतो. या टोळधाडींनीं सोमनाथचा बळी घेतला ही गोष्ट हिंदूंचें निर्बलत्व दाखविते. इतकेंच नव्हे तर मनाचें हीनत्वहिं दाखविते. शत्रूला आंत घेण्यास सूर्याजी पिसाळासारखे लोक या टोळधाडींना साह्य करण्यास निर्माण झाले होते. सोमनाथाच्या स्वारीच्या प्रसंगीं तेथील रक्षकांनीं आणि इतर भक्तमंडळींनीं शत्रूबरोबर दोन हात करून त्याला

अडवून धरण्याची शर्थ न करितां यवन आंत आल्यास दग्ध होईल या भोळ्या कल्पनेवर विसंबून राहिले.

सोमनाथ हें काठेवाडांत जुनागडच्या संस्थानांत आहे. सोमनाथ गांव नवाबाचा परंतु देवालय गायकवाड सरकारचें आहे. राजकोट ते वेरावळपर्यंत जुनागड रेल्वे आहे. वेरावळ शेवटचें स्टेशन आहे. वेरावळ बंदर असून मुंबई कराची मार्गावर आहे. मोठ्या बोटी धक्क्याला लागण्याची सोय आहे. वेरावळपासून एक मैलावर सोमनाथ आहे. गांवांत शिरतांच चौकी लागते. येथें जकात भरावी लागते. यात्रेकरूंना जकातदारांच त्रास होत नाहीं. सामानहि तपासीत नाहींत.सोमनाथ तालुक्याच्या शहरासारखें आहे. देवालयांत सर्व व्यवस्था आहे. मुख्य पुजाऱ्याची नेमणूक बडोद्याहून होते. प्रस्तुतचें देवालय पहिल्या लुटल्या गेलेल्या देवालयाजवळच बांधिलें आहे. जुन्या देवालयाचा कांहींहि अवशेष भाग दिसत नाहीं. जुन्या देवालयाचें स्थान दाखविलें जातें तें स्थान म्हणजे एक दगडांचा मोठा ढीग आहे. सध्यांचें देवालय भव्य आणि प्रशस्त आहे. किल्ला आणि त्यांतील बालेकिल्ला अशी रचना आहे. मुख्य दरवाजा शनवारवाड्याप्रमाणें आहे. ह्या दरवाज्यांतून आंत आल्यावर दुसरा दरवाजा लागतो. आंत प्रशस्त पटांगण असून मध्यें देवालय आहे. मंदिराचा चौथरा उंच आहे. वर चढून गेल्यावर मुख्य सभामंडप व त्यानंतर गाभारा आहे. गाभाऱ्यांतील शिवलिंग नमुन्याचें दर्शनी दिसावें या हेतूनें ठेविलें आहे. मुख्य लिंग तळघरांत आहे. सभामंडपांत आल्यावर डाव्या बाजूस एक लहान दगडी जिना आहे. काळोख असल्यानें जपूनच उतरावें लागतें. शिवदर्शनाचा मनाला एक प्रकारचा आनंद होतो. परंतु त्याचवेळीं लिंगविच्छेदनाचा इतिहास डोळ्यांपुढें दिसूं लागतो. शिवदर्शन करून वर आल्यावर इतर धार्मिक विधि बाहेर करितात. देवालयाच्या समोर गोमती तीर्थ आहे. द्वारकेच्या गोमती तीर्थाप्रमाणें हें समुद्र तीर्थ आहे. द्वारकेला गोमती स्नान करण्यास कर भरावा लागतो. येथें तसा कर नाहीं. मुख्य पुजाऱ्याकडून यात्रेकरूंची सोय होते. सोमनाथास जाण्यास रेल्वे आणि आगबोट अशा दोन्ही सोयी आहेत. रेल्वेनें अहमदा-

बादहून विरमगांव व तेथून छोट्या लाईननें वढवाण ते राजकोटला जाऊन गाडी बदलावी लागते. राजकोटहून वेरावळपर्यंत गाडी आहे. वेरावळजवळच सोमनाथ आहे. मुंबई कराची, आगबोटी वेरावळला थांबतात. मुंबईहून प्रिन्सेस डॉकमधून कराचीच्या बोटी सुटतात. मुंबईहून जाणाऱ्यांस बोटीचा प्रवास सोयीचा आहे.

श्रीशैले मल्लिकार्जुनम् हें दुसरें ज्योतिर्लिंग आहे. हें स्थान मद्रास इलाख्यांत कर्नुल जिल्ह्यांत कृष्णा नदीच्या कांठीं आहे. शैल पर्वताच्या शिखरावर हें शिवालय आहे. श्री मल्लिकार्जुनाचें मंदिर चार हजार फूट उंचीवर आहे. मंदिराजवळच एक मोठी पुष्करणी असून पाणी विजेच्या पंपानें देवळासभोंवतीं ठिकठिकाणीं नळानें पुरविलें जातें. मंदिर एका भव्य आणि विस्तीर्ण पठारावर असल्यानें यात्रिकरूंना जागेची अडचण भासत नाहीं. मंदिरासभोंवतीं तीस फूट उंचीचा कोट आहे. त्याला चार दिशांना चार दरवाजे आहेत. उत्तर दिशेचा दरवाजा श्री शिवाजी-महाराजांच्या नांवाचा असून त्यांनींच या दरवाजाचा जर्णोद्धार केला. श्री शिवाजी महाराजांची या देवस्थानावर फार भक्ति होती. श्री मल्लिकार्जु-नाच्या देवालयाच्या पाठीमागें ब्रह्मावरदा देवीचें देवालय आहे. ही भवानी म्हणून प्रसिद्ध आहे. याच भवानीचा आशीर्वाद आणि भवानी तलवार शिवाजी महाराजांस मिळाली असें सांगतात. प्रतापगडावर भवा-नीची स्थापना केली ती याच भवानीची केली. सर्व दगडी काम अस-ल्यानें इमारती टिकाव धरून आहेत. सध्यां कांहीं दगड पडूं लागले आहेत. म्हणून ठिकठिकाणीं लांकडी खांबाचे टेकू देऊन सुरक्षितता आणली आहे. या देवालयाची स्थापना आद्य शंकराचार्यांनीं केली असें मानतात. मुख्य दरवाजापासून गाभाऱ्यापर्यंत सहा सभामंडप आहेत. सभा-मंडपाचीं दगडी बहालें १२ × ३ × २॥ आकाराचीं एकसंध आहेत. महाशिवरात्रीचे दर्शनास दोन रुपये कर आहे. तो भरून पास घ्यावा लागतो. तो दाखविल्यावर प्रवेश मिळतो. यात्रा फार येते ह्यामुळें दर्शन घडण्यास दोन तीन तास लागतात. पोलिस बंदोबस्त भक्तांना प्रसन्न चित्तानें दर्शन

घडवून देण्यासारखा नसल्यानें फार त्रास सोसावा लागतो. यां बाबतींत तेथील मुख्य अधिकाऱ्यांशीं बरीच चर्चा करावी लागली. काय करावयास पाहिजे तेंहि आम्हीं सुचविलें. महाशिवरात्रीच्या आदल्या दिवशीं आम्ही येथें येऊन पोहोंचलों. आल्यावर पास काढून मंदिर-प्रवेश केला होता. त्यावेळीं गर्दी नसल्यानें स्वस्थपणें दर्शन झालें होतें. येथें पुजारी रहात नसल्यानें दररोज पूजा होत नाहीं. माघ आणि चैत्र असे दोन महिने पुजारी राहण्याची व्यवस्था करितात. श्री शंकराचार्यांच्या अनुज्ञेनें नंदियाळ येथून श्रीशैल-देवस्थान मंडळ सर्व व्यवस्था करतें. महाशिवरात्रीचें उत्पन्न जवळजवळ तीन लाख रुपये होतें. या दिवशीं शिवपार्वतीविवाह रात्रीं आठ वाजतां मोठ्या थाटानें होतो. शंकराचार्य व त्यांचा परिवार या समारंभास हजर असतो. देवालयांतील शिवलिंग उभें नसून बरेंच तिरकें आहे. बराच तपास केला, समाधान झालें नाहीं. जी कांहीं माहिती मिळाली ती अशी कीं, येथील भिल्ल लोकांनीं लिंगाच्या खालीं बरेंच द्रव्य मिळेल या हेतूनें लिंग खणून काढण्याचा प्रयत्न केला. लिंग निघालें नाहीं परंतु थोडें कललें व तें तसेंच राहिलें. आदल्या दिवशीं दर्शन झालें. तथापि महाशिवरात्रीस दर्शन घेणें व त्याचकरितां इतक्या लांबचा प्रवास करून आल्यानें या दर्शनास महत्त्व होतें. म्हणून रांकेंत उभें राहून खालीं ढकलाढकली आणि वरून कांहीं ठिकाणीं ऊन अशा कर्तरींत दोन तीन तास पडावें लागतें. दर्शना-पूर्वी पाताळगंगेचें स्नान करणें जरूर असतें. पाताळगंगा म्हणजे कृष्णा नदी. श्री शैलापासून पाताळगंगा साडेतीन मैल उतार आणि परत येतांना तितकाच चढ चढावा लागतो. इतकें होतांना बाराचा सुमार होतो. पुढें दोन तीन तास दर्शनाकरितां जातात. पाताळगंगा दोन पर्वतांमध्यें असल्यानें फार गंभीर दिसते. पर्वतांचे पायथ्यापर्यंत पाताळगंगा भिडली आहे. श्री-शैलाच्या बाजूस खालीं थोडी सपाटी आहे व तेथें पाणी नसतें. याच ठिकाणीं खालीं उतरून स्नान करतां येतें. घाट वगैरेंची सोय नाहीं. पर्वताच्या पायथ्याजवळ थोडें वाळवंट असल्यानें स्नानाची सोय होते. सह्याद्रिपर्वतांत

उगम पावून पूर्व समुद्रास मिळण्यापूर्वी कृष्णानदीस पूर्वघाट ओलांडावा लागतो. पूर्वघाटांत शिरल्यावर श्रीशैलाजवळ दोन उंच पर्वतांमधून कृष्णा-नदी वाहते. या पर्वतांत मोठमोठीं भुयारें असून तेथें साधु संन्यासी राहतात असें म्हणतात. प्रवास कष्टप्रद, साधनांचा अभाव,वाटेंत निवाऱ्याच्या जागा नाहींत,तथापि आंधळ्या पांगळ्या भिक्षेकऱ्यांची गर्दी पाहून आश्चर्य वाटलें.

श्रीशैलास जाण्याचे दोन तीन मार्ग आहेत. एक बेझवाड्यावरून जातो. बंगाल, ओरिसा आणि पूर्व भागातील यात्रेकरूंस हा मार्ग सोईचा आहे. दुसरे कर्नूल आणि नंदियाळवरून आहेत. हेच मार्ग आपल्या-कडील यात्रेकरूंस सोयीचे आहेत. नंदियाळ हें गुंटकल बेझवाडा लाईनवर आहे. आणि कर्नूल हें याच लाईनवर द्रोणाचलम् ते शिकंदराबाद रेल्वे-वरील स्टेशन आहे. नंदियाळ अगर कर्नूलवरून पुढें आत्मकुरूला एक मार्ग होतो. कोणत्याहि ठिकाणाहून निघालें तरी आत्मकुरूला यावें लागतें. येथें आल्यावर तीस मैल प्रवास पायीं अगर बैलगाडीनें करावा लागतो. आत्मकुरूपर्यंत मोटार सर्व्हिस आहे. आत्मकुरूपासून पचरबूपर्यंत बैल-गाडी जाण्याचा रस्ता आहे. हा तीस मैलांचा बैलगाडीचा प्रवास झाल्या-नंतर पचरबू ते श्रीशैल पंधरा मैल प्रवास पायींच करावा लागतो. यासाठीं दुसरी कसलीहि सध्यां सोय नाहीं. पचरबूहून बारा मैल भीमखोल किंवा भीमतोळा आहे. येथें पुढील प्रवासास अम्मा डोल्या मिळतात. एका डोलींत एकच माणूस बसूं शकतो. आत्मकुरूपासून पचरबूपर्यंत मोटारी जाऊं शकतील अशी सडक तयार करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे.परंतु महायुद्धामुळें हें काम स्थगित करण्यांत आल्याचें सम-जलें. आत्मकुरूपासून पचरबूपर्यंत सडक होऊन मोटारींची रहदारी सुरू झाल्यास प्रवासाचे हाल बरेच कमी होतील.आत्मकुरूला बैलगाडी ठरवितांना आपल्याकडील यात्रेकरूंची भाषेमुळें मोठीच गैरसोय होते. हिंदू बैलगाडी-वाल्याजवळ आपल्याकडील माणसास तोंड उघडण्याची सोय नसते. म्हणून सौदा पटत नाहीं. गाडीवाल्यांत मुसलमानांची संख्या फार आहे. त्यांना

स्थानिक भाषा आणि हिंदीहि समजतें. त्यामुळें त्यांच्याशीं निदान हिंदी-मध्यें बोलून सौदा करितां येतो. या प्रवासासंबधीं निरनिराळीं यात्रा-वर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत.माझी तीर्थयात्रा नामक पुस्तकांत प्रवास-वर्णन सविस्तर आलें आहे. प्रवासाचीं साधनें बदलत आहेत. जुनी माहिती नवीन साधनाच्या प्रवासास आवश्यक नसल्यानें तशी माहिती येथें देणें फायदेशीर होणार नाहीं. पचरबूपासून जो पायीं प्रवास करावा लागतो त्याबद्दल दोन शब्द लिहिणें अवश्यक आहे. पचरबू ते श्री शैल सडक होण्यास कालावधि लागणार म्हणून तसे रस्ते होईपर्यंत पायींच गेलें पाहिजे. या भागांत जातांना वाटेंत पाणी मिळत नाहीं. विहिरी आणि लहान ओढे आहेत त्यांना पाणी अगदीं बेताचेंच असतें. परत येतांना मात्र मुळींच पाणी नसतें. पचरबूहून सकाळीं निघाल्यास श्री शैलाच्या मुख्य पर्वताच्या पायथ्याशीं येण्यास दहा अकरा वाजतात. सर्वांत हाच चढाव फार मोठा आहे. तशांत पाठीवर ऊन येतें. त्यामुळें चढण्याचे कष्ट फार आहेत. या पर्वताच्या पायथ्याला भीमखोल म्हणतात. या ठिकाणीं पायथ्याशीं एक लहान ओढा आहे. त्याला जातांना थोडें पाणी असतें. परत येते वेळीं त्यांत मुळींच पाणी नसतें. भीमखोल म्हणजे खोल ठिकाण. एकाद्या गोष्टीची पराकाष्ठेची गंभीरता दाखवावयाची असतां त्याला भीमाची उपमा देतात. एका बाजूनें उतरत उतरत तळापर्यंत आल्यावर मग चढावयास सुरवात होते. ह्या तळामध्यें बसून वर पाहिलें कीं दोन्ही बाजूंचे पर्वत एकमेकांस चिकटलेत कीं काय असा भास होतो. इतकी ही दरी खोल आहे.डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड पाणीपुरवठ्याबाबत कांहीं सोई करतें. ठिकठिकाणीं मंडप घालतात. तेथें पाण्याचीं मोठमोठीं भांडीं भरून ठेवितात. रहदारीच्या मानानें या सर्व सोयी अपुऱ्या ठरतात. प्रत्येकाला एक लोखंडाच्या पळीभर पाणी देण्यांत येतें. भीमखोल ते पचरबू हा रस्ता फार तर चार पांच तासांचा असल्यानें कोणत्याहि साधनांची अपेक्षा न धरता मनुष्य पचरबूस येऊं शकतो. पचरबूला सोयी नाहींत. पाणी मात्र विपुल आहे परंतु स्वच्छ नसतें. पाटाचें पाणी आणून संचय


केला असल्यानें गढूळ आणि तांबडें असतें. आत्मकुरुपासून श्रीशैला-पर्यंत सर्व रस्ता अरण्यमय आहे. या भागांत मनुष्यवस्तीचा गांव नाहीं. त्यामुळें प्रवास करणें दुर्घट होतें. श्री शैलास जाण्याचा समय फक्त महाशिव--रात्रीस असल्यानें एक दिवसाच्या प्रवासाकरितां वाटेंत सोयी करणें अवश्यक वाटत नाहीं असें दिसतें. अरण्यांतहि चांगल्या इमारती लाकडांची निपज होत नसल्यानें जंगलखात्याची बेताचीच प्रगति दिसते. या प्रांतांत भिल्ल लोकांची वस्ती आहे.तथापि त्यांच्या झोपड्याहि वाटेंत दिसत नाहींत. रामायणांतील वाल्या कोळ्याचा हा प्रांत आहे. वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषि याच ठिकाणीं झाला. परंतु वाल्या कोळी हा एकटाच प्रवृत्तीवरून निवृत्तिमार्गास गेला. वाल्याच्या उद्धाराप्रमाणें भिल्लांचा उद्धार झाला नाहीं आणि भिल्लांची राक्षसी वृत्ति आहे तशीच कायम आहे. काळा उग्र चेहरा, लांब केंस, वस्त्र नाहींच. हातांत धनुष्य व कमरेला दोन बाणांची सुटी पातें असा भिल्ल पाहिला कीं भीति उत्पन्न होते. मग एकटा प्रवास करणें अशक्यच. पच्चर-बूला एक जंगलखात्याची चौकी आहे. तेथें कांहीं भिल्ल लंगोटी नेसलेले आणि अंगांत कुडते घातलेले दिसले. ब्रिटिश सरकारनें यांना सुधार-ण्याचा प्रयत्न चालविला आहे. तरी हा प्रांत वाटेल त्या वेळीं प्रवास कर-ण्यास सुरक्षित नाहीं. कोणीहि तसा प्रवास करीत नाहींत. महाशिवरात्रीच्या आधीं आठ दिवस व पुढें आठ दिवस सर्व रस्त्यावर पोलीसबंदोबस्त ठेव-ण्यांत येतो. या दिवसांत भिल्लांकडून यात्रेकरूंस कोणताहि उपद्रव होऊं नये म्हणून सरकारचा आणि भिल्लांचा तह झाला आहे. त्याकरितां सरकार भिल्लांना खंडणी देतें. ही खंडणी प्रत्येक यात्रेकऱ्याकडून कर वसूल करून दिली जाते. या रस्त्यांत एकूण चार नाकीं आहेत. प्रत्येक नाक्यावर माणशीं एक आणा कर द्यावा लागतो.

भीमखोलपर्यंत रस्ता चढ-उताराचा आहे. यापुढील चढाव फार मोठा आहे. अगोदर चालण्याचे श्रम झालेले असतात आणि त्यानंतर

चढाव चढणें कष्टाचें होतें. पच्चरबूला बहुतेक यात्रा सायंकाळपर्यंत येते व पहाटेस श्रीशैलास जाण्यास निघते. या चढावाच्या ठिकाणीं येण्यास अकरा वाजण्याचा सुमार असतो. उन्हाचा समय असल्यानें मनुष्य थकतो. वाटेंत सावली नाहीं. थकलेल्या व चढण्यास असमर्थ अशा यात्रेकरूंच्या सोयीसाठीं डोल्या मिळतात. त्याचा फायदा अशा यात्रिकरूंस होतो. हाच प्रवास श्रीशैलास जाण्यास त्रासाचा आहे.

हा प्रांत अरण्यमय असल्यानें वाटेंत कोणत्याहि प्रकारची सोय नाहीं. थंडीचे दिवस असल्यांनें वृक्ष पर्णरहित झालेले असतात. त्यामुळें छाया मिळत नाहीं. परंतु हा प्रवास अल्प काळचा असल्यानें यात्रेकरू सर्व अडचणी सहन करितात आणि मल्लिकार्जुनाचें दर्शन घेतात. ही यात्रा फक्त महाशिवरात्रीस असते. प्रवास बिकट असल्यानें जाण्यापूर्वी योग्य माहिती करून घेऊन जावें. कारण यात्रिकरू पहिला रेल्वेचा अगर अन्य प्रवास करून या स्थानापर्यंत आलेला असतो आणि पुढें एक दोन दिवसांचा बिकट प्रवास अगदीं असह्य होतो. श्रीशैलास भूकैलास म्हणतात. येथून जवळच शिखरेश्वर नांवाचें क्षेत्र आहे त्याचेंहि दर्शन घ्यावें. चढ फार असल्यानें आम्ही तिकडे गेलों नाहीं. नारदानें वाल्यास रामनामाचा मंत्रोपदेश देऊन आपण मल्लिकार्जुनाच्या दर्शनास गेल्याची पुराणककथा आहे. परत येतांना वाल्याच्या अंगावर वारुळें बसून त्याचा फक्त आवाज ऐकूं येत होता असें नारदाला आढळून आलें. अशीं वारुळें तेथें आजहि दिसतात. वारूळ म्हणजे एक तंबूच वाटतो. मल्लिकार्जुन हें वीरशैवांचें आदि दैवत असल्यानें यात्रेंत लिंगायत पंथीयांचा मेळा फार मोठा असतो. महाशिवरात्रीचा उपोषणाचा दिवस मात्र पाळण्यांत येत नाहीं.

अरण्यमय प्रांत सोडला म्हणजे बाकी भागांत कालवे असून दोन पिकें काढण्याची सोय कर्नुल प्रांतांत आहे. जवळच महानंदा नांवाचें अतुल रमणीय शंकराचें स्थान आहे. शंकराच्या देवळालगतच एक गायमुख



महांकालेश्वर उज्जयिनी.

आहे त्यांतून एक मोठा पाण्याचा प्रवाह सारखा वाहत असतो. गोमुखांतील पाणी साठ फुटांच्या आकाराच्या कुंडांत पडतें. कुंडांत गळ्यापर्यंत पाणी असून स्नान करण्यास मोकळीक आहे. येथून पाट काढून बागायतीला पाणी पुरविलें जातें. येथें नारळी केळीच्या बागा असून फळफळावळ आणि भाजीपाला विपुल होतो. येथेंहि दर्शनास फी आकारली जाते.

" उज्जयिन्यां महाकालम् " हें ज्योतिर्लिंगांतील तिसरें स्थान आहे. उज्जयनी क्षेत्र प्राचीन कालापासून राजधानीचें शहर म्हणून प्रसिद्ध आहे. त्यापूर्वी हें महाकालवन या नांवानें प्रसिद्ध होतें. शंकराचें निवासस्थान वनांत अगर स्मशानांत असल्याचें मानिलें आहे. अशा ठिकाणीं वास करणें शंकराला प्रिय आहे. म्हणून या महाकाल वनांत शंकराचें वास्तव्य आहे. उज्जैन क्षेत्राचीं पुष्कळ नांवें आहेत. या क्षेत्राची व्याप्ति तेरा मैल लांब आणि नऊ मैल रुंद असल्यामुळें नवतेरी नगरी असेंहि नांव पडलें आहे. प्राचीन काळीं अवंतिका नांवानें विशेष प्रसिद्ध होतें. उज्जयनी हें नांव इसवी सनानंतर पडलें असें बाहेरच्या प्रवाशांच्या वर्णनावरून दिसतें. प्राचीन वर्णन " अवंतिकायां विहितावतारम् " असें केलेलें सांपडतें. द्वादश ज्योतिर्लिंगांत ह्या लिंगाचा आकार फार मोठा आहे. हें लिंग शालिग्राम शिळेचें असून सतेज आहे. गुरु शंकराचार्यांच्या काळीं या लिंगाची स्थापना झाली. त्या पूर्वीं महाकाल शंकराचा उल्लेख प्राचीन ग्रंथांत आढळत नाहीं. इसवी सनापूर्वी पहिल्या शतकांत भर्तृहरी कवि उदयास आला. विक्रमादित्याचें हे बंधु होते. भर्तृहरींचीं काव्यें ' शतक ' नांवानें प्रसिद्ध आहेत. या काव्यावरून तो शिवभक्त होता असें आतां सिद्ध झालें आहे. या काव्यांत शिवस्तुतीचीं वर्णनें आहेत. परंतु महाकालाचा अगर तेथील देवालयाचा उल्लेख नाहीं. शिवालय अस्तित्वांत असतां तो शिवभक्त त्याचा उल्लेख करण्यास चुकला नसता.

महेश्वरे वा जगतामधीश्वरे
जनार्दने वा जगदन्तरात्मनि
नवस्तु भेदप्रतिपत्तिरास्ति मे
तथापि भक्तिस्तरुणेंदुशेखरे

वै. श. ८५

यांत महेश्वराचा स्पष्ट उल्लेख भर्तृहरीनें केला आहे.

भवा भोगोद्विग्नाः शिव शिव शिवेत्युच्चवचसः

भर्तृहरि पुढील श्लोकांत शिव शिव असा मोठ्यानें जप करून चैतन्यसुखाचा लाभ घ्यावा असें सांगतात. शिवाच्या अर्चनेंत ही भावना उद्धृत केली आहे. प्रत्यक्ष देवालयांत जाऊन प्रार्थना करण्याचा प्रघात रूढ नव्हता. भर्तृहरीनें काशीचा उल्लेख करून गंगेच्या कांठीं देवांची राहण्याची जागा असून तपश्चर्येचें पवित्र स्थानहि आहे त्या ठिकाणीं मी तपश्चर्या करितों व ईश्वराचें ध्यान करितों असें त्यानें वर्णन केलें आहे. प्रार्थना आणि अर्चन करण्याचे प्रकार कशा प्रकारचे होते याची कल्पना भर्तृहरीच्या वर्णनावरून होते. भर्तृहरि हा वरिसेन गंधर्वाचा पुत्र. या काळीं गंधर्वांचीं राज्यें होतीं. शिवमहिम्नकर्ता पुष्पदंत हाहि गंधर्वांचा राजा आणि कवि होता. शिवाचें प्रतीक यज्ञ आहे असें मागें आलेंच आहे. तीच मतप्रणालि रूढ होती असें महिम्नावरून दिसतें.

॥ क्रतुश्रेषस्त्वतः क्रतुफलविधानव्यसनिनो ॥ म. २१

यांतील व्यसनिनो हें पद महत्त्वाचें आहे. शंकराला यज्ञफल देण्याचें व्यसन आहे. हें विशेषण यज्ञाचा आणि शिवाचा निकट संबंध दाखवितें.

उज्जयनीच्या देवालयाची रचना सोमनाथाप्रमाणेंच आहे. प्रदर्शनी लहानसें शिवलिंग आहे. मुख्य लिंग खालीं भुयारांत आहे. पहिलें देवालय १२३५ सालीं अलतमशानें फोडिलें. नंतर जें लहानसें देवालय बांधिलें

होतें त्याचा जीर्णोद्धार पेशव्यांचा दिवाण रामचंद्र प्रभु यानें सन १७४५ साली केला. पुढें सन १७५० साली दौलतराव शिंदे यांच्याकडे उज्जैन प्रांत आल्यावर देवस्थानचा व्यवहार रामभट्ट नांवाच्या एका तेलगू ब्राह्मणाकडे कायमचा सोंपविला व तशी त्याला सनद देण्यांत आली. द्वादश ज्योतिर्लिंगांत या लिंगाचें वैशिष्टय असें आहे कीं याचें पूजन चिताभस्मानें होतें. शवभस्म लिंगाला चोळून पहिलें पूजन झाल्यावर दुसऱ्या पूजा होतात. बाजूला गोमती तीर्थ आहे, परंतु पाणी वापरण्यासारखें नाहीं. थोड्या अंतरावेर क्षिप्रा नदी आहे. क्षिप्रेचें स्नान करून देवदर्शन करितात. आंत जातांना कोणतीहि वस्तु बरोबर घेऊन जातां येत नाहीं. चामड्याचे पट्टे, तंबाखू यांवर कडक निर्बंध आहे. दर्शनाला मात्र मुक्तद्वार आहे.

उज्जयनीस दोन मार्गांनीं जातां येतें. खांडव्यावरून खांडवा अजमीर रेल्वे अगर भोपाळ उज्जयनी आणि मुंबईकडून नागदा मथुरा लाईनवरील नागदा आणि नागदा ते उज्जयनी असे मार्ग आहेत. रेल्वेचा प्रवासमार्ग आहे त्यामुळें सोयीचा आहे.

" ओंकारममलेश्वरम् " हें ज्योतिर्लिंगांतील चवथें स्थान आहे. अमलेश्वर स्थानाचा आकार म्हणजे अमलेश्वर ज्या पर्वतावर वसलें आहे त्या पर्वताचा आकार ॐ च्या आकाराचा आहे म्हणून ओंकार असें नांव पडलें. हें स्थान नर्मदा आणि कावेरी यांच्या संगमावर एका बेटांत पर्वतावर आहे. या बेटावर पर्वताशिवाय दुसरी सपाट जागा नाहीं. वनश्री फार रमणीय आहे. पर्वतावरील वनश्रीमुळें ॐ चा आकार स्पष्ट दिसतो. ॐ मधील अकाराच्या ठिकाणीं संगम आहे आणि उकाराच्या ठिकाणीं अमलेश्वराचें देवालय आहे. श्री अहिल्याबाई होळकर यांनीं येथें धर्मशाळा बांधिल्या आहेत आणि नदीला घाट बांधिले आहेत. येथें नासिकप्रमाणें उपाध्ये चोपड्या बाळगितात. काळे आणि गोरे या आडनांवाचे उपाध्ये आहेत. नावेंतून नर्मदा उतरून ओंकारला जावें लागतें. नौकेंत बसल्यावर नर्मदास्तुतिपर स्तोत्रें गाण्याची पद्धत आहे. मंदिरास जाण्यास थोडा चढ

चढावा लागतो. चढावाला पायऱ्या आहेत. देवालय उत्तम बांधिलें आहे, परंतु दक्षिणेकडील कलाकौशल्याचीं कामें नाहींत. लिंगस्थापना सोमनाथच्या पद्धतीची आहे. देवालयाच्या मध्यभागीं दर्शनीं लिंग असून उजव्या बाजूस लहान दरवाजानें पुढें गेल्यावर मुख्य लिंग लागतें. तेथें काळोख असल्यानें हस्तस्पर्शानें लिंगाची कल्पना येते. दर्शनास मुक्तद्वार आहे. पर्वतावर दाट झाडी असल्यानें वानरांची मोठी वसाहत झाली आहे. त्यांचा यात्रेकरूंस फार उपसर्ग होतो.

पाहिलें लिंग स्फटिकाचें शुभ्र पांढरें होतें. त्यांत पाहिल्यानें पाहाणाऱ्याचा चेहरा स्पष्ट दिसे. पुढील जन्म कोणत्या योनीमध्यें येणार तेंहि दिसे. औरंगजेबाला ही बातमी कळल्यावर त्यानें तेथें जाण्याचा विचार ठरविला. येथें आल्यावर त्यानें लिंग पाहण्याचा आपला हेतु प्रकट केला. त्याला अडविण्याचें सामर्थ्य तेथील लोकांत नसल्यानें त्यानें देवालयांत प्रवेश करून लिंग पाहिलें. त्याला त्याचा चेहरा दिसला व पुढील जन्म सूकराचा आहे असें त्यानें पाहिलें. त्यानें चिडून देवालय उद्ध्वंस करून टाकिलें. नर्मदा आणि कावेरी यांचा संगम असल्यानें स्नानाकरितां गर्दी असते. मगरींचा उपद्रव असल्यानें स्नान जपून करावें लागतें. पर्वताच्या एका बाजूस नर्मदा आणि दुसऱ्या बाजूस कावेरी वाहतात. पर्वताच्या दुसऱ्या टोंकाजवळ संगम आहे तरी दोन्ही नद्यांतील पाणी संगमानंतरहि स्वतंत्रपणें वाहतें. येथें नारळ वाहण्याची प्रथा आहे. ज्या नदीला नारळ वाहण्याचा संकल्प असेल त्याच नदीच्या पाण्यांतून तो वाहत जातो. कावेरीला दिला असल्यास कावेरीच्या प्रवाहांतून तो नारळ वाहत जातो आणि नर्मदेला दिला असल्यास नर्मदेच्या प्रवाहांत वाहतो.

ओंकारला जाण्याचा मार्ग खांडवा अजमीर लाइनीवरील खांडव्यापासून दुसरेंच स्टेशन मोरटक्का आहे तेथून जातां येतें. येथून ओंकार सहा मैल आहे. मोटार सर्व्हिस आहे.

" परल्यां वैजनाथम् " हें ज्योतिर्लिंगांतील पांचवें स्थान आहे. या

स्थानाबद्दल जो मतभेद आहे त्याचें स्पष्टीकरण प्रारंभीं केलें आहे. परळी वैजनाथ हेंच ज्योतिर्लिंग असल्यानें याच क्षेत्राला लेखकानें महत्त्व दिलें आहे. देवालय लहानशा टेकडीवर असून चढण्यास पर्वतीसारख्या प्रशस्त पायऱ्या बांधिल्या आहेत. जवळच एक तलाव आहे, परंतु पाणी विपुल नाहीं. देवालयांत विहिरीचें पाणी आहे. शिवलिंगाजवळ गाभाऱ्यांत जातां येतें. दर्शनास मुक्तद्वार आहे. उपाध्ये परंपरेनें वहिवाट करीत असतात. पूर्वी हा भाग अरण्यमय असतां देवालयाची स्थापना झाली. हल्लीं हा प्रांत उजाड दिसतो.

या स्थानाचें वैशिष्ट्य असें आहे कीं शिवलिंगाची स्थापना ज्या ठिकाणीं आहे तो गाभारा आणि सभामंडप यांची पातळी एकच आहे. लिंगाची सकाळीं पूजा झाल्यावर त्यावर शंकराचा मुखवटा बसविण्यांत येतो. या स्थानाचा विस्तार प्रचंड आहे. याचे जवळच मार्कंडेय आणि हरिहर अशीं दोन तीर्थें आहेत. देवस्थानाची व्यवस्था सुव्यवस्थित चालून पूजा अर्चा नियमित चालावी म्हणून पेशवे सरकारनें या गांवच्या समस्त ब्राह्मणांस ४४ चाहूर म्हणजे ५२८० बिघे जमीन इनाम दिली आहे. या देवालयांत एक शिलालेख आहे.शके१७०६मध्यें देवी अहिल्याबाई होळकर यांनीं देवालयाचा जीर्णोद्धार केला.

परळी वैजनाथास मनमाडवरून निजाम स्टेट रेल्वेनें जाऊन परभणी स्टेशनला गाडी बदलून परभणी ते परळी वैजनाथ असा रेल्वेचा रस्ता आहे. वैजनाथ हें या रेल्वेचें शेवटचें स्टेशन आहे. स्टेशनपासून गांव एक मैल असून स्टेशनवर यात्रेकरूंना यात्रा पार पाडण्यासाठीं उपाध्ये हजर असतात.

" डाकिन्यां भीमशंकरम् " ज्योतिर्लिंगांतील हें सहावें स्थान आहे. भीमाशंकर सह्याद्रि पर्वतांत भीमा शंकराच्या डोंगरांत भीमा नदीच्या उगमाजवळ आहे. देवालय अरण्यांत असून तेथें गांव नाहीं. मनुष्यवस्ती नसल्यानें कोणत्याहि प्रकारची सोय नाहीं. देवळाशिवाय कोणतेंहि निवाऱ्याचें स्थान नाहीं. देवालय अगदीं लहान आहे. धर्मशाळा नाहीं

कीं एकादी झोपडीहि नाहीं. देवाची पूजा अर्चा येथून अकरा मैलांवर वाडें नांवाचें गांव आहे येथील गलांडे आडनांवाचे उपाध्ये करितात. महाशिवरात्रीस फक्त यात्रा येते. संरक्षणखात्याकडून बंदोबस्त असतो. हल्लीं महाशिवरात्रीस फक्त मोटारींची सोय झाली आहे. कांहीं निवडक मोटारींस परवानगी असते. एका वेळीं एकाच दिशेकडे मोटारी सुटतात. मोटारी पुण्याहून निघतात. सकाळीं निघून सायंकाळीं सर्व यात्रा परत येते. रस्ता अरुंद वळणाचा व पक्का नसल्यानें मोटार वाहतुकीवर निर्बन्ध आहेत, या भागांत मनुष्यवस्ती नाहीं तरी पायीं जाण्याला हा मार्ग भीतीचा नाहीं. श्रीशैलाप्रमाणें भिल्ल अगर लुटारू लोकांचा त्रास नाहीं. श्वापदांचा उपद्रव असल्यानें जमावानें जातां येतें. भीमाशंकरास जावयाचें तें पुण्याहून भीमाशंकर मोटारीनें जावें. मुंबईहून रेल्वेनें तळेगांव आणि पुढें मोटारीनें जुन्नरास जावें लागतें. जुन्नर ते भीमाशंकर मोटार सर्व्हिस आहे. पुण्याहून भीमाशंकर साठ मैल आहे.

सर्व ज्योतिर्लिंगांत भीमाशंकर देवस्थान अगदीं साधें आहे. वैभवाच्या दृष्टीनें अगदीं निष्कांचन आहे, दानशूर लोकांचें लक्ष या स्थानाकडे मुळींच वेधलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. श्री शिवाजी महाराज जुन्नरला जन्मले. त्यांच्या जन्मस्थानाजवळ असलेल्या ज्योतिर्लिंगाची महाराजांच्या वैभवाप्रमाणें स्वराज्यांत वाढ व्हावयास पाहिजे होती. श्रीशैलास शिवाजी महाराजांनीं गोपुर बांधिलें आहे. त्या गोपुराचें वैभव पाहिलें म्हणजे भीमाशंकराचें देवालय कांहींच नाहीं असें वाटतें. नुसत्या गोपुराला जो खर्च आला असेल त्याच्या अल्प अंशांनीं देखील भीमाशंकराच्या देवालयाला खर्च झालेला नाहीं. एक दगडी हेमाडपंथी देवालय आहे. पूर्वदर्शनी बाजू उघडी आहे, तेथें दरवाजा नाहीं. त्या ठिकाणीं एक आडवा खांब बसविला आहे. यांत एक सोय झाली आहे. गाभारा आणि त्याला एक लहानसा दरवाजा असल्यास दर्शनाची भीड अवर्णनीय असते. भीमाशंकराच्या देवालयांत गाभारा निराळा असा नाहीं. शिवलिंग ज्या ठिकाणीं आहे तेवढाच गाभारा आणि

तेवढ्याच आकाराचें देवालय असल्यानें भक्तांना दर्शनाचे वेळीं श्वासोच्छ्वास करण्यास अडचण पडत नाहीं. मुंबई माटुंगा येथील विठोबाचे देवालयास आषाढी एकादशीस मोठी यात्रा येते. गाभारा लहान व एकच दरवाजा असल्यानें हवेच्या अभावीं माणसें बेशुद्ध स्थितींत गाभाऱ्याबाहेर काढिल्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात. भीमाशंकराचे देवालयांत हवेचा अभाव नसल्यानें मोठी यात्रा असली तरी अनुचित प्रसंग घडत नाहींत. पाण्याचीं दोन कुंडें आहेत. एका कुंडावर पंप लावून पाणी बाहेर काढून वापर करण्याची सोय हल्लीं झाली आहे. त्यामुळें पाणी स्वच्छ असतें. जवळच वायव्य दिशेस कमळजा देवीचें स्थान आहे. भारतांतील प्रत्येक प्रसिद्ध क्षेत्रांत श्री अहिल्याबाई होळकर यांचें स्मारक आहे, परंतु भीमाशंकरास त्याहि विसरल्या.

पुराणावरून भीमाशंकर हें स्थान, ऐतिहासिक आहे. त्रिपुराचा संहार केला त्या वेळीं रुद्राच्या हातांत जो देवांनीं बाण तयार करून दिला, तें हें स्थान आहे. पृथ्वीचा रथ केला तोच हा भीमरथ होय. यापासूनच भीमरथी गंगा उगम पावली.


पुरात्रितय दोहात्य श्रमेण परमेण च
निरीयुः स्वेद्धाराश्च भीमरूपशरीरतः ॥

॥ भीमा. म. अ. २

त्रिपुरांचा संहार केल्यावर रुद्राला थकल्यामुळें घाम आला. त्याच्या प्रचंड धारा वाहूं लागल्या. त्या नदीरूपानें अवतीर्ण होऊन भीमरथी वाहूं लागली- भीमाशंकर आणि भीमरथी नदी यांचा पुरातन इतिहास महाराष्ट्राला वंशपरंपरेची देणगी आहे. दुष्टांचा संहार करण्यांत महाराष्ट्राची परंपरा इतिहासांत नमूद आहेच. महाराष्ट्र ही परंपरा पुढील काळांतहि चालवील अशी खात्री वाटते. श्रीशंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें “ बांधवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम् ” स्वदेशावरील महाराष्ट्राचें प्रेम दृढ असून तें तो कायम राखील.

" सेतुबंधे तु रामेशं " ज्योतिर्लिंगांतील हें सातवें स्थान आहे श्रीरामचंद्रानें लंकेवर स्वारी करण्यास सोयीचें व्हावें म्हणून सेतु बांधिला त्या ठिकाणीं हें प्रसिद्ध शिवलिंग आहे. हें शिवलिंग श्रीरामचंद्रानें आपल्या हस्तें स्थापन केलें अशी शिवपुराणांत माहिती आहे. शिवलिंग स्थापण्यासाठीं कोणता तरी पराक्रम करून जय मिळविला पाहिजे. त्या जयाबद्दल स्मारक म्हणून जयस्तंभ उभारिला जातो त्यालाच शिवलिंग मानितात. ही विचारसरणी पुराणकारांनीं श्रीरामचंद्राच्या लंकायुद्धांतील जयास जोडिलेली दिसते. रामायणांत लिंग स्थापन केल्याचा जो उल्लेख आहे तो प्रक्षिप्त आहे असें आतां मानिलें जातें. श्रीरामचंद्राचे वेळीं शिवलिंगपूजा अस्तित्वांत नव्हती. अगस्ति मुनीनें श्रीरामचंद्रास युद्धांत जय मिळण्याकरितां आदित्याचा मंत्र जपण्यास सांगितलें. यावरून शिवलिंगपूजनाचा प्रघात रूढ असेल असें दिसत नाहीं.

रामेश्वर बेटांत रामगढी नांवाचा एक उंचवटयाचा भाग आहे. तेथें बसून श्रीरामचंद्र लढाईचें धोरण आखीत असत असें सांगतात. या ठिकाणाहून सेतु बांधिला.तें स्थान दहा मैल दूर आहे. सेतूचा कोणताहि भाग दिसत नाहीं. रामगढीवर रामचंद्राचें मंदिर आहे. आणि खालीं रामेश्वर शिवालय आहे. हिंदुस्थानांतील सर्व देवालयांपेक्षां रामेश्वर मंदिर फार मोठें आहे. शंकराचें आणि पार्वतीचें अशीं दोन देवालयें मध्यभागीं असून त्याभोंवतीं प्रदक्षिणा पथ आहे. तो सुंदर कमानींनीं बांधून काढिला आहे. कमानीची उंची पस्तीस फूट असून रुंदी वीस फूट आहे. प्रत्येक बाजू ४०० फूट लांबीची आहे. चारी बाजूंच्या कमानींवर रंगी वेलबुट्टी असून नक्षीकाम केलेलें आहे. एकाच वेळीं मोठी यात्रा आली तरी शांततेनें समावेश होण्यासारखा आहे. या देवालयाच्या परिसरांत सर्व तीर्थें वास करितात असा समज आहे. प्रत्येक तीर्थाची पुष्करणी आहे. राम, सीता आणि लक्ष्मण कुंडें देवालयाच्या बाहेर आहेत. याच कुंडांवर स्नान आणि श्राद्धविधि वगैरे धार्मिक कृत्यें करतात.



रामेश्वराचें देऊळ.

रामकुंडावर स्नानविधि झाल्यावर देवालयांतील प्रत्येक कुंडांत स्नान करावें असें जरी आहे तरी बाकी कुंडांत नेत्रस्पर्श स्नान करणें सोयीचें आहे. या देवालयांतील पूजाभोगविधि मथुरेप्रमाणेंच होतात. प्रत्येक भोगाची वेळ ठरलेली आहे. त्यावेळीं दर्शनास बंदी असते. शय्यादि भोग झाल्यावर निद्राभोग होतो. त्यावेळीं शंकराच्या मूर्तीची मिरवणूक काढितात. ही मिरवणूक शंकराच्या देवालयांतून निघून पार्वतीच्या मंदिरांत नेण्यांत येते. यावेळीं भाविक स्त्रिया शिवाला साष्टांग नमस्कार घालतात कारण या दर्शनानें पुत्रकामना सफल होते असा समज आहे. रामेश्वराला कोणालाहि शिवलिंगाची पूजा करितां येत नाहीं. जें कांहीं देवाला वाहणें असेल तें पूजाऱ्याजवळ द्यावयाचें. ब्राह्मणवर्गास फक्त गाभाऱ्याच्या पहिल्या पायरी-पर्यंत जाऊं देतात. मंदिर-प्रवेश करण्यास पास लागतो. ब्राह्मणानें आपलें ब्राह्मण्य सिद्ध केल्यावरच पास दिला जातो. आम्ही पास घेण्यास कोठीमध्यें जाऊन गोत्रप्रवर उच्चारतांच पास मिळाला. इतरांना ठरविलेल्या मर्यादेवरूनच दर्शन घेतां येतें. गाभारा आणि सभामंडप एकाच पातळींत आहेत. शिवलिंग गाभाऱ्यांत उच्चस्थानीं आहे. त्यामुळें दूरवर राहून देखील दर्शन होतें. पहिल्या पायरीजवळ येतांच मनाला एक प्रकारचा आनंद वाटला. ज्या दर्शनाची आतुरता लागली होती तें दर्शन झालें. त्या स्थानाचा महिमा अपार असल्याची भावना मनांत होती. त्या स्थानीं श्रीरामचंद्र बसले असावेत असा विश्वास होता. लंकेवर स्वारी करण्याकरितां राम येथें आले ही गोष्ट जितकी सत्य आहे तितकीच ते येथें बसले ही गोष्ट सत्य आहे. श्रीकृष्ण ज्या वृंदावनांत खेळले, ज्या ठिकाणीं श्रीकृष्णाचे पाय लागले त्या ठिकाणीं भाविक लोक लोळतात. पानिपतास जातांना नानाफडणीस देखील त्या ठिकाणीं जाऊन लोळले महान् विभूतींच्या चरणस्पर्शानें पुनीत झालेल्या भूमीवर लोळणें अगर त्या स्थानीं दर्शनार्थ बसणें या गोष्टी मनाला संतोष देतात.चार धामांतील एक धाम क्षेत्र आणि ज्योतिर्लिंग असें द्विगुणित स्थानमहात्म्य रामेश्वराला

असल्यानें रामेश्वरदर्शनास फार महत्त्व आहे. रामेश्वर मंदिर रामनाथ संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. मंदिराची सर्व व्यवस्था याच संस्थानाकडून होते. पहिली पूजा संस्थांनची असते. येथील उपाध्ये बहुतेक महाराष्ट्र ब्राह्मण आहेत. दक्षिणी ब्राह्मणांनीं उत्तरेप्रमाणें दक्षिण टोकापर्यंत मजल मारून आपलें कायमचें वास्तव्य केलें आहे. हा सर्व वर्ग सधन व सुखी आहे. त्यांच्या रितीरिवाजांत देशमानाप्रमाणें फरक झाला आहे. येथें वे. परांजपे स्वामी यांनीं वैदिक व्रतकार्यालय स्थापन केलें आहे. जनतेचें दुःख निवारण व्हावें एतदर्थ अनुष्ठान चालू असतें. रामेश्वर दर्शन आणि सेतुस्नान हीं प्रधान कृत्यें या क्षेत्रीं आहेत. सेतूला जाण्याचा मार्ग रामेश्वर ते पंबन आणि पंबन ते धनुष्य-कोटी असा आहे. दुसरा रामेश्वराहून पंबन धनुष्यकोटी रेल्वेवरील रामेश्वर-रोड स्टेशनला यावें आणि तेथून धनुष्यकोटी. रामेश्वराहून रामेश्वररोड स्टेशन पांच मैल आहे.

रामेश्वर हें एक बेट आहे. पंबनच्या खाडीनें हें बेट हिंदुस्थानापासून निराळें झालें आहे. हल्लीं या खाडीवर रेल्वेपूल झाल्यानें मुंबई ते धनुष्य-कोटीपर्यंत गाडीनें जातां येतें. रामेश्वर बेट तेवीस मैल लांब आणि आठ मैल रुंद आहे. पंबनपासून रामेश्वरपर्यंत रेल्वेचा एक फाटा आहे. पंबन ते धनुष्यकोटीपर्यंत मुख्य रेल्वेमार्ग असून बोटीच्या धक्क्यापर्यंत गाडी जाते. धनुष्यकोटीहून सिलोन आणि आशिया भागांत जाण्यास बोटी सुटतात. स्नान करण्याचें स्थान आणिं पियर यामध्यें एक मैल अंतर आहे. पंबनहून निघून पियरला उतरल्यावर एक मैल रेतींतून चालावें लागतें. वाळूंतून चालणें त्रासाचें आहे. तशांत उन्हाच्या वेळीं तापलेल्या वाळूंत चालणें अशक्य असतें. म्हणून बहुतेक लोक अगदीं सकाळींच जातात. रामेश्वर बेट वालुकामय आहे. शेती अगर मळे नाहींत. सर्व वस्तु,अन्नधान्य बाहे-रून आणावें लागतें. हल्लीं बेटाची सुधारणा होत आहे. बाहेरून माती, खत वगैरे द्रव्यें आणून नारळींच्या बागा कांहीं ठिकाणीं तयार होऊं

लागल्या आहेत. या बेटांत ख्रिश्चन आणि मुसलमान यांची बरीच मोठी वस्ती आहे. चर्चेस आणि मशीदी ठिकठिकाणी आहेत.

" नागेशं दारुकावने " हें आठवें ज्योतिर्लिंग आहे. या स्थानाचें वर्णन पुराणकारांनीं बरेंच केलें आहे. दारुका वनांतील लिंगांतून बारा ज्योतिर्लिंगांची उत्पत्ति आहे. दारुकावनांत यतिवेषानें शंकर हिंडत असतां त्याला पाहून ऋषिपत्न्या मोहून गेल्या. त्यांनीं आपलीं गृहकृत्यें सोडून यतीला पाहण्यासाठीं वनांत हिंडूं लागल्या. ऋषि घरीं आल्यावर भोजनाची व्यवस्था नाहीं असें पाहून तपास करूं लागले. त्यांना यतीची हकीगत समजली. ऋषींनीं यतीच्या या कृत्याबद्दल त्याला शापिलें. शापामुळें यतीला दग्ध होण्याची पाळी आली. सूक्ष्मलिंग धारण करून तो भूमीवर पडला. पडतांना त्या लिंगदेहांतून अग्निस्फुलिंग बाहेर पडून बारा ठिकाणीं पडलें आणि स्थिर झालें. तींच हीं मुख्य बारा ज्योतिर्लिंगे झालीं. नागेशाबद्दल मागें उल्लेख आला आहे. मुख्य लिंग म्हणून तद्योतक कांहीं दिसत नाहीं. भूप्रदेशहि निसर्गसौंदर्ययुक्त नाहीं. देवालयाचा मुख्य दरवाजा पश्चिम दिशेस आहे, परंतु गाभाऱ्याचें द्वार पूर्वाभिमुख आहे. मुख्य दरवाजांतून आंत गेल्यावर उजव्या बाजूस एक चौरस बाराचें कुंड आहे. तें चार फूट खोल आहे. त्यांत उतरावें लागतें. या कुंडांत उतरणें म्हणजे एक दिव्यच आहे. तशांत येथें अंधार असल्यानें त्यांत भर पडते. आंत उतरल्यावर बसावें लागतें व बसल्या बसल्या एका बाजूनें जावें लागतें. थोडें सरकल्यावर भक्त गाभाऱ्यांत लिंगाजवळ येतो. या ठिकाणीं साफ उभें राहतां येत नाहीं. दर्शन करून याच मार्गें परत यावें लागतें. मुख्य दरवाजा आणि गाभारा विरुद्ध दिशेस असण्याचें कारण असें सांगतात कीं भक्तराज नामदेव या क्षेत्रीं येऊन देवालयांत कीर्तन करीत होते. ब्रह्मवृंदांच्या नैमित्तिक अनुष्ठानांत कीर्तनानें व्यत्यय येऊं लागला म्हणून पुजाऱ्यानें नामदेवास मागील बाजूस कीर्तन करण्याचा आदेश दिला. ही आज्ञा शिरसावंद्य मानून नामदेवानें आपला कीर्तन–प्रपंच देवळाच्या मागील बाजूस नेऊन तेथें कीर्तन सुरू केलें. चमत्कार असा झाला कीं देवळाचें द्वार तिकडे फिरलें. दार फिरलें

आहे हें स्पष्ट दिसतें. पूर्वीचें पूर्वाभिमुख द्वार दगडविटांनीं बंद केलें आहे. यामुळें कुंडांतून उलट जावें लागतें. मूळचें नामदेवाच्या वेळचें देवालय औरंगजेबानें फोडिलें. त्याचा पडका भाग तसाच खालीं राहिला आहे. दोनशें वर्षांपूर्वी एका सधन हिंदूनें त्याचा जीर्णोद्धार केला.

नागेशाला ओंढया किंवा औंढया प्रांतांतील नागनाथ असें म्हणतात. हें क्षेत्र निजाम संस्थानांत आहे. मनमाडवरून निजामरेल्वेनें पूर्णा स्टेशनला आल्यावर गाडी बदलावी. पूर्णा ते चोंडिया असा दुसरा रेल्वेफाटा आहे. चोंडियापासून नागनाथ अकरा मैल आहे. सडक रस्ता असून मोटार सर्व्हिस आहे. येथूनच पुढें हिंगोलीस जातां येतें. हिंगोलीजवळ देवीच्या अडीच पीठांपैकीं माहूर पीठ असल्यानें या लाईनवर यात्रा नेहमीं असते. नागनाथाला येणारे यात्रेकरू पुढें माहूरला जातात. नागनाथाच्या देवालयाजवळच एक तीर्थकुंड आहे. हा तलावच आहे. पाणी खराब होऊं नये म्हणून पाणी बाहेर काढून स्नान करावें लागतें. देवालयांतील पूजारी जंगम आहे. तीर्थविधि व इतर धार्मिक विधि करण्यास उपाध्ये आहेत.

"वाराणस्यां तु विश्वेशं" हें ज्योतिर्लिंगातील नववें क्षेत्र आहे. वाराणसीचें सध्यांचें नांव काशी आहे. नऊ खंड पृथ्वी आणि दहावें खंड काशी अशी म्हण आहे. काशीला खंडाची उपमा दिली आहे यावरून या क्षेत्राची महती दिसून येते. काशी क्षेत्राच्या या महत्त्वामुळें काशी खंड नामक प्राकृत ग्रंथ तयार होऊन त्यांत या क्षेत्राचें सविस्तर वर्णन आहे. पूर्वी हें क्षेत्र स्मशानभूमि होतें. स्मशानभूमींत वास्तव्य असतां वैराग्य वृत्ति स्फुरण पावते म्हणून शंकरानें या भूमींत कायमचें वास्तव्य केलें. स्मशानवैराग्य फार थोडया कालांत प्राप्त करून घेतां येतें. प्रेतयात्रेला गेलेल्या लोकांत ही वृत्ति पाहावयास मिळते. स्मशानभूमींत असेपर्यंत त्यागाची भावना मनावर कायम असते. जग मिथ्या आहे, संसार क्षणिक सुखाचा आहे, त्याकरितां धडपड करणें

व्यर्थ वगैरे विचार मनांत येतात. "नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी। तरिच सार्थक मानवकुडी" हा उपदेश मनावर ठसतो आणि पटतो. परंतु स्मशानभूमींतून परत फिरण्यास सुरवात होतांच विरक्त वृत्तीचे विचार हळूहळू मावळूं लागतात. पूर्ववत् व्यवहार चालू होतात आणि मी व मी कर्ता ही अहंभावना दिसावयास लागते. वैराग्यवृत्ति कायम राहण्यासाठीं शंकरानें स्मशानभूमींत नेहमींचें वास्तव्य करण्याचें ठरविलें आणि महास्मशानीं म्हणजे काशीस राहिले. शंकराचें वास्तव्य या ठिकाणीं झालें, त्यावेळीं गंगा नदीचा अवतार झालेला नव्हता. एकदां जटिल नामक योगी फिरत फिरत महास्मशानीं आला. काशीला महास्मशान ही संज्ञा होती. तेथें पाणी नव्हतें. जटिलाला याबद्दल फार वाईट वाटलें. त्यानें आपला त्रिशूळ भूमीवर मारुन कूप निर्माण केला. तो ज्ञानवापी नांवानें प्रसिद्ध झाला. श्रीविष्णूनें येथें घोर तपश्चर्या केली. या वास्तव्यांत विष्णूनें आपल्या चक्र आयुधानें भूमींतून जल निर्माण केलें. तें चक्र पुष्करणी या नांवानें प्रसिद्ध आहे. चक्रतीर्थाची प्रथमभेट करण्याची काशीक्षेत्रीं यात्राप्रसंगीं प्रथा आहे. श्रीविष्णूच्या तपश्चर्येमुळें श्रीशंकर प्रसन्न होऊन आनंदानें नाचूं लागले. नाचतांना कानांतील मणि खालीं पडला. त्या ठिकाणीं मणिकर्णतीर्थ तयार झालें. गंगा नदीचा अवतार होऊन महा स्मशानीं आल्यावर ती उत्तरवाहिनी झाली नदीचें उत्तर दिशेनें वाहणें पवित्र मानिलें आहे. पुण्यक्षेत्र होण्यास उत्तर वाहिनी नदीचा योग फार महत्त्वाचा आहे. म्हणून ही भूमि तपश्चर्येला योग्य अशी झाली. तपश्चर्येकरितां ऋषि जमूं लागले. ऋषिवृंदांच्या या मेळाव्यामुळें या क्षेत्राचें महत्त्व फार वाढलें. परा आणि अपरा विद्या प्राप्त करून घेण्याचें हें माहेरघर झालें. योगाभ्यास आणि तपश्चर्या करणारीं माणसें या क्षेत्रीं कायमचा वास करूं लागलीं. विद्वान् पंडित जनाचें आगर झालें. थोड्याच कालांत महास्मशान क्षेत्र विश्वविद्यालय बनलें. विश्वविद्यालय आणि तीर्थक्षेत्र असा संगम झाल्यामुळें धर्मपीठाची स्थापना झाली. काशीच्या धर्ममंडळाची आज्ञा सर्वत्र वंद्य झाली. पंडित सभेचीं सम्मपत्रें आदरबुद्धीनें पाळिलीं जातात.

महास्मशानाची काशी होऊन त्याची सर्व शास्त्रांत प्रगति झाली. 'काशीस जावें नित्य वदावें ' अशी एक म्हण प्रचारांत आहे. कारण काशीयात्रा करणें हें हिंदु धर्मीयांचें अंतिम ध्येयांपैकीं एक ध्येय आहे. काशीला बनारस म्हणतात. जीवनाला पोषक असे रस येथें स्वाभाविकपणें बनतात. रस बना अगर बनारस हें या क्षेत्राला नांव पडून त्याच्या महत्तींत आणखी भर झाली.

आर्यांचें हिमालयांत स्थान असतां तेथेंच काशीक्षेत्राचा अवतार झाला होता. पुढें महास्मशानीं शंकराचें कायमचें वास्तव्य झालें. म्हणून हिमालयांतील काशी उत्तर काशी आणि महास्मशानीं वाराणशी झाली. काशीक्षेत्रांत असंख्य देवस्थानें आहेत. आणि यात्रेचा प्रकारहि फार विस्तृत आहे. गंगा, विश्वेश्वर, अन्नपूर्णा, कालभैरव आणि पंचक्रोशी या ठिकाणीं धार्मिक विधि ठरविले आहेत.यात्रेकरूंनीं सर्व विधि करावेत असा तेथील उपाध्ये आग्रह करितात. याशिवाय काशीजवळच सहा मैलांवर केदारक्षेत्र आहे. हिमालयांतील केदार आणि येथील केदार क्षेत्र भिन्न आहेत. काशींतील केदार क्षेत्राचें वर्णन केदार क्षेत्र नामक ग्रन्थांत वर्णिलें आहे. हा ग्रन्थ भोसले वाड्यांत पाहावयास मिळाला. काशीयात्रा केदार क्षेत्राचें दर्शन करून पुरी करावी असा आदेश दिला आहे. काशीचें पहिलें देवालय मोंगलांनीं फोडून त्या ठिकाणीं मशीद बनविली आहे. सध्यांचें देवालय याच मशिदीच्या बाजूस बांधण्यांत आलें आहे. विश्वेश्वराच्या देवालयाचें वैशिष्ट्य हें आहे कीं शंकराचें लिंग गाभाऱ्यांत मध्यभागीं कळसाच्या खालीं नसून एका बाजूस आहे. तसें कां स्थापण्यांत आलें याबद्दल विश्वसनीय माहिती मिळाली नाहीं. तेथील वृद्ध माणसाकडून अशी माहिती मिळते कीं, ज्या वेळीं हें नवीन देवालय बांधिलें त्या वेळी वेदमूर्ति नारायण भट्टांच्या अध्यक्षतेखालीं अर्चा आणि प्राणप्रतिष्ठा होऊन लिंगस्थापना करण्यांत आली. विश्वेश्वराचें वास्तव्य या नूतन स्थानीं असणार नाहीं आणि ज्योतिर्लिंगाचें महत्त्व त्यास येणार नाहीं अशी शंका कांहीं समंजस लोकांनीं


घेतली. नारायण भट्टांना मोठाच पेंच पडला. देवालयांत दर्शनास कोणी जाईना. त्यांनीं विश्वेश्वरासन्निध बसून धरणें धरिलें. चमत्कार असा झाला कीं, अर्चेच्या वेळीं मध्यभागीं स्थापन केलेलें लिंग सर्वांसमक्ष एका बाजूस आलें. त्याच स्थानीं तें स्थापित केलें. हा चमत्कार सर्वांनीं पाहिला असल्यानें शंका निरसन झाली. विश्वेश्वराचें वास्तव्य तेथें आहे अशी खात्री पटली. विश्वेश्वराचें दर्शन आणि गंगास्नान यांना धार्मिक दृष्ट्या महत्त्व आहे. गंगेचें स्नान पवित्रतर आहे. परंतु आरोग्यदृष्ट्याहि हितावह आहे. गंगास्नान आणि तुंगापान ही म्हण यथार्थ आहे. अशुद्ध वस्तु शुद्ध करण्यास गंगेच्या जलाचा फार उपयोग होतो. हें पाणी बाहेर देशांतील रुग्णालयांत वापरतात. काशीला जाण्याचे मार्ग अडचणीचे नसल्यानें त्यासंबंधीं सविस्तर माहिती देण्याची आवश्यकता नाहीं. मुंबई ते मोगलसराई असा मार्ग आहे. येथें गाडी बदलून मोगलसराई ते काशी असें जातां येतें. फक्त ही एकच यात्रा करण्यास हा मार्ग सोयीचा आहे.

'त्र्यंबकं गौतमीतटे' ज्योतिर्लिंगांतील हें दहावें स्थान आहे. हें गौतमी म्हणजे गोदावरी तटाकीं अंजनेरी पर्वताजवळील त्रिंबकेश्वर होय. नासिक क्षेत्रीं आल्यावर या ठिकाणीं यात्रेकरू जातात. नासिक ते त्रिंबक मोटार सर्व्हिस आहे. शिवाला त्र्यंबक या नांवानें वैदिक वाङ्मयांत संबोधण्यांत आलें आहे. कल्याणकारक शिवाचा उल्लेख करतांना शिव किंवा त्र्यंबक म्हटलें आहे. ऋग्वेद, अथर्ववेद, तैतेरिय संहिता आणि शतपथ ब्राह्मण यांत शिवाचीं आठ नांवें आलेलीं दिसतात. शिवाला रुद्र, त्र्यंबक, अग्नि, शर्व, पशुपति, उग्र, अशनि आणि भव अशीं आठ नांवें आलेलीं आहेत. यांत शिवाचें अग्निस्वरूप मानिलें आहे. त्रिंबकेश्वरास गौतम ऋषीचा आश्रम होता. त्यानें आपल्या तपश्चर्येनें शंकराला प्रसन्न करून घेतलें आणि तेथें शंकराचें कायमचें वास्तव्य असावें असा वर संपादन केला. यामुळें हें ज्योतिर्लिंग झालें.

त्रिंबकेश्वरांचें पहिलें देवालय फार लहान होतें. बाळाजी बाजीरावानें

प्रस्तुतेंच देवालय बांधिलें. या ठिकाणीं कार्तिक पौर्णिमेस आणि महाशिवरात्रीस मोठे उत्सव होतात. शंकराच्या महापूजा दररोज तीन वेळां होतात. पहिली पूजा सकाळीं चार ते सहापर्यंत तुंगार कोळी करतात. हे वतनी पुजारी आहेत. नंतर सहा ते बारापर्यंत वैदिक अर्चा चालते. रुद्राभिषेक महापूजा विधि असतात. संध्याकाळीं थाटाची महापूजा असते ती रात्रीं बारापर्यंत चालते. दर सोमवारीं अभ्यंगस्नान असतें. दुपारीं चार वाजतां कुशावर्तावर पालखी तयार होते आणि तेथून देवालयांत आणितात. अंजनेरी पर्वतांतलि गौतमीच्या उगमाजवळ गंगेचें देवालय आहे. त्या ठिकाणीं जाण्यास पर्वताच्या पायथ्यापासून करमसी हंसराज लोहाणा नांवाच्या धर्मशील हिंदूनें प्रशस्त पायऱ्या बांधिल्या आहेत. या पायऱ्यांची संख्या सातशें असून चढावयास सोयीच्या अशा आहेत. या ठिकाणीं प्रसिद्ध ज्योतिषि भास्कराचार्य यानें निकंब वंशांतील सोन्ह देवाच्या मदतीनें ज्योतिष महाविद्यालय स्थापन केलें होतें.

" हिमालये तु केदारं " अकरावें ज्योतिर्लिंग आहे. हिमालयांतील मुख्य चार यात्रा आहेत. केदार खण्डांत याचें महायात्रा म्हणून वर्णन केलें आहे. जम्नोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बदरीनाथ अशा या चार महायात्रा अनुक्रमें करावयाच्या असतात. पृथ्वीवर दहा खण्डें आहेत अशी कल्पना स्कन्द पुराणांत आहे. हिमालयाच्या या भागांत केदारखण्ड आहे. त्या खण्डांत या चार महायात्रा सांगितल्या आहेत. केदारनाथ हें ज्योतिर्लिंग आहे. केदारनाथाचें दर्शन करून मग बदरीनारायणाचे दर्शनास जावें असा निर्बन्ध घातला आहे. ब्रह्मदेवाच्या कांहीं अपराधामुळें शंकरानें त्याचें पांचवें शिर तोडिलें. तें शिर शंकराच्या हाताला चिकटलें. ही ब्रह्महत्या घडल्यामुळें तें शिर सुटलें नाहीं. ही ब्रह्महत्या टाळण्यासाठीं शंकरानें अलकनंदाकांठीं तपश्चर्या करून ब्रह्महत्येपासून मुक्तता केली. हीं मुक्ति ज्या ठिकाणीं मिळाली त्या ठिकाणास ब्रह्मकपाल असें नांव आहे. ब्रह्मकपाल म्हणजे एक मोठी शिला आहे. या ठिकाणीं



केदारनाथ मंदिर.

पिंडदान करून मुक्त व्हावें आणि बदरीविशालाचें दर्शन घ्यावें. म्हणून केदारनाथाच्या दर्शनाचे वेळीं बदरीनारायणाचेंहि दर्शन केलें पाहिजे. दर्शनाचा क्रम मात्र वर दर्शविल्याप्रमाणें आहे. डाव्या बाजूनें उजव्या बाजूस जावयाचें असतें. बदरीविशालचें महत्त्व ब्रह्मकपालामुळें विशेष आहे.'जो जाई बदरीं तो कधीं न ये उदरीं'अथवा'जो जाय बदरीं तो न हो दरिद्री' अशा म्हणी प्रचारांत आहेत.हरिद्वारीं आल्यावर विष्णुपदाचें दर्शन करून कांहीं थोडे यात्रेकरू आपापल्या श्रद्धेप्रमाणें हिमालयांतील चार महा-यात्रा क्रमानें करितात.कांहीं जम्नोत्री गंगोत्री न करितां केदार आणि विशाला फक्त करितात. केदारला ज्योतिर्लिंगाचें स्थान आहे. बदरीला पिंडदान आणि चार धामांपैकीं एक असल्यानें महत्त्व आहे. केदारनाथ क्षेत्राची व्याप्ति केदारपासून नेपाळांतील देवपाटण पशुपतेश्वरापर्यंत आहे. बदरी-क्षेत्राची व्याप्ति हरिद्वारापर्यंत आहे. केदारनाथास धड आणि पशुपतेश्वरीं शिर असें शंकराचें व्यापक स्वरूप आहे. म्हणून केदार आणि पशु-पतेश्वर अशा दोन्ही क्षेत्रीं गेल्यानें पूर्ण दर्शन होतें. या तिन्ही क्षेत्रांची माहिती खालीं दिली आहे. पशुपतेश्वर हें शिर असल्यानें प्रथम त्याची माहिती देऊन मग केदार आणि बदरी यांची दिली आहे.

पशुपतिनाथाच्या दर्शनानें ज्योतिर्लिंगाचें पूर्ण दर्शन होतें. केदारनाथास शंकराची पाठ असल्यानें शिर असलेल्या स्थानाचें दर्शन करणें क्रमप्राप्त आहे. परंतु अगोदर शिरदर्शन कीं पाठदर्शन असा प्रश्न उद्भवतो. पुराणांत दोन्ही क्षेत्रांतील दर्शन करावें असें सांगितलें आहे. मार्गांत या प्रश्नावर बराच वाद झाला. एक पक्ष चरणकमलाचें दर्शन प्रथम घेऊन मग शिरकमल पाहावें असें म्हणणारा होता. स्वाभा-विक नियम असा दिसतो कीं, कोणाच्याहि दर्शनास जावयाचें झाल्यास प्रथम आपण त्याच्या मुखाकडे पाहतों नंतर बाकीचे अवयव सवडीप्रमाणें पाहतों. म्हणून आम्ही शिवदर्शनाकरितां मुखकमल जे पशुपतिनाथ त्याच्या दर्शनास प्रथम गेलों.

पशुपतीला जावयाचें म्हणजे नेपाळांत जावें लागतें. नेपाळ हा स्वतंत्र देश असल्यानें तेथें जाण्यास परवानगी लागते.त्याकारितां २।३महिने अगोदर अर्ज करावा लागतो. महाशिवरात्रीच्या दिवसांत पास मिळण्याची सोय रक्सौल येथें असते व यात्रेकरूंना तो ताबडतोब मिळतो. मोतिहारी जिल्ह्यांतील कुमाऊन रेल्वेचें रक्सौल हें शेवटचें स्टेशन आहे. येथून नेपाळ देश लागतो. हिंदुस्थानांतील रक्सौल आणि नेपाळांतील रक्सौल यांत फार अंतर नाहीं. रक्सौलला उतरून नेपाळांतील रक्सौल स्टेशनवर येऊन गाडी धरावी लागते. येथून नेपाळ रेल्वे सुरू होते. ही रेल्वे चोवीस मैल लांबीची असून अलफगंजपर्यंत जाते. अलफगंजला आल्यावर तेथून तीस मैल पक्की सडक भीमफेडीपर्यंत आहे. मोटार सर्व्हिस आहे. भीमफेडीहून ठाणकोट चोवीस मैलांचा प्रवास पायीं करावा लागतो.डोलीशिवाय दुसरें साधन नाहीं.हा प्रवास करण्यास दोन दिवस लागतात. रस्ता पर्वतांतून असल्यानें चढाव फार आहेत. त्यांत तीन पर्वत चढावे लागतात. पहिला शिसागढी चढाव चढल्यावर दुसरा दंतगढीचा लागतो.नंतर चंद्रगढी लागतो.सामान स्वत: घेऊन जाणें अशक्य आहे.नुसतें चढणें अशक्य होतें तर सामान हातांत घेऊन चढणें बोलावयास नको. याकरितां नेपाळसरकारकडून कुलीची सोय आहे. करार लिहून घेऊन डोलीकरितां किंवा सामानाकरितां कुली मिळतात. याबद्दल हमालीचा सर्व पैसा कुली ऑफिसांत भरावा लागतो. ठाणकोटला आल्यावर सामान वगैरे बरोबर मिळालें असा दाखला द्यावा लागतो. कुली तो दाखला दाखवून कचेरींतून आपला पैसा घेतात. ठाणकोटपासून खाटमांडूपर्यंत सडक आहे. हा अकरा मैलांचा प्रवास मोटारीनें होतो.

खाटमांडू हें एक खोरें आहे.पन्नास मैल लांब आणि चाळीस मैल रुंद असें खोऱ्याचें क्षेत्र आहे.हिमालयांत इतक्या उंचीवर एवढें विस्तीर्ण खोरें दुसरें नाहीं.या खोऱ्यांत पाणी विपुल असल्यानें शेती आणि बागाईत फार आहे. उत्पादन चांगलें असल्यानें हा प्रांत साखर आणि रॉकेलशिवाय दुसऱ्या

जीवनोपयोगी वस्तूंकरितां बाहेरच्या प्रांतावर अवलंबून नाहीं. स्वतःच्या गरजा भागवितां येतात. तांदूळ, गहूं, भाजीपाला,तूप वगैरे जिन्नस विपुल आणि स्वस्त आहेत. खाटमांडू राजधानी शहर आधुनिक सुधारणांनीं युक्त आहे. मोठमोठे राजवाडे, भव्य पुतळे, विजेची रोषणाई, सडका आणि नवीन पद्धतीची शहररचना, पाण्याच्या सोयी वगैरे साधनें उपयोगांत आणिलीं आहेत. रक्सौल ते खाटमांडू हा रस्ता अवजड वस्तु नेण्यास सोयीचा नसल्यानें लूपलाईनचा ( विजेचा पाळणा ) उपयोग सुरू आहे. बाहेरून आणावयाचे पदार्थ या लाईननें आणितात. ही लाईन भीमफेडी ते ठाणकोट या बिकट वाटेकरितांच आहे. नेपाळ वर्णनांत याची सविस्तर माहिती दिली आहे.

खाटमांडू आणि देवपाटण पशुपतिनाथ हीं दोन्ही मिळून हल्लीं एकच शहर झालें आहे. या दोन भागांच्या मधून वाघमती नदी वाहते. नदीवर पूल बांधिला आहे. येथून सभोंवतालील हिमाच्छादित पर्वतशिखरें सूर्य-प्रकाशांत मनोहर दिसतात. धवलगिरी, नंदादेवी, गोसाई स्थान, भिर-बंदी, शिवपुरी, महादेवपोखरा, फुलचौका, महाभारत, चंद्रगिरी, इंद्रस्थान आणि कुमारपर्वत शिखरें दिसतात. वाघमती नदी शिवपुरी पर्वतांत वाघ-द्वारीं उगम पावून गोकर्णक्षेत्रीं शिवानदीस घेऊन दक्षिणेस केशचैत्य व पशुपतिनाथ क्षेत्रांतून चंद्रगिरी, चंपावती आणि महाभारत शिखरांतून वाहते. वाघमती आणि विष्णुमती या दोन नद्यांमुळें हा प्रांत सुपीक झाला आहे. महाशिवरात्रीच्या वेळीं यात्रेकरू ठाणकोटास आल्यावर नेपाळ सरकारकडून त्यांचें स्वागत होतें. यात्रेकरूंस शिरापुरी वगैरे पदार्थ देण्यांत येतात.

अर्जुनाला शिवाकडून पाशुपत अस्त्र या ठिकाणीं मिळालें अशी महा-भारतांत कथा आहे.एकदां शंकर लज्जित होऊन त्यानें मान खालीं घातली ती देवपाटणला वर काढिली. त्या वेळीं ते केदारला बसले होते. तेंच रूप हें आहे. म्हणून शिवलिंगास सभोंवतीं चार शिरें आहेत.चारी बाजूंस

चार दरवाजे असून प्रत्येक द्वाराला पुजारी आहे. पुजारी महाराष्ट्रीय आहेत. त्यांची नेमणूक काशीहून होते. महाशिवरात्रीस नेपाळचे राजे दरबारी थाटानें दर्शनास येतात. यांना बादशहा असा किताब आहे. त्यांना राज्यकारभारांत हात घालतां येत नाहीं. तें काम मुख्य प्रधान करतो. या प्रधानाला तीन सरकार म्हणतात. आणि बादशहाला पंच सरकार म्हणतात. ग्वाल्हेरचा संबंध तीन सरकारशीं आहे.

पशुपतिनाथाची स्थापना गुरु शंकराचार्यांनीं केली. देवालय वाघमती नदीकांठीं प्रशस्त स्थानीं बांधिलें आहे. दर्शनाला मुक्तद्वार नाहीं. पुजाऱ्या-कडून सर्व वहावें लागतें. पुजारी दक्षिणी असल्यानें आमची चांगली सोय झाली. महाशिवरात्रीस आमच्या वाडींत कलमी आंबे तयार झाले होते. त्यांतील एक आंबा शंकरास वाहण्याकरितां नेला होता. या दिवशीं पिकलेला आंबा नैवेद्यास मिळाला, याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. हा आंबा स्वतः लाविलेल्या कलमाचा असल्यानें त्याचें महत्त्व होतें. यात्रेमुळें वाघमती नदीचें पाणी स्वच्छ नव्हतें म्हणून धारेचें पाणी पिण्याकरितां आणीत होतों. सामवेदी ब्राह्मणांचा भरणा मोठा आहे. महाशिवरात्रीस त्यांची संभावना होते. सर्व साधूंना अन्नदान असतें. थंडी लागूं नये म्हणून जळणाकरितां लाकूड मोफत पुरविण्यांत येतें. श्रीमंत संपतराव गायकवाड यांचें नेपाळ—वर्णन आणि श्री. फडके यांचा माझा प्रवास यांत नेपाळ-संबंधी विस्तृत वर्णन पाहावयास मिळतें. नेपाळी लोक हिंदू असून शिवभक्त आहेत.

ज्योतिर्लिंगांत केदारनाथाचा प्रामुख्यानें समावेश असून पशुपति-नाथाचा त्यांत अन्तर्भाव आहे. केदारनाथ मल्लकली पाट परगणा नागपूर-मध्यें आहे. हा संयुक्त प्रांताचा भाग आहे. हिमालय पर्वताच्या पायथ्याशीं महापंथ शिखराजवळ केदारनाथ आहे. तीन बाजूंस हिमाच्छादित पर्व-ताच्या लहानशा पठारावर केदारनाथचें देवालय आहे. येथेंच मंदाकिनी नदीचा उगम आहे. ही वाहते त्या बाजूनें या पठारावर येण्याचा मार्ग

आहे. सभोंवतालील पर्वत बर्फमय असल्यानें उन्हाळ्यांत सारखें पाणी वाहत असतें. बर्फाचें पाणी व्हावयास लागलें म्हणजे थोडथोडें गवत उगवतें. एरव्हीं हा भाग नेहमीं बर्फमय असतो. लहान झुडपें देखील होत नाहींत. महापंथ शिखराच्या पायथ्याला लागूनच देवालय आहे. हें ठिकाण समुद्रसपाटीपासून ११७५५ फूट उंचीवर आहे, त्यामुळें जुलै महिन्यांतहि थंडी असह्य वाटते. मंदाकिनीचें पाणी म्हणजे वितळलेल्या बर्फाचें पाणी. आम्ही तीन वाजण्याचे सुमारास येथें आलों. त्यावेळीं स्नान करून देवदर्शन घ्यावें असा मानस होता. नदीकांठीं आल्यावर तो बेत रहित करावा लागला, कारण पाण्यांत हात बुडविण्याची सोय नव्हती. तशांत तेथील गार वाऱ्यामुळें मनुष्य थंडीनें धनुष्याकार होतो. बोटें ताठ होतात. मुक्कामाची व्यवस्था एका धर्मशाळेंत झाली होती. आमचा पंड्या देवप्रयागपासून आमचे बरोबर होता. धर्मशाळेंतील खोलींत गाद्या घालून रजया पांघरण्यासाठीं पुरविल्या होत्या, त्यामुळें थंडीचा उपद्रव झाला नाहीं. पाऊस पडत होता त्यामुळें बाहेर पडण्याची सोय नव्हती.

केदारनाथ शिवालय दगडी असून स्तूप पद्धतीचें आहे. पशुपतिनाथ आणि केदारनाथ यांची बांधणी एकच आहे. कळसाचे ठिकाणीं एक मोठा पाट बसविला आहे. केदारनाथास कायमची वस्ती करून कोणी राहत नाहीं. देवालय आणि त्यापुढें रस्त्याच्या दोन्ही बाजूंस चार–पांच धर्मशाळा फक्त आहेत. देवालय एका उंच चौथऱ्यावर आहे. देवालयांत लिंगाच्या ठिकाणीं एक मोठी शिला वर थोडी टोकदार झालेली आहे. हा शिवाचा पार्श्वभाग आहे. केदारनाथास कांहीं सोय नसल्यानें यात्रेकरू दर्शन करून त्याच दिवशीं खालीं येतात. जें कांहीं मिळतें त्यावर निर्वाह करून घेतल्यास राहण्यास हरकत नाहीं. पंडे सर्व व्यवस्था करितात. एक लहान दुकान होतें. जीं कांहीं पांच दहा माणसें राहतात त्यांच्या सोयीकरितां एक म्हैस होती. बर्फमय प्रांत असल्यानें जनावरांना गवत मिळत नाहीं.

तें लांबून आणावें लागतें. दूध काढितांना जवळ शेगडी असते. हात वारंवार गरम करावे लागतात. आम्ही तीन दिवस येथें राहिलों. शंकराच्या पुढील मिळणारी देणगी देवस्थान-मंडळाकडे जाते. त्याचा अधिकारी रावळ आहे. पंड्यांचा हक्क शंकराच्या पाठीमागील भागावर असल्यानें यात्रेकरूकडून पूजा अर्चा मागील भागीं करतात. पूजेला पाणी वापरीत नाहींत. शिळेला तूप चोळण्याची प्रथा आहे. यात्रेकरू आपल्या हातानें तूप चोळतो. पुजेंतील हाच मुख्य भाग आहे. येथें ब्रह्मकमलाचा भोग देण्याची प्रथा आहे. महापंथ शिखरावर ब्रह्मकुंड आहे त्यांत भाद्रपद मासीं हीं कमलें फुलतात.तीं पंडे आणितात आणि यात्रिकरूंकरितां शंकराला वाहतात. ह्याकरितां फार किंमत द्यावी लागते. महापंथ शिखरास जातांना मार्गांत भैरवझांप म्हणून कडेलोट करण्यासारखा कडा आहे. प्रयागच्या अक्षय्य वटाप्रमाणें या कड्यावरून उडी टाकिल्यास मोक्ष मिळतो अशी भावना आहे. ही प्रथा हल्लीं कायद्यानें बंद केली आहे.

देवस्थानची व्यवस्था रावळ पाहतो.तो उखीमठास राहतो.टेहरी,अलमोरा, नैनी वगैरे प्रांतातील शें—दीडशें गांवें देवस्थानास इनाम आहेत. रावळ साधु किंवा यति असावा लागतो. आपल्या शिष्यांतील एक शिष्य निवडून गादी चालू ठेवण्यांत येते. प्रस्तुतचे रावळ गृहस्थाश्रमी झाल्यानें हें प्रकरण हायकोर्टांत गेलें आहे. केदारनाथ क्षेत्राची व्याप्ति फार मोठी आहे. त्यांत एकंदर पांच केदार आहेत.केदार,तुंगनाथ, रुद्रनाथ, मधमहेश्वर आणि कल्पेश्वर असे पांच केदार आहेत. केदारहून परत येतांना तुंगनाथ मार्गावरच आहे. बाकीचीं स्थानें पाहणें झाल्यास स्वतंत्रच प्रवास करावा लागतो. आम्ही केदारहून परत येतांना तुंगनाथास गेलों. तुंगनाथ १२००० फूट उंच असल्यानें त्याच्या माथ्यावर गेल्यावर सृष्टिशोभा पाहण्याची संधि असते. आम्ही गेलों त्यावेळीं ढगांची गर्दी इतकी होती कीं आपण जणूं काय समुद्रांत उभे आहोंत. तुंगनाथ बाहू, रुद्रनाथ मुख, मधमहेश्वर नाभी आणि कल्पेश्वर जटा आहेत. केदारला जातांना गुप्तकाशी, त्रिजुगीनारायण

हीं क्षेत्रें लागतात. गुप्तकाशीला आल्यावर तेथें सर्व तीर्थविधि करण्यास सांगतात. सर्व विधि देवालयांतील कुंडावर करितात व तेथें गुप्तदान म्हणजे नारळाला भोकें पाडून त्यांत दक्षणा ठेवून तो दान द्यावयाचा. पुढें त्रिजुगीनारायणास यात्रेकरू जातो. येथें शंकरपार्वती–विवाह नारायणासमक्ष झाला. लाजाहोम झाला तो अव्याहत प्रज्वलित आहे. होमाला प्रदक्षिणा करून त्यांत इन्धनें वाहण्याची चाल आहे. यानें हा होम सारखा पेटत राहिला आहे असें सांगतात. पुढें गौरीकुंड नामक क्षेत्र लागतें. येथें मंदाकिनी नदीच्या कांठीं ऊन पाण्याचें कुंड आहे.नदीच्या प्रवाहाजवळही गरम पाण्याचे झरे वाहत आहेत. कुंडांतील पाणी बेताचें गरम असतें. गायमुखांतून जें पाणी पडतें तें फार कढत असतें. कुंडांत पडल्यावर स्नान करण्यासारखें होतें. बहुतेक यात्रेकरू केदारनाथाचें दर्शन करून येथें मुक्कामाला येतात.येथून केदार सात मैल आहे.येथें सर्व सोयी आहेत. खाण्याचे पदार्थ भरपूर मिळतात.आयुर्वेद दवाखाना आहे.त्रिजुगीनारायणास पंड्यांची स्वतंत्र संस्था आहे. देवप्रयागास आल्यावर पंड्यांची योजना होतें. यात्रेकरूवर आपला हक्क प्रस्थापित करण्यास फार चिकित्सा चालते. यात्रेकरूस आपला जिल्हा कोणता हा प्रश्न पंड्याकडून वारंवार विचारिला जातो. यात्रेकरूचे वाडवडील आल्याचा उल्लेख क्वचितच आढळतो. त्यामुळें पंड्यांचा हक्क जिल्हावारी ठरतो. पंडा ह्या संस्थेंत कांहीं दोष असले तरी तो ठरविणें व आपल्याबरोबर असणें फायदेशीर होतें.पंड्यामुळें वाटेंत मदत होते.

केदारहून बदरीनारायणास जावयाचें असतें. म्हणून परत येतांना गुप्तकाशीला रस्ता बदलावा लागतो. गुप्तकाशीहून उखीमठ येथें यावें लागतें. केदारनाथाचें देवस्थान थंडीच्या दिवसांत कार्तिक ते चैत्रापर्यंत उखीमठास असतें. बाणासुराची कन्या उषा हिचा अनिरुद्धाशीं विवाह उखीमठास झाला.उषामठ किंवा उखीमठ असा शब्दप्रयोग प्रचारांत आला आहे. रावळचा एक मोठा वाडा आहे. येथें वेदपाठशाळा आहे. त्याचें रूपांतर विद्यालयांत करण्याचें ठरलें असून तशी तजवीज करण्याचें सुरू झालें आहे.

विद्यालय व त्याला जोडून एक वसतिगृह व्हावयाचें आहे. विद्यालया-मध्यें साहित्य, व्याकरण आणि ज्योतिष हे विषय शिकविण्याची योजना आहे. उखीमठाहून यात्रेकरू जोशीमठास येतात. केदारनाथचे थंडीच्या दिवसांतील जसें उखीमठ त्याप्रमाणें बदरीनारायणाचें जोशीमठ आहे. सहा महिने बदरीनाथ जोशीमठास असतात. जोशीमठ हें विष्णुगंगा आणि धौली यांच्या संगमावर आहे. याला विष्णुप्रयाग असें म्हणतात. हिमालयांत पंचप्रयाग आहेत त्यांतील हा एक आहे. भागीरथी आणि अलकनंदा यांच्या संगमास देवप्रयाग म्हणतात. अलकनंदा आणि मंदा-किनी यांच्या संगमास रुद्रप्रयाग म्हणतात. अलकनंदा आणि नंदाकिनी यांच्या संगमास नंदप्रयाग आणि अलकनंदा आणि पिंडर यांच्या संगमास कर्णप्रयाग म्हणतात.जोशीमठास शंकराचार्यांचा मठ आहे.सनत्कुमार संहिते-प्रमाणें जोशीमठ हेंच बदरीनारायण होणार असें सांगितलें आहे.

यावत् विष्णुः कलौ तिष्ठे ज्योतिसंगम्मे निजालये
तथापरं तथापूर्वमागम्य बदरीभवेत्

जोशीमठास पूर्वी एक राजा राज्य करीत होता. तो शिकारीस गेला असतां नृसिंहरूपानें विष्णु त्याच्या राणीच्या महालांत गेला व खावयास मागूं लागला. राणी,तें विलक्षण रूप पाहून भयभीत झाली व तिनें त्याची मागणी मान्य केली. त्याला यथेच्छ भोजन घातलें.भोजन झाल्यावर नृसिंह जवळच असलेल्या पलंगावर झोपी गेला. इतक्यांत राजाची स्वारी तेथें परत आली. राणीच्या महालांत परपुरुष निजलेला पाहतांच त्याला अना-वर क्रोध आला. त्यानें आपल्या तलवारीनें नृसिंहाच्या बाहूवर वार केला. बाहूवर जी जखम झाली त्यांतून रक्ताऐवजीं दूध वाहूं लागलें. हा प्रकार पाहून राजा व राणी घाबरली. हा देवपुरुष असावा अशी त्यांची भावना झाली. त्यांनीं त्याची क्षमा मागून आराधना केली. आपण येथेंच वास्तव्य करावें अशी प्रार्थना केली. हातावरील जखमेनें नारायणाचा हात थोडा थोडा गळूं लागला आहे. तो ज्या वेळीं गळेल तेव्हां बदरीक्षेत्र बंद

होऊन नृसिंहक्षेत्रीं म्हणजे जोशीमठास नारायणाचें कायमचें वास्तव्य होईल असा वरील संहितेचा इत्यर्थ आहे.

बदरीनाथास जोशीमठाहून यावें लागतें. बदरीनारायणाच्या देवस्थानची व्यवस्था बदरीनारायण टेम्पल ॲक्टप्रमाणें पंचकमिटी पाहते. या कमिटीची निवडणूक होऊन अधिकारी नेमले आहेत. चिटणीसाच्या जागीं जे गृहस्थ नेमिले आहेत ते पंड्या मंडळींतील नसल्यानें असंतुष्टता उत्पन्न झाली आहे. तशांत टेम्पल ॲक्टनें पंड्यांची सोय नसल्यानें वादविवाद विकोपास गेले आहेत. देवस्थानावर पंड्यांनीं बहिष्कार घातला असून देवदर्शनासही देवालयांत जात नाहींत. पंडेमंडळांत दोन पंथ आहेत. डिमरी ब्रह्मवृंदमंडळ आणि देवप्रयागमंडळ असे भेद आहेत. गुरु शंकराचार्यांनीं देवस्थानची स्थापना करून डिमरी ब्रह्मवृंदास देवालय व त्याची व्यवस्था सोपविली आणि देवालयाबाहेरील धार्मिक विधि करण्यास देवप्रयागमंडळास अधिकार देऊन ठेविला. देवापुढें मिळणाऱ्या देणग्यांतून देवस्थानची व्यवस्था नीट होत नसल्यामुळें पंचकमिटी कायद्यानें स्थापन करण्यांत आली. या कमिटीनें थोडक्याच अवधींत तीन चार लाख रुपयांचा निधि तयार केला आहे. व्यवस्थितपणें हिशेब ठेवण्यांत येऊन वार्षिक अहवाल प्रसिद्ध होऊं लागला आहे. क्षेत्राची सुधारणा करण्याची तजवीज चालू झाली आहे. सार्वजनिक शौचकूप तयार होत आहेत. वीस शौचकूप पुरुषांकरितां आणि पंधरा स्त्रियांकरितां बांधण्याचें काम सुरू झालें आहे. रुग्णालय आणि धर्मार्थ दवाखाना तयार झाले असून लवकरच सुरू होणार आहेत. कमिटी विजेची योजना करण्याच्या विचारांत आहे. या सर्व सोयी झाल्यावर क्षेत्राची प्रसन्नता वाढेल. त्याच्या सौंदर्यांत भरच पडेल. जगन्नाथपुरीप्रमाणें अटका पद्धति सुरू व्हावयाची आहे.

नारायणाच्या देवळाजवळच तप्तकुंड आहे. कुंडाच्या खालीं अलकनंदा आहे. गौरीकुंडाप्रमाणेंच पाणी फार गरम आहे. गायमुखांतून पडणाऱ्या पाण्याला हात लावितां येत नाहीं. कुंडांत पडल्यावर थोडें थंड होऊन

घेण्यासारखें होतें. या थंड प्रदेशांत यात्रेकरू दमून थकून येथें आल्यावर तप्तकुंडांतील स्नानानें त्यांच्या आनंदास पारावार नसतो. त्याला आलेला शीण नाहींसा होतो. कुंडाच्या कांठावर बसून पाण्यांत हात घातला तर असें वाटतें कीं इतकें गरम पाणी सहन होणार नाहीं; परंतु पाण्यांत उतरताच बेताचें वाटतें.तथापि फार वेळ आंत राहतां येत नाहीं.या पाण्याचा उगम नारायणाच्या चरणापासून आहे. नारायणाचें दर्शन त्रिकाल करितात. सकाळीं, माध्यान्हीं आणि सायंकाळीं तीन वेळच्या तीन मुद्रा असतात. सकाळीं योगमुद्रा, माध्यान्हीं राजमुद्रा आणि सायंकाळीं भोगमुद्रा. योगमुद्रेंत साधी स्वच्छ मूर्ति दिसते. राजमुद्रेंत वस्त्रालंकार घालतात. भोगमुद्रेंत वैजयंती मालाचा भोग असतो.

धार्मिक विधींत ब्रह्मकपालीं पिंडदान अलकनंदेंत तर्पणविधि असतात. पिंडदान हा मुख्य विधि ब्रह्मशिलेवर बसून करावयाचा असतो.येथें पिंडदान झाल्यानें पुन्हां पिंडदान करूं नये. बदरीक्षेत्र ही योगभूमि असल्यानें पुष्कळ साधू तपश्चर्या करीत असतात.अलकनंदा आणि ऋषिगंगा यांचा संगम आहे. जवळच नरनारायण पर्वत आहेत. देवालय नरपर्वतास लागून आहे. पुढें नदी आणि पलीकडे नारायण पर्वत आहे. येथील पठार मैलभर असून रुंदी फार कमी आहे. नारायणापासून पुढें आठ मैलांवर वसुधारा क्षेत्र आहे. वसुधारा हा सरस्वती नदीचा एक प्रवाह आहे. सरस्वती नदी एका पर्वताच्या माथ्यावरून वाहत आहे. या पर्वताच्या बाजूनें रस्ता आहे. वर नदी वाहते. हें फक्त प्रवाहाच्या आवाजावरून समजतें. वसुधारा ठिकाणीं या प्रवाहांतील एक धारा पर्वताच्या रस्त्याच्या बाजूला पडते. ती साधारणपणें दोनशें फुटांवरून पडते. या प्रवाहांतून बर्फाचे तुकडे पडतात. पाणी फार थंड असून जेथें पडतें तेथेंहि बर्फच आहे. सरस्वती नदी पर्वताच्या खालीं उतरते ती देखील मोठमोठ्या दगडांच्या खालून वाहते. असा एक दगड रस्त्यांत असून त्याचा पुलासारखा उपयोग झाला आहे. याच पुलावरून वसुधारेला रस्ता आहे. वसुधारा बर्फमय भागांत असल्यानें व समुद्रसपाटी-

पासून बऱ्याच उंचीवर असल्यानें प्राणवायूचा अभाव आहे. चालणें अशक्य होतें. याबद्दल आम्हाला सूचना होत्या. यामुळें आम्हीं आंबट पदार्थ चालतांना तोंडांत धरण्यास बरोबर घेतले होते. रक्ताभिसरण होण्यास अडथळा होतो. घशाला कोरड पडते. चालण्यास ताकत रहात नाहीं. आम्हीं बसत बसत एकदांचे वसुधारेजवळ पोहोंचलों. धर्मशिलेचें दर्शन घेतलें. धर्मशीला बर्फमय असल्यानें हात लावितां आला नाहीं. धर्मराज येथूनच स्वर्गलोकांत गेले असें सांगतात. सरस्वती अलकनंदेस मिळते. त्या संगमास केशवप्रयाग म्हणतात. याच ठिकाणीं महाभारतकालीन माणसोद्भव क्षेत्र आहे. त्याला हल्लीं माणस म्हणतात. सनत्कुमारसंहितेंत या क्षेत्राची माहिती अशी आहे कीं,

केशवप्रयागश्रुतम्
क्षेत्राणां परमं मतम्
महाविष्णुश्च तत्रैव
मणिभद्राश्रमस्तथा

या माणिभद्रास व्यासगुंफा आहे. श्रीव्यासानें महाभारत ग्रंथ याच क्षेत्रीं लिहिला. व्यासगुंफा प्रशस्त आहे. एका माणसाचा त्यांत उत्तम प्रकारें समावेश होतो. हें स्थान योगसाधन करण्यास योग्य आहे. महाभारत ग्रंथाचा पार्थिव नमुना या गुंफेच्या जवळच दाखवितात. प्रत्येक अध्याय एकावर एक ठेवून जसा पोथीचा आकार असतो अशा आकाराचा दगड ग्रंथरूपानें ठेविला आहे असा भास होतो. व्यासगुंफा जवळच प्रचंड महाभारत ग्रंथशिला आणि समोरच्या पर्वताच्या मध्यभार्गी पांडवांच्या श्यामकर्ण अश्वाच्या आकाराचा दगड दिसत असलेला पाहून, ते भारतकालाची आठवण करून देत आहेत असें वाटतें. श्रीव्यासांना अशा निर्जन प्रदेशांत महाभारत रचण्यास किती कष्ट पडले असतील याची कल्पना होते. श्रीगुरु शंकराचार्योंनींही श्रीव्यासांच्या या अद्‌भुत साहित्यशक्तीबद्दल आश्चर्य प्रकट केलें आहे. हल्लीं या व्यास-

गुंफेंत गेल्या चाळीस वर्षें एक साधु राहत आहे. त्याच्या जवळ ग्रंथ-संग्रह आहे. त्यांत रामायण, महाभारत हे ग्रंथ होते. एका बाजूस धुमी आणि दुसऱ्या बाजूस बसावयाची जागा आहे. अलीकडील साधूप्रमाणेंच हे एक साधु आहेत. पंचकेदाराप्रमाणें पंचबदरी आहेत. बदरीनारायण, योगबदरी पांडुकेश्वर, भविष्यबदरी तपोवन, वृद्धबदरी अनिमठ आणि ध्यानबदरी सिलांग असे पांचबदरी आहेत. विशाला नगरी म्हणजे बदरी-नारायण नरनारायण पर्वतांमध्यें अलकनंदा नदीच्या खोऱ्यांत एका पठारावर १०२८४ फूट उंचीवर वसलें आहे.बदरीनारायण टेम्पल ॲक्ट झाल्यापासून देवस्थानाची व्यवस्था चांगल्या प्रकारें होत असून सुधारणाही होत आहेत. देवस्थानास दोन–अडीचशें गांव इनाम आहेत.

केदारनाथ ज्योतिर्लिंगास जावयाचें म्हणजे हिमालयांतील चार महा-यात्रेचा योग आहे. एप्रिल ते ऑगस्टपर्यंत जाणें चांगलें. थंडीमध्यें पुरुष पुरुष उंचीचें बर्फ असल्यामुळें या महिन्यांत हा प्रवास करीत नाहींत. बदरीनाथ टेम्पल कमिटी स्थापन झाल्यापासून या भागांत रस्ते चांगले झाले आहेत. तीन फूट रुंदीचा, ठिकठिकाणीं नदीनाल्यांना पूल प्रत्येक मुक्कामाच्या जागीं पाण्याचे नळ असल्यानें पुष्कळ लोक यात्रानिमित्तानें सृष्टिसौंदर्य पाहाण्यासाठीं जातात. कमिटीचा सध्यां बदरीनारायणा-पर्यंत मोटाररस्ता करण्याचा संकल्प झालेला आहे असें दिसतें. हरिद्वार ते हृषिकेश, देवप्रयाग, कीर्तिनगर, श्रीनगर, रुद्रप्रयाग, कर्ण-प्रयाग, नंदप्रयाग, चमोली असा मोटारचा रस्ता तयार झाला आहे. एक दोन पूल व्हावयाचे आहेत ते झाल्यावर चमोलीपर्यंत मोटार जाऊं शकेल. पुढें चमोली ते पिप्पलकोटी, गरुडगंगा आणि जोशीमठ असा रस्ता आहे, जोशीमठ ते बदरीनारायण हा मार्ग होण्यास कांहीं वेळ लागेल. बदरीनारायण हें एक शहर झालें आहे. वस्ती मोठी आहे. पोष्ट आणि टेलिग्राफ आहे. हरिद्वाराहून देवप्रयागाला आल्यावर जम्नोत्री गंगोत्री रस्ता लागतो. येथून जम्नोत्रीस जातात. केदारनाथचा रस्ता रुद्रप्रयागहून निघतो. तो अगस्ति-

मुनीवरून गुप्तकाशीस मिळतो. गुप्तकाशीहून त्रिजुगीनारायण, गौरीकुंड, आणि केदारनाथ असा रस्ता आहे. रुद्रप्रयागहून पायींच गेलें पाहिजे अगर डोली करितां आली तर ती एक सोय आहे. केदारनाथहून परत गुप्तकाशीस आल्यावर उखीमठावरून चमोली आणि चमोली ते बदरीनारायण असा प्रवास महिना दीड महिन्यांत करावा लागतो. मोटारीचें साधन नियमितपणें सुरू झाल्यावर हा प्रवास थोड्या अवधींत 'ठराविक कालमर्यादेंत करितां येईल. हिमालयांत रस्त्यानें पाणी विपुल आहे. थंड प्रदेश असल्यानें चालण्याचे श्रम वाटत नाहींत.

घृष्णेश्वर हें ज्योतिर्लिंगांतलि बारावें स्थान आहे. या ज्योतिर्लिंगाची पौराणिक कथा फार मोठी आहे. हें त्रिपुरांतकाचें निजगृह आहे. या ठिकाणीं शिवालय नांवाचें सरोवर असून त्याच्या कांठीं हें ज्योतिर्लिंग आहे. आनंदवनांत शंकरपार्वती सारीपाट खेळत होते. खेळांत पार्वतीनें डाव जिंकला. शंकराला आपलें सर्वस्व पणास लावावें लागलें. डाव अंगलटीस आल्यानें शंकर सर्व गमावून बसले. शेवटीं लंगोटीहि गेली. अशा स्वरूपांत शंकरानें गृहत्याग केला आणि काम्यवनांत गोदावरीच्यां उत्तर भागांत येऊन राहिले. शंकरानें या वनांत तप करण्यास आरंभ केला. इकडे पार्वतीला झालेल्या प्रकाराबद्दल खेद झाला. साध्या खेळावरून एवढा प्रकोप होईल अशी कल्पना नव्हती. पुढें नारदाच्या सूचनेप्रमाणें पार्वती भिल्लिणीच्या वेषांत काम्यवनांत जाऊन शंकराला प्रसन्न करावें असें ठरलें. उघडपणें गेल्यास शंकरास राग येण्याचा संभव असल्यानें हा बेत ठरविण्यांत आला. भिल्लिणीचा वेष घेऊन पार्वती काम्यवनांत आल्यावर मल्हार रागांत गान आणि नृत्य करून शंकरास मोहित केलें. शंकरानें तिला जवळ येण्यास सुचविलें. भिल्लिणीनें आईबापांचा उपमर्द होईल या सबबीवर जवळ जाण्याचें नाकारिलें. भिल्लिणीच्या मधुर गायनानें शंकर इतका मोहून गेला कीं तो तप करण्याचें सोडून तिच्या जवळ गेला. तिला विनविलें. कैलासाची राणी करण्याचें आश्वासन देऊं लागला. भिल्ली-

णीनें दोन अटी घातल्या. पत्नी म्हणून कायमचा स्वीकार करणें व दाक्षायणीचा आदर करणें अशा या दोन अटी होत्या. शंकरानें या अटी मान्य केल्या. भिल्लिणीला शंकरांनीं वामांकीं घेतलें. हळूहळू भिल्लिणीचें रूपांतर होऊं लागलें. ती पार्वती दिसावयास लागली. शंकरानें तिची स्तुति करून काम्यवनांतच काल घालविण्याचा विचार ठरविला. तेथें पार्वतीनें इतर माणसांच्या आगमनानें आपला एकांत भंग पावेल अशी भीति व्यक्त केली. शंकरानें सर्व जीव स्त्रीवेष धारण करतील असा वर दिला. एकदां पार्वतीला तहान लागली. शंकरानें आपला त्रिशूळ मारून पाताळांतील भोगावतीचा प्रवाह जमिनींतून वर काढिला. तृषा शांत झाल्यावर तें उदक तसेंच वाहूं लागलें व त्याचें एक मोठें सरोवर झालें. तेंच हें शिवालय होय. त्याच्या कांठीं पार्वती एकदां हातांत कुंकुम घेऊन त्यांत उदक घालून चोळावयास लागली. त्यांत एक लिंग तयार झालें. पाताळांत भोगावतीच्या उदकांत असणारें लिंग हातांत आलेलें पाहून शंकरास अत्यानंद झाला व प्रेमानें त्याला आपल्या हृदयाशीं धरिलें. तेथेंच त्याची स्थापना केली. कुंकुमाच्या अगाध रंगांत घृष्णीत झालें म्हणजे चोळिलें गेलें म्हणून तें घृष्णेश्वर नांवानें शिवालयाच्या कांठीं प्रसिद्ध ज्योतिर्लिंग झालें. येथून वाहणारी इला गंगा पुढें गोदावरी नदीला मिळून सिंधुप्रिया झाली.

पुरातन शिवालय सरोवर बरेंच लहान झालें आहे. शिवालय आणि घृष्णेश्वर मंदिर यांमध्यें अर्धा मैल अंतर आहे. घृष्णेश्वर वेरूळच्या लेण्याजवळ आहे. औरंगाबाद प्रांतांत खुलदाबाद तालुक्यांत सुप्रसिद्ध वेरूळ लेणीं आहेत. जवळच घृष्णेश्वराचें देवालय आहे. देवालय जुनें असून शाबूत राहिलें आहे. देवालयाजवळ भरपूर पाणी नाहीं. एक विहीर फक्त आहे. देवस्थानास श्री अहिल्याबाई होळकर यांची देणगी आहे. देणगीची रक्कम निजामाचे तिजोरींत अनामत ठेव म्हणून ठेविली आहे. त्याच्या व्याजांतून वार्षिक रु. शंभर देवस्थानास मिळतात. वेरूळला औरंगाबादेहून मोटार सर्व्हिस आहे. वेरूळच्या लेण्याची माहिती इतरत्र उपलब्ध आहे.

# उपसंहार

ज्योतिर्लिंगासंबंधीं शक्य ती माहिती जमवून वर दिली आहे. ही माहिती पूर्ण आहे असें म्हणतां येणार नाहीं. शिवाचें प्रतीक लिंग कां ठरविलें आणि प्रतिमारूपानें देवालयांत कां ठेविलें याबद्दल साधार माहिती देणें अवघड आहे. हिंदुधर्मांतील देवता मूर्त स्वरूपांत आणून त्याचीं रूपकें मनुष्य देहधारी बनविण्यांत आलीं. शिवाचें स्वरूप लिंगरूप आणि मनुष्य देह-रूप अशा दोन प्रकारांनीं ठरविलें. मनुष्य देहधारी मूर्ति पूजा अर्चा विधी-साठीं नसते. पूजेकरितां लिंगरूप ठेवण्यांत येतें. सर्व देवतांत शिवालाच फक्त दोन रूपें देण्यांत वैशिष्ट्य आहे. शिवाचें पूजनीय स्वरूप लिंग कां मानिलें हा महत्त्वाचा प्रश्न असल्यानें त्याविषयीं प्राचीन ग्रंथांतील आधार मागें दिलेले आहेत. या प्रश्नावर निरनिराळीं मतें प्रचलित आहेत. मतभेदाहि तीव्र आहेत. म्हणून प्राचीन विद्वानांना अनुसरून तर्कशुद्ध मतांचाच अंगीकार करणें श्रेयस्कर आहे.

मूर्ति शब्दाचा अर्थ "परिच्छिन्नं प्रमाणत्वं क्रियावत्वं वा" असा केला आहे. मर्यादित आकाराची प्रमाणशुद्ध आणि मर्यादित क्रियायुक्त ती मूर्ति. प्रत्यक्ष अनुमान आणि शब्द या सांख्यमताचा यांत अनुवाद आहे. परम-ब्रह्म आकुंचित स्वरूपांत आणून मूर्तिरूपानें उपासकांपुढें ठेविलें. त्यांतील हेतु मनुष्याच्या मनाला प्रथमावस्थेंत ध्यानोपयोगी व्हावा हा आहे.

शिवलिंगपूजा आर्यांत रूढ नव्हती, तथापि आर्यांना मूर्तिपूजा अवगत नव्हती असें म्हणतां येणार नाहीं. शिश्नदेवांत मूर्तिपूजा रूढ होती. शिश्नदेव हे अनार्य होते. ते मूर्तिपूजक होते. ते द्राविडियन किंवा सुमेरिअन संस्कृतीचे होते हें आतां सिद्ध झालें आहे. आर्य लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वी येथें भरभराटींत असलेलीं राज्यें होतीं, असें मोहेंजोदरो येथील उत्खननांत सांपडलेल्या वस्तूंवरून ठरलें आहे. एका-खालीं एक अशीं सात शहरें सांपडलीं आहेत. त्यांत शिवलिंग, दुर्गा

वगैरे मूर्ति देखील मिळाल्या आहेत. यावरून असें अनुमान निघतें कीं, द्राविडियन संस्कृतींत मूर्तिपूजा रूढ होती. आर्यांनीं मूर्तिपूजेचें अवलंबन केलें नाहीं. त्यांच्या प्रार्थना महान् विभूतिसंबंधीं आहेत.

प्रतीक उपासना आणि प्रतिमा-पूजन भिन्न भिन्न आहेत.प्रतीक उपासना व्यक्तींच्या ध्यानसाधनाकरितां घेतात. प्रतिमापूजन सामुदायिक उपासनेकरितां आहे. तपश्चर्या करण्यासाठीं तपश्चर्या करणाऱ्याच्या योग्यतेप्रमाणें दोन स्वरूपें मानिलीं आहेत.

द्वेवाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैव अमूर्तं च ॥ बृ ii. ३.

बृहदारण्यकोपनिषदांत ब्रह्मचिंतनाकरितां योग्यतेप्रमाणें दोन साधनें सांगितलीं आहेत. ब्रह्म मूर्तस्वरूप मानून त्याचें ध्यान करावें अगर अमूर्त स्वरूपांत हृदयांत साठवून"तपसा चीयते ब्रह्म" तपश्चर्येनें ब्रह्म प्राप्त करून ध्यावें. मूर्त स्वरूपांत ब्रह्म प्राप्त करणें म्हणजे प्रतीकांचें ध्यान करून करावें. येथें ध्यान करणाराच्या आवडीप्रमाणें प्रतीक ठरवून ब्रह्मचिंतन करावयाचें असतें. हें साधन व्यक्तीलाच उपयोगी आहे. पुराणकालीं याच प्रकारची व्यवस्था ठरविलेली होती. विष्णुपुराणांत ब्रह्मचिंतनाबद्दल वरीलप्रमाणें सांगितलें आहे.

द्वे रूपे ब्रह्मणस्तस्य मूर्तं चामूर्तमेव च क्षराक्षरस्वरूपेते सर्वभूतेषु अवस्थिते ॥

ब्रह्मस्वरूप व्यक्त आणि अव्यक्त उपासनांनीं चिंतण्यांत येत असे. ब्रह्मउपासना प्रतीक साधनांनीं किंवा तपश्चर्येनें करितां येते. " न प्रतीके न हि सः ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात् " ब्रह्मसूत्र अ. ४ येथेंहि प्रतीकच ब्रह्मदृष्टीचा विकास होण्यास घेतलें आहे. मूर्तिवाचक प्रतिमाशब्द योजिला नाहीं. मूर्ति रूढ नव्हत्या असेंच यावरून ठरतें. आर्यावर्ताच्या आसपासचे सुधारलेले देश मूर्तिपूजेपासून अलिप्त नव्हते. मिसर, बाबिलोनिया, ग्रीस वगैरे देशांत मूर्तिपूजा होत असत. मिसरचा अखनातून राजा सूर्योपासक होता. त्या देशांत सूर्याच्या मोठमोठ्या मूर्ति सांपडल्या आहेत. आर्यांच्या

यज्ञांतील प्रार्थना त्यांच्या पूर्वजांत ज्या महान् विभूति झाल्या त्यांच्या-बद्दल आहेत. त्यांना या विभूति प्रत्यक्ष येऊन भेटत असत. अतएव त्यांना प्रतीक करण्याची आवश्यकता नव्हती. अर्जुनानें आवाहन करितांच श्रीकृष्ण भेटत असल्यानें त्याला प्रतीकाची आवश्यकता नव्हती.

आर्यांचा अनार्यांशीं निकट संबंध घडूं लागल्यानें अनार्यांच्या रूढी प्रचारांत शिल्लक होत्या, त्या अर्थात रूढ झाल्या. अनार्य द्राविडियन संस्कृतीचे होते. द्राविडांच्या वसाहती अद्यापि बलुचि-स्थानांत आहेत. ते सर्व महंमदाचे अनुयायी आहेत. बलुचि लोकांत दोन पंथ आहेत. अरबी बलुचि आणि द्राविडियन बलुचि. यांना ब्रहूई म्हणतात. सर्वसाधारण लोकांची तपश्चर्या न करितां प्रतीक उपासनेनें इष्ट-कामना पूर्ण होते याची जाणीव आर्यांना असली पाहिजे. म्हणून त्यांनीं अनार्यांच्या मूर्तिपूजा प्रचारांत ठेविण्यास विरोध दर्शविला नाहीं. आपल्या उपासनेंत मात्र त्यांनीं फरक केला नव्हता. रामायणकालीं प्रतीकपूजन रूढ झालें नव्हतें. महाभारतकालीं प्रतीकपूजनाची कल्पना रूढ व्हावयास लागली होती. अर्जुनानें शिवाला प्रसन्न करून पाशुपतास्त्राची भेट मिळविली.ही उपासना प्रतीकाची नव्हती. श्रीकृष्णानें कैलासाश्रमीं शिवाची उपासना करून सांब नांवाच्या पुत्राची प्राप्ति करून घेतली. ही उपासना उपमन्यूच्या आश्रमांत झाली. परंतु प्रतीक नव्हतें. एकलव्याला द्रोणाचार्य प्रत्यक्ष भेटत तरी शिष्यत्व प्राप्त न झाल्यानें प्रतीक पुढें ठेवून उपासना करण्यांत आली. यावरून भारतकालीं प्रतीकपूजन रूढ व्हावयास लागलें असें दिसतें.

परब्रह्म शिव याचें प्रतीक लिंग ठरविण्यांत आलें त्याबद्दलची माहिती लिंगपुराणांत आहे. पुराणांचा आधार घेऊन एकादी गोष्ट सिद्ध करणें कांहींना पटणार नाहीं. पुराणें विश्वसनीय नाहींत. पुराणांतील विधानें सुसंगत नाहींत. एकच गोष्ट निरनिराळ्या विरुद्ध प्रमाणांत सांगितलेली

आहे. अतएव पुराणांचा आधार निरुपयोगी आहे असें त्यांचें मत आहे. त्यांत लिंगपुराणावर विशेष कटाक्ष आहे. पुराणें पंचलक्षणात्मक असावीं असा नियम आहे म्हणून त्यांना महत्त्व आहे. त्यांत इतिहास, सामाजिक जीवनसुखाचे मार्ग, अर्थशास्त्र आणि मोक्षप्राप्तीचे उपाय जनकल्याणा-करितां दाखविले आहेत. ते जाणण्याला प्रो. विल्सन म्हणतो त्याप्रमाणें सूक्ष्म आणि तीव्र बुद्धि पाहिजे. पुराणांतील गुह्यें जाणण्यास सात पडद्यां-पलीकडे पोहोंचलें पाहिजे. प्रत्येक पडदा उघडण्यास निरनिराळ्या भाव-नांच्या किल्ल्या उपयोगांत आणिल्या पाहिजेत तरच तीं समजतात. वंश, सप्तऋषि, कल्प आणि त्यांतील महान् विभूतींचीं कृत्यें यांची जोड घेऊन हीं गुह्यें जाणिलीं पाहिजेत. लिंगपुराण याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. ब्रह्म सर्व व्यापून आहे हें तत्त्व लिंगपुराणकार मानितात. यज्ञसंस्थेचें श्रेष्ठत्व, यज्ञांत आहुति अर्पण करून आवाहन केलेली देवता प्रत्यक्ष येऊन संकल्पित कार्य सिद्धीस नेत असे याचें त्यानें यथार्थ वर्णन केलें आहे. सर्व ब्रह्ममय आहे हें दाखविण्यासाठीं अत्रिसुत दत्त याचें स्वरूप सोम, दत्त आणि दुर्वास यांच्या गुणांचा संयोग आहे. अत्रि म्हणजे अ + त्रि. तीन नव्हे तें. असें वर्णन आहे. यावरून लिंगपुराकारांची दृष्टि कशी होती याची साक्ष पटते.

सृष्टिस्थित्यन्तकरणाद् ब्रह्मविष्णुशिवात्मिकाम्
स संज्ञां याति भगवान् एक एव जनार्दनः वि. पु. अ. १-२

इतर पुराणकारांची ईश्वराविषयीं काय कल्पना होती तें विष्णुपुराण-कारानें वरील श्लोकांत दाखविले आहे. लिंगपुराणकार देखील याच मताचे आहेत. यावरून पुराणकारांत ईश्वराविषयीं एकमत आहे.

विष्णुः कालाग्निरुद्रोऽहं विद्यासारं वदामि ते अग्नि. पु. अ. १-३

ईश्वर एकच आहे, त्यांत द्विमत नाहीं हें स्पष्ट आहे. शिवाविषयीं लिहितांना लिंगपुराणकार शिवाचें स्वरूप ज्योतिर्मय आहे असें सांगतात. तो महेश, महादेव, आदिदेव आहे. तें ब्रह्म आहे. त्याच्यापासून सर्व प्रजा उत्पन्न होतात.

तस्मादग्निः समिधो यस्य सूर्यः सोमात्पर्जन्य ओषधयः पृथिव्याम्
पुमान्रेतः सिञ्चति योषितायां बह्वीः प्रजा पुरुषात् संप्रसूताः
मुं. २–१–५

या महापुरुषापासून पंचाग्नि निर्माण होऊन अनेक प्रकारच्या प्रजा निर्माण होतात असें ही श्रुति स्पष्ट सांगत आहे. लिंगपुराणकारांनी याला ब्रह्म म्हटलें असून सृष्टि उत्पत्तिकारक आदिदेव मानिलें आहे. लिंगपुराणकार उपनिषदांतील वर्णनापेक्षां अधिक कांहींच सांगत नाहींत. सृष्टि उत्पन्न कशी होते, प्रजा कशा निर्माण होतात याची माहिती उपनिषदांवरूनच घेतलेली दिसते. उत्पत्तिकारक आदिदेव मानणें श्रुतीच्या विरुद्ध होत नाहीं. तो प्रलय होऊन गेल्यावर पुनरुज्जीवन करणारा आहे. त्याला संहारक म्हटलें आहे. परंतु हा संहार पुनरुज्जीवनाकरितां होतो. पुनरुज्जीवन होण्यास प्रकृति आणि पुरुष यांचें लग्न व्हावें लागतें. यालाच पुराणकार पुरुष आणि स्त्री ( Spernatozoon and Ovum ) म्हणतात. जडसृष्टि निर्माण होण्यास या दोन तत्त्वाचा संयोग व्हावा लागतो. यांनाच नाद आणि बिंदु अशी संज्ञा आहे. बिंदूमधून नाद जावयास लागतो त्यावेळीं शब्द निर्माण होतो. बिंदु स्थिर असून नाद ऊर्ध्व गति आहे. या तत्त्वांचा श्रुतिवाक्याप्रमाणें परमब्रह्म शिव हा कारक आहे म्हणून शिवाकडे उत्पत्ति प्रवर्तकपणा प्राप्त झाला असें मानिलें आहे. यज्ञसंस्था मागें पडल्यावर यज्ञाचें प्रतीक परमब्रह्म शिव ओघानेंच मानण्यांत आलें. नाद आणि बिंदु तत्त्वांवर यज्ञाच्या प्रतीकाची स्थापना यज्ञाचें परमब्रह्म शिवस्वरूप दृष्टीपुढें ठेवूनच करण्यांत आली. यज्ञाची स्थिर स्वरूपाची वेदी बिंदुठिकाणीं मानून त्याला वेदीचा आकार दिला. याला शालिका म्हणतात. मधल्या अग्निस्फुल्लिंगाला गति असल्यानें तें नाद तत्त्व ठरवून ऊर्ध्व गति असल्यानें लिंग आडवें न ठेवतां उभें ठेवण्यांत आलें. पुराणकारांनीं यज्ञाचें प्रतीक परमब्रह्म शिव असल्यानें यज्ञाचें विस्तृत वर्णन केलें आहे, यांतील हेतु हा कीं शिव हें यज्ञाचें प्रतीक असल्यानें शिवाप्रमाणें यज्ञाचें वर्णन केलें.

अश्वत्थपत्रसदृशीं कुंडार्धे कोणभागार्धं दिशि चोत्तरतो बहिः

अ. पु.अ २४-८

अष्टमुष्टिक्याऽलिङ्गं वन्हि संतार्य च क्रमात्

अग्नि पु. अ. ९७-२

यज्ञाचा आकार आणि त्याचें उत्तरेकडील प्रसरण या दोन्ही प्रमाणांचें साहश्य नाद आणि बिंदु या तत्त्वाशीं आहे. लिंगाची व्याप्ति यज्ञांतील अग्नि समान राखण्यांत आली आहे. नाद निघाल्यानंतर त्याची प्रतिक्रिया मेरूवर होते. मेरुपर्वत दक्षिणोत्तर पसरला आहे अशी समजूत आहे. दक्षिणेकडील टोंक लुप्त आहे. उत्तरेकडील भाग दृश्य आहे. नादाची गति मेरुपर्वतावर जातांच तेथें तिची क्रिया सुरू होते आणि उत्तरेकडील मार्ग मोकळा असल्यानें ती उत्तरवाहिनी होते. म्हणून शिवलिंगावरील पाणी शाळुंकेंत पडून उत्तर दिशेला वाहतें. गोमुख नेहमीं उत्तर दिशेला असतें. नाद ऊर्ध्व गति असल्यानें लिंग ऊर्ध्व ठेविलें. उत्तर दिशा पवित्र मानिली आहे. काशीला गंगा उत्तरवाहिनी आहे म्हणून या क्षेत्राला विशेष महत्त्व आहे. सारांश, पुराणकारांच्या माहितीवरून शिवाचें प्रथम दृश्य स्थाणु ज्योतिः आहे आणि तेंच परमब्रह्म आहे.

ऋत ँ सत्यं परं ब्रह्म पुरुषं कृष्णपिङ्गलम्

ऊर्ध्वरेतं विरूपाक्षं विश्वरूपाय वै नमो नमः ॥

नारायण अनु. २३.

वरील वर्णन आदिदेवाचें आहे.यालाच परमब्रह्म म्हटलें आहे. शिवाचें प्रतीक ठरवितांना या सर्व स्वरूपांचा समावेश करण्यांत आला आहे.

रुद्राणां च शतं लक्षं यैर्व्याप्तं सचराचरम् ॥

अग्नि. पु. अ. १८'४५

सर्व चराचर व्यापून असणारें, स्थाणुज्योति, यज्ञाचें फल देणारें, अश्वत्थ पत्राप्रमाणें असणारें यज्ञस्वरूप यज्ञाचें शिवस्वरूप ठरविलें. आणि त्याचें प्रतीक शाळुंका आणि पिंडी रूढ केलें. हें लिंगरूप अमूर्त रूप आहे. मूर्तीच्या आकाराला मूर्तरूप म्हणतात. या दोन रूपांपैकीं मानवदेहधारी रूप पूजनांत

घेत नाहींत. मूलविग्रह आणि उत्सवविग्रह अशीं हीं दोन रूपें आहेत. मूलविग्रह अमूर्त किंवा लिंग–पूजनांत घेतात. उत्सवविग्रह किंवा मनुष्यदेहधारी मूर्ति मिरवणुकीसाठीं घेतात. ही शिवाची मूर्ति एकमुखी असते. शिवाचें रूप पंचवक्र आहे. यज्ञस्वरूपावरून हें स्वरूप ठरविण्यांत आलें असें दिसतें. यज्ञांतील प्रधान स्थानें पांच आहेत. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, आणि ऊर्ध्व दिशा प्रधान स्थानें आहेत. या पांच स्थानीं विराट पुरुष पंचाग्नि स्वरूपें धारण करितो. यज्ञांतील या पांच स्वरूपांचा समावेश शिवाच्या प्रतीकांत केला आहे. शिवाच्या या पांच मुखांना अघोर, सद्योजात, वामदेव, तत्पुरुष आणि ईशान म्हणतात आणि तीं अनुक्रमें दक्षिण, पश्चिम, उत्तर, पूर्व आणि ऊर्ध्व दिशांना आहेत. ब्रह्म दोन स्वरूपांत आराधनीय आहे. त्याचप्रमाणें शिवही दोन स्वरूपांत पूजनीय आहे. यज्ञांतील मुख्य साधनें यज्ञ, यज्ञवेदी, भस्म, सोम, यूपस्तंभ आणि यज्ञसाहित्य वाहून नेणारा बैल या सर्वांचा समावेश प्रतीकांत आहे. यावरून यज्ञाचें चिन्ह लिंग आहे. लिंग याचा अर्थ चिन्ह आहे. ब्रह्मविद्येच्या संप्रदायांचीं कर्तृत्वादि लिंगें असतात. सांप्रदायाची खूण किंवा चिन्ह या अर्थी लिंग हा शब्द वापरिला आहे. यज्ञाचें सर्व साहित्यामिळून जें चिन्ह झालें तें लिंग होय. यज्ञाचें एवंगुणविशिष्ट रूप शिव आणि त्याचें चिन्ह पिंडीसह शाळिका आहे. त्यांत दुसरा अर्थ निघत नाहीं आणि निघणेंहि संभवनीय दिसत नाहीं. यज्ञक्रिया सर्व प्राणिमात्रांना धारण करणारी असल्यानें त्यांतील सर्व गुण शिवामध्यें आहेत. शिव सर्वांचें कल्याण करणारा आहे. त्याचा महिमा वर्णन करण्यास मनुष्यप्राणी असमर्थ आहे.

— समाप्त —

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ~~५२१६~~ ६३६६

REFBK 0007366

REFBK-0007366